


# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com
एक प्रतिष्ठित सवय
✦ अमरावती, मंगळवार ६ ऑक्टोबर २०२६ ✦ मूल्य ४.०० ✦ पृष्ठ १०




## बॅलेट पेपरवर निवडणुका झाल्या तर भाजपाची अग्निपरीक्षा




### खासदार अरविंद सावंत यांचा हल्लाबोल

**अमरावती/प्रतिनिधीः**-अमरावती शिक्षक मतदार संघ निवडणुकीची रणधुमाळी जोरावर आहे. नामांकन दाखल करण्याचा मंगळवारी शेवटचा दिवस आहे. शेवटच्या दिवसाआधी शिवसेना उबाठाच्या वतीने बुलढाणाचे दत्तात्रय लहाने यांनी खासदार अरविंद सावंत यांच्या उपस्थितीत अर्ज दाखल केल्यानंतर शहरातील पत्रकारांची बोलतानानी खासदार अरविंद सावंत यांनी भाजपावर हल्लाबोल केला. खासदार सावंत म्हणाले की, महाराष्ट्राचा, महाकाय वटवृक्ष आहे, त्याच्या छत्रेत वाढून मोठे झालेले आज ठाकरेंची जागा हडपल्याची भाषा करत आहेत. शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या याच वटवृक्षावर वाढलेली भाजप ही केवळ एक विचारांची वेल आहे. निवडणुकांमध्ये पारदर्शकता हवी असेल तर ईव्हीएम ऐवजी बॅलेट पेपरवर मतदान घेऊन दाखवा, भाजपची खरी ताकद आणि अग्निपरीक्षा तिथेच सिद्ध होईल, अशी सडकून टीका सावंत यांनी केली. पत्रकार परिषदमध्ये खासदार सावंत यांच्यासोबत, उमेदवार दत्तात्रय लहाने, शिक्षक आमदार अभिजित वंजारी, सिद्धार्थ खरात, नंदू खेडेकर आदि उपस्थित होते.

काँग्रेसनेही या जागेवर उमेदवार दिला असला तरी महाविकास आघाडीत कुठेही फाटाफूट नाही. अर्ज मागे घेण्याची मुदत अद्याप शिल्लक आहे. मुंबईतील विराट मोर्चात काँग्रेसचे विधिमंडळ नेते बाळासाहेब थोरातांसह सर्व घटक पक्ष उद्धव ठाकरे आणि राज ठाकरेंसोबत मंचावर एकत्र होते. स्थानिक पातळीवरील पेचावर उद्धव ठाकरे आणि काँग्रेसचे वरिष्ठ नेते चर्चा करून नक्कीच सकारात्मक तोडगा काढतील, असे ते म्हणाले.

यावेळी त्यांनी शिक्षक मतदारसंघातील उमेदवारी, केंद्रीय निवडणूक आयोगातील गैरव्यवहार, एसआयआर, ड्रग्ज घोटाळा, मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्यावरील भ्रष्टाचाराचे आरोप आणि मुंबईतील मोर्चावर दाखल ➪(पान २ वर)

# 16 ऑक्टोबरपासून राज्यभरात पाणीकपात

**मुंबई/प्रतिनिधी :** अलनिनोच्या प्रभावामुळे यंदा राज्यातील पर्जन्यमानात मोठी घट झाली असून अनेक भागांत पाण्याची उपलब्धता मर्यादित झाली आहे. आगामी काळात पाणीटंचाईची तीव्रता वाढण्याची शक्यता लक्षात घेउन राज्य सरकारने आतापासूनच पाण्याच्या वापरावर नियंत्रण आणण्यास सुरु वात केली असून राज्यातील नागरिकांना पिण्याच्या पाण्याची कोणतीही टंचाई भासू नये, यासाठी पिण्याच्या पाण्याला सर्वोच्च प्राधान्य देण्यात आले आहे. येत्या १६ ऑक्टोबरपासून सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये किमान १० टक्के पाणीकपात लागू करण्याचे निर्देश देण्यात आल्याची माहिती सोमवार दि. ५ ऑक्टोबर रोजी राज्याचे जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांनी दिली.

संभाव्य पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी पाण्याचा प्रत्येक थेंब जपून वापरण्याचे



आवाहनही जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांनी केले आहे. जलसंपदा, महसूल, कृषी, उद्योग आणि नगरविकास विभाग समन्वयाने काम करत असून पालकमंत्री तसेच कालवा सल्लागार समित्यांच्या माध्यमातून पाणीसाठ्याचा नियमित आढावा घेतला जाणार असल्याचे त्यांनी सांगितले. राज्यातील संभाव्य दुष्काळी परिस्थितीचा सामना



करण्यासाठी जलसंपदा विभागाने ३१ ऑगस्ट २०२७ पर्यंतचा धरणनिहाय आणि वापरनिहाय

### मनपा, नगरपालिका, ग्रामपंचायतींना कपातीचे आदेश

राज्यातील सर्व महानगरपालिका, नगरपालिका आणि ग्रामपंचायतींना १६ ऑक्टोबरपासून किमान १० टक्के पाणीकपात करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. यासोबतच पाणीगळती रोखण्यासाठी विशेष मोहीम तर सांडपाण्याच्या पुनर्वापरावरही भर देण्यात येणार आहे. सांडपाणी प्रक्रिया केंद्रे पूर्ण क्षमतेने चालवून प्रक्रिया केलेले पाणी बागकाम, बांधकाम आणि धुलाईसारख्या कामांसाठी वापरण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

पाणीसाठा आराखडा तयार केला आहे. उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करताना सर्वप्रथम नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याची गरज भागविण्यावर भर देण्यात येणार आहे. ➪(पान २ वर)

## राज्यात भयंकर दुष्काळ आणि मुंबई पालिकेचा रस्ते धुण्यासाठी आटापिटा

# 8 कोटी 25 लाखांचे कंत्राट



**मुंबई/प्रतिनिधी :** एकीकडे राज्यात दुष्काळाचे सावट असून मराठवाडा ऑक्टोबरातच जलसंकटाच्या तावडीत सापडला आहे. राज्याचे जलसंधारण मंत्री गिरीश महाजन यांनी राज्यातील पाण्याच्या नियोजनाचा मास्टर प्लॅन जाहीर करत ३१ ऑगस्ट २०२७ पर्यंत जलसाठ्याचे सूक्ष्म नियोजन करण्याचे आदेश दिले आहेत. एकीकडे महाराष्ट्रात १० टक्के पाणी कपात करण्याचे आदेश असताना आणि महाराष्ट्र असा तहानलेला असताना आता देशाची सर्वात श्रीमंत महानगर पालिका मुंबईतील रस्ते धुण्याच्या कंत्राटावर ८ कोटी २५ लाख ३३ हजार ४८ रु पये खर्च करणार आहे.

राज्यात दुष्काळ पडण्याची शक्यता असल्याने पाण्याची बचत करण्यासाठी सरकारने राज्यातील पाण्याच्या नियोजनाचा मास्टर प्लॅन जाहीर करत ३१ ऑगस्ट २०२७ पर्यंत जलसाठ्याचे ➪(पान २ वर)

## ज्ञानेश कुमार निलंबन प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाचा अंतरिम आदेश देण्यास नकार

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** सर्वोच्च न्यायालयाने आज (दि. ५ ऑक्टोबर) मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांना निलंबित करणा-या याचिकेवर अंतरिम आदेश देण्यास नकार दिला. सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणी निवडणूक आयोगाला तसेच मुख्य निवडणूक आयुक्तांसोबत इतर दोन निवडणूक आयुक्तांना नोटिस पाठवली आहे. सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्या नेतृत्वाखालील बेंचने या प्रकरणी सुनावणी करताना मुख्य निवडणूक आयुक्त आणि निवडणूक आयोगावर झालेल्या आरोपांवर स्पष्टीकरण मागितले आहे. न्यायालयाने आम्ही आधी निवडणूक आयोगाने याबाबत सर्व नियमांचे पालन झाले आहे का नाही त्याची तपासणी करणार. जर कोणता निर्णय घेताना कायद्याचे पालन झालेलं नाही असं आढळले तर तो निर्णय रद्द



करता येईल.सूर्यकांत म्हणाले की, आम्ही फार्म ६ मध्ये कोणतेही माडिफिकेशन करण्याची परवानगी दिली नव्हती हे आधी स्पष्ट करतो. ज्यावेळी रेकार्ड सादर केले जातील. त्यावेळी आम्ही त्यात माडिफिकेशन कोणी केले हे पाहू. तुमची याचिका घाई गडबडीत केली असल्याचे दिसत आहे.न्यायालयाने प्रतीवाद्यांना तुमच्या आरोपांना स्पष्टपणे आणि पारदर्शक उत्तर द्या असे देखील आदेश दिले आहेत. या प्रकरणी प्रतीवाद्यांना देखील नोटीस बजावण्यात आली आहे.

सिंग यांनी कुमार यांचे या याचिकेवर अंतिम सुनावणी होत नाही तोपर्यंत निलंबन करा अशी मागणी केली आहे. त्यांनी निवडणूक आयोगाचे बहु सदस्यत्व टिकवण्यासाठी त्यांना निलंबित करावे अशी मागणी याचिकेद्वारे केली होती. याचिकाकर्त्याने संधू आणि जोशी हे या काळात निवडणूक आयोगाचा कार्यभार संयुक्तरित्या सांभाळतील. तो दोघं सहमत होतील तोच निर्णय घेतला जाईल. आणि मुख्य निवडणूक आयुक्तांची जागा ही ज्या समितीत सीजेआयचा समावेश आहे त्या समितीने करावी.

## 'कोरोनापेक्षा राज्यातील दुष्काळाचे संकट मोठे, उत्सवांवरील खर्च टाळा' !

**नागपूर/प्रतिनिधी :**राज्यातील दुष्काळी परिस्थिती अत्यंत गंभीर असून कोरोना महामारीपेक्षाही हे संकट मोठे आहे. पुढील आठ महिने पाणी, चारा आणि शेतकरी-शेतमजुरांच्या प्रश्नांना सामोरे जावे लागणार आहे. त्यामुळे निवडणुकीच्या काळात उमेदवारांनी सामाजिक भान ठेवून काम केले पाहिजे व नागरिकांनीदेखील उत्सवांवर होणारा खर्च दुष्काळग्रस्तांच्या मदतीसाठी देण्यावर भर दिला पाहिजे, असे आवाहन महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले. नागपुरात सोमवारी ते प्रसारमाध्यमांशी बोलत होते.



दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर भाजपची सोमवारची प्रस्तावित पाच हजार कार्यकर्त्यांची रॅलीही रद्द करण्यात आली. दुष्काळी परिस्थितीत उत्सव साजरा न करण्याचा निर्णय पक्षाने घेतला आहे. हारतुरे स्वीकारू नयेत, वाढदिवस मोठ्या प्रमाणात साजरे करू नयेत. अनेक भागांत पिण्याचे पाणी आणि चा-याचा प्रश्न गंभीर होणार आहे. शेतकरी व शेतमजूर अडचणीत आहेत. त्यामुळे हार, फुले, बुके, बँड यावर खर्च करण्याऐवजी तो पैसा गरजुंच्या मदतीसाठी वापरावा. दुष्काळी कामांसाठी प्रत्येकाने योगदान देण्याची भूमिका घ्यावी. दिवाळीपूर्वी दुष्काळग्रस्त शेतक-यांना मदत करण्यासाठी सरकार प्रयत्नशील असल्याचे त्यांनी सांगितले.

**निवडणुकीत मंत्र्यांनी मतदारसंघात लक्ष केंद्रित करावे-** निवडणुकीच्या काळात पक्षातील कोणत्याही नेत्याकडून चुकीचा फोन किंवा संदेश जाउन कार्यकर्त्यांमध्ये संभ्रम निर्माण होउ नये, याची काळजी घेण्यात यावी. मंत्र्यांनी काही दिवस मुंबईला जाणे टाळावे आणि मतदारसंघातील ➪(पान २ वर)



## दोघांचा होरपळून मृत्यू, 10 ते 12 जखमी



**हिंगोली/प्रतिनिधी :** शहरातील मारवाडी गल्लीत फटाक्याच्या गोदामाला भीषण आग लागल्याची घटना घडली. फटाक्याचे गोदाम असल्याने दारु गोळ्याचा स्फोट होउन आगीने काही क्षणातच रौद्ररूप धारण केलं. या आगीत दोन जणांचा होरपळून मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती आहे, तसेच १० ते १२ जण जखमी झाले आहेत. आगीबाबत माहिती मिळताच, आग विझवण्यासाठी अग्निशमन दलाच्या गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या असून आग आटोक्यात आणण्याचे प्रयत्न सुरू होते. मात्र, आग विझवण्यासाठी गेलेल्या अग्निशमन दलाच्या गाडीलाच आग लागल्याचंही पाहायला मिळालं. शहरातील मारवाडी गल्ली म्हणजेच रहिवासी भागात इतक्या मोठ्या प्रमाणात फटाके ठेवल्याने परिसरात मोठी खळबळ उडाली असून, आगीमुळे नागरिकांमध्ये भीतीचं वातावरण निर्माण झालं आहे. या आगीमुळे मोठ्या प्रमाणात फटाके फुटत आहेत, त्यामुळे आग विझवण्यासाठी अडथळा निर्माण होत आहे. आग नेमकी कशामुळे लागली? या आगीत किती नुकसान झालं? याची माहिती अद्याप समोर आलेली नाही. दरम्यान, घटनास्थळी अग्निशमन दलाकडून आग आटोक्यात आणण्याचे प्रयत्न युद्धपातळीवर सुरू आहेत. मात्र, या आगीच्या घटनेत २ जणांचा होरपळून मृत्यू झाला आहेत ➪(पान २ वर)

## 'इंडिया' आघाडीचा आज निवडणूक आयोगाला घेराव



**नवी दिल्ली :** एसआयआरबाबत सुरू असलेल्या विरोधादरम्यान १९ विरोधी पक्षांचे नेते मंगळवार दि. ६ ऑक्टोबर रोजी दिल्लीत निवडणूक आयोगाला घेराव घालणार आहेत. इंडिया आघाडीचे विरोधी खासदार दिल्लीत लोकशाही वाचवा मार्च काढणार आहेत. ते संसद भवनापासून निवडणूक आयोगाच्या मुख्यालयापर्यंत सुमारे ३ किमी पायी चालत जाणार आहेत.विरोधी आघाडीने ३० सप्टेंबर रोजी दिल्लीतील कान्स्टिटयूशन क्लबमध्ये झालेल्या बैठकीनंतर हा निर्णय घेतला होता. सुमारे ३ तास चाललेल्या बैठकीत ३ मुद्यांवर सहमती झाली होती. पहिला मुद्या मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांना हटवण्यासाठी संसदेत प्रस्ताव आणावा. दुसरा मतदार यादीतून वगळण्यात आलेली नावे सार्वजनिक करावीत. नावे वगळण्यापूर्वी मतदाराला नोटीस आणि अपील करण्याची संधी मिळावी आणि तिसरा ईव्हीएमऐवजी मतपत्रिकेद्वारे निवडणुका घेण्यात याव्यात. यापूर्वी ११ ऑगस्ट २०२५ रोजी कठउकअ आघाडीच्या खासदारांनी संसद भवनापासून निवडणूक आयोगाच्या कार्यालयापर्यंत मोर्चा काढला होता. यात राहुल गांधी, मल्लिकार्जुन खरगे, शरद पवार यांच्यासह २५ विरोधी पक्ष सहभागी झाले होते. ➪(पान २ वर)

# महाविकास आघाडीत फुट!

### अमरावती शिक्षक मतदारसंघात काँग्रेस विरुद्ध उबाठा लढत रंगणार

**अमरावती/प्रतिनिधीः-** विधानपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवसेना उबाठाने आपले पत्ते उघडले आहेत. अमरावती शिक्षक मतदारसंघातून बुलढाणाचे दत्तात्रय लहाने यांना उमेदवारी देण्यात आली आहे. त्यांनी आज सोमवार ५ सप्टेंबर रोजी खासदार अरविंद सावंत, आमदार नितीन देशमुख, माजी खासदार अनंत गुढे, पराग गुडधे यांच्या उपस्थितीत विभागीय आयुक्त कार्यालयामध्ये नामांकन दाखल केले.तर काँग्रेसने आदिती ऋषिकेश पोहरे यांना उमेदवारी जाहीर केली आहे. अदिती पोहरे मंगळवार ६ ऑक्टोंबर रोजी दुचाकी रॅलीने नामांकन भरणार आहे. पंचवटी चौकातून त्यांची रॅली निघणार आहे.यामुळे महाविकास आघाडीमध्ये बिघाडी चे चित्र दिसत आहे. आता टा निवडणुकीत काँग्रेस आणि शिवसेना (यूबीटी) आमने सामने येत आहे. त्यामुळे निवडणुकीची चुरस आणखीन वाढली आहे.

**■ दत्तात्रय लहाने यांचे नामांकन दाखल**

**■ अदिती पोहरे आज दाखल करणार उमेदवारी**

विधानपरिषदेच्या निवडणुकीसाठी काँग्रेस, भाजपा पाठोपाठ आता शिवसेनेना उबाठाने अमरावती आणि छत्रपती संभाजी नगरमध्ये उमेदवार जाहीर केले आहेत. अमरावती शिक्षक मतदारसंघातून काँग्रेसनं यापूर्वीच अदिती पोहरे यांना शिक्षक मतदार



संघासाठी उमेदवारी जाहीर केली आहे. तर शिवसेनेनं दत्तात्रय लहाने यांना पदवीधर मतदारसंघातून निवडणुकीच्या रिंगणात उतरवले आहेत. काँग्रेस या जागेसाठी इच्छुक असून त्यांनी शिवसेनेच्या (ठाकरे) उमेदवाराविरोधात उमेदवार दिल्यास महाविकास आघाडीत जागा वाटपा वरून बिघाडी झाल्याचे चित्र दिसत आहे.दत्तात्रय लहाने यांनी या निवडणुकीसाठी आधी पासूनच तयारी सुरू केली होती. पक्षानं आपल्याला बऱ्याच आधीपासून तयारी करण्याच्या सूचना दिल्या होत्या, असे त्यांनी सांगितलं होतं. त्यानुसार त्यांनी मतदारसंघातील विविध जिल्ह्यांमध्ये भेटीगाठी आणि संपर्क मोहीम सुरू केली होती. अमरावती पदवीधर मतदारसंघात पाच जिल्ह्यांचा समावेश असल्यानं मतदारांपर्यंत पोहोचण्यासाठी वेळेचं महत्त्व मोठं आहे. या पार्श्वभूमीवर लहाने यांना आधीपासून सुरू असलेल्या तयारीचा फायदा मिळणार का, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.



## संशोधनासाठी ३ शास्त्रज्ञांना जगातील सर्वोच्च सन्मान

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :**वैद्यकशास्त्रातील २०२६ च्या प्रतिष्ठित नोबेल पुरस्काराचीअधिकृत घोषणा सोमवारी करण्यात आली आहे. या वर्षी हा जगातील सर्वोच्च सन्मान कार्ल डायसेरोथ, पीटर हेगेमन आणि जार्ज नागेल या तीन शास्त्रज्ञांना संयुक्तपणे देण्यात येणार आहे. स्वीडनच्या स्टाकहोम येथील 'कॅरोलिन्स्का इन्स्टिट्यूट'मध्ये या पुरस्कारांची घोषणा करण्यात आली. याच बरोबर नोबेल पुरस्कार सप्ताहाचीही अधिकृत सुरु वात झाली आहे.या महत्वपूर्ण संशोधनासाठी देण्यात आले नोबेल -या तिनही वैज्ञानिकांना 'ऑप्टोजेनेटिक्स' आणि 'लाइट-गेडेड आयन चॅनेल्स' या क्षेत्रातील त्यांच्या क्रांतीकारी संशोधनासाठी त्यांना या पुस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. या तंत्रज्ञानामुळे प्रकाशाच्या साहाय्याने मेंदूतील पेशींच्या क्रिया नियंत्रित करणे आणि मज्जासंस्थेशी संबंधित आजारांचा अभ्यास करणे शक्य झाले आहे. यामुळे पार्किन्सन्स आणि नैराश्यासारख्या गंभीर आजारांवर उपचार करण्याचे नवीन मार्ग खुले झाले आहेत. माध्यमांतील वृत्तांनुसार, यावर्षीच्या नोबेल पारितोषिकाची रक्कम १२ दशलक्ष स्वीडिश क्रोनर (अंदाजे १.२ दशलक्ष अमेरिकन डॉलर्स) एवढी आहे. खरे तर, वैद्यकशास्त्रातील नोबेल पारितोषिक अधिकृतपणे ➪(पान २ वर)



## आज अंगणवाडी कर्मचा-यांचा राज्यव्यापी लाक्षणिक संप

**मुंबई/प्रतिनिधी :** अंगणवाडी कर्मचा-यांना शासकीय कर्मचा-यांचा दर्जा देण्यासह विविध प्रलंबित मागण्यांसाठी महाराष्ट्र राज्य अंगणवाडी कर्मचारी संघाच्या वतीने ६ ऑक्टोबर रोजी राज्यव्यापी एकदिवसीय लाक्षणिक संप पुकारण्यात आला आहे. मुंबईतील आझाद मैदानावर दुपारी २ वाजता अंगणवाडी कर्मचारी शक्तिप्रदर्शन आणि जेल भरो आंदोलन करणार असल्याची माहिती संघटनेचे चिटणीस राजेश सिंह यांनी आहे.

राज्यात एकात्मिक बालविकास सेवा योजनेत सुमारे १ लाख १० हजार ६६४ अंगणवाडी केंद्रात सुमारे २ लाख अंगणवाडी कर्मचारी कार्यरत आहेत. एकात्मिक बालविकास सेवा योजनेच्या माध्यमातून दरदिवशी ६ महिने ते ६ वर्षे बालकांना पूरक पोषण



आहार, अनौपचारिक शिक्षण, तसेच गरोदर व स्तनदा मातांना आहार व आरोग्य सेवेचे फायदे देण्याचे महत्वाचे काम अंगणवाडी कर्मचा-यांकडून केले जात आहे.

त्याव्यतिरिक्त अंगणवाडी कर्मचा-यांना निवडणूक संबधी, मातृवंदना योजना, लेक लाडकी योजना, लाडकी बहिण योजना, घरकुल योजना, दिव्यांग बालकांचे सर्वेक्षण इत्यादी योजनाबाहय कामे दिली जातात. गेल्या ५१ वर्षापासून तळागाळातील लाभार्थ्यांना सेवेचे फायदे देण्याचे अविरत कार्य अंगणवाडी कर्मचारी करीत आहेत. दरदिवशी ८ ते १० तास काम करू नसुध्दा, शासन त्यांना शासकीय कर्मचारी समजत नाही. अंगणवाडी कर्मचा-यांना शासकीय कर्मचा-यांचा दर्जा देण्यात यावे, अशी मागणी संघटनेकडून करण्यात आली. अंगणवाडी कर्मचा-यांना दरमहा पेन्शन आणि सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार ग्रॅच्युइटीचा लाभ देण्यात यावा. या मागणीसंदर्भात मुख्यमंत्री यांच्यासोबत अनेक वेळा बैठका होउनही सेवानिवृत्त अंगणवाडी कर्मचा-यांच्या पेन्शन व ग्रॅच्युइटीबाबत शासनाने अद्याप ठोस आदेश काढले नाहीत.त्याचप्रमाणे ४ ऑक्टोबर २०२४ रोजीच्या शासन निर्णयानुसार अंगणवाडी कर्मचा-यांना त्यांच्या कामाच्या स्वरूपानुसार प्रोत्साहन भत्ता देण्याचे आदेश असतानाही सुमारे ४० टक्के अंगणवाडी कर्मचा-यांना या प्रोत्साहन भत्त्याची रक्कम मिळालेली ➪(पान २ वर)



paper www.janmadhyam.com

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

## आश्रमशाळेतील ८२ विद्यार्थ्यांचे टक्कल

### जांभूळघाट येथील प्रकाराने संताप, चौकशीची मागणी

**नागपूर :** चंद्रपूर जिल्ह्यातील जांभूळघाट आश्रमशाळेत शिस्तीच्या नावाखाली तब्बल ८२ विद्यार्थ्यांचे टक्कल करण्यात आल्याने संताप व्यक्त होत आहे. विद्यार्थ्यांच्या आत्मसन्मानाशी खेळ करणा-या या प्रकाराची तातडीने चौकशी करण्याची मागणी काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी केली




आहे. जांभूळ घाट येथील आश्रमशाळेत शिस्तीच्या नावाखाली तब्बल ८२ विद्यार्थ्यांचे टक्कल करण्यात आल्याचा प्रकार समोर आला आहे. या घटनेमुळे विद्यार्थी, पालक आणि सामाजिक कार्यकर्त्यांमध्ये संतापाची भावना निर्माण झाली आहे. शिस्त लावण्यासाठी विद्यार्थ्यांचे केस कापण्यापासून ते थेट टक्कल करण्यापर्यंतची कारवाई करण्याचा अधिकार संबंधित अधिका-यांना नेमका कोणी दिला, असा सवाल उपस्थित होत आहे. विद्यार्थ्यांच्या वर्तनावर नियंत्रण ठेवण्यासाठी शाळा प्रशासनाकडून नियमांची अंमलबजावणी केली जाउ शकते. मात्र, शिस्तीच्या नावाखाली विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाला आणि आत्मसन्मानाला धक्का पोहोचविणारी कृती करणे योग्य आहे का, याबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत. हा प्रकार नेमका कोणाच्या आदेशाने आणि कोणत्या नियमांच्या आधारे करण्यात आला, याची स्पष्टता अद्याप समोर आलेली नाही. आश्रमशाळेच्या अधीक्षकांनी नेमक्या कोणत्या अधिकारात ८२ विद्यार्थ्यांचे टक्कल करण्याचा निर्णय घेतला, याची चौकशी होणे आवश्यक आहे. दरम्यान, राज्यातील आदिवासी आश्रमशाळांमधील कारभारावर गेल्या काही दिवसांत सातत्याने प्रश्न उपस्थित होत आहेत.

## इंजिनिअरिंगच्या विद्यार्थीनीवर दोघांचा सामूहिक अत्याचार

### गुंगीचे औषध देउन लॉजवर नेले, नराधमांना अटक

**सांगली /प्रतिनिधी :** महिलांवरील अत्याचाराच्या घटना काही केल्या कमी होताना दिसत नाही. त्यातच, राजधानी दिल्लीतही मुलींवरील अत्याचाराच्या घटनेवरु न संताप व्यक्त करत तरु णाई रस्त्यावर उतरल्याचं दिसून येत आहे. एकीकडे महिला अत्याचाराच्या घटनेवर कडक कारवाईचे आश्वासन दिले जात असताना, दुसरीकडे अत्याचाराच्या घटनांनी समाजमन सुन्न होत आहे. आता, इंजिनिअरिंगचे शिक्षण घेणा-या २० वर्षीय विद्यार्थिनीला लाजवर नेउन तिच्यावर अत्याचार केल्याची धक्कादायक घटना सांगली जिल्ह्यातील ईश्वरपूर परिसरात उघडकीस आली आहे. शीतपेयातून गुंगीचे औषध पाजून तिच्या इच्छेविरु द्ध दोघांनी अत्याचार केल्याचा आरोप आहे. याप्रकरणी ईश्वरपूर पोलिसांनी दोन्ही संशयिताला अटक केली आहे. शार्दुल पाटील (वय २१, रा. रेठरेधरण, ता. वाळवा आणि सचिन पाटील (रा. ईश्वरपूर) असे संशयित आरोपींची नावे आहेत. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, पीडित तरु णी मूळची सातारा जिल्ह्यातील असून, सध्या ईश्वरपूर येथे राहून इंजिनिअरिंगचे शिक्षण घेत आहे. ईश्वरपूर पोलिसांनी दिलेली माहिती अशी, संशयितांनी तरुणीला ईश्वरपूर-कामेरी रस्त्यावरील एका लाजवर नेले. तेथे तिला शीतपेयातून गुंगीचे औषध पाजल्याचा आरोप आहे. त्यानंतर दोघांनी तिच्या इच्छेविरु द्ध अत्याचार केल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. घडलेला प्रकार कोणाला सांगितल्यास जीवे मारण्याची धमकी देत मारहाण केल्याचाही आरोप तरु णीने केला आहे. या घटनेनंतर पीडितेने ईश्वरपूर पोलिसांत तक्रार दाखल



केली. त्यानुसार संशयितांविरुद्ध सामूहिक बलात्कारासह संबंधित कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवत शार्दुल पाटील याला अटक केली. फरार संशयित प्रथम पाटील याचा शोध सुरू असून, घटनेमागील नेमकी पार्श्वभूमी आणि इतर बाबींचा तपास पोलीस करीत आहेत.

### भर रस्त्यात विद्यार्थिनीवर तरुणाकडून खंजीरने हल्ला; भाग्यनगर रस्त्यावरील घटना

नांदेड : शहरातील भाग्यनगर रस्त्यावरील आयआयबी क्लासेससमोरील रस्त्यावर एका अठरा वर्षीय विद्यार्थिनीवर तरू णाने खंजरने ३ वार केल्याची धक्कादायक घटना सोमवार, दि. ५ ऑक्टोबर रोजी दुपारी घडली. या हल्ल्यात दीक्षा भगत (रा. दीपकनगर) ही विद्यार्थिनी गंभीर जखमी झाली असून, तिला पुढील उपचारासाठी खासगी हास्पिटलमध्ये दाखल करण्यात आले आहे. या घटनेमुळे कोचिंग क्लासेस परिसरात एकच खळबळ उडाली.मिळालेल्या माहितीनुसार, रोहित शिवाजी पोहरे हा युवक दीक्षा भगत हिला ओळखत होता. त्याने दीक्षाला आपण लग्न करू, तसेच तू मला आवडतेस असे सांगितले. मात्र, दीक्षाने त्याला नकार दिला. त्यानंतर सोमवारी दुपारी भाग्यनगर रस्त्यावरील आयआयबी क्लासेससमोरील रस्त्यावर अभ्युदय बँकेजवळ रोहितने दीक्षाला गाठले आणि तिच्यावर खंजरने हल्ला केला.त्याने तिच्यावर तीन वार केल्याने ती गंभीर जखमी होउन खाली कोसळली. घटनेची माहिती मिळताच भाग्यनगर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक संकेत सवराते हे कर्मचा-यांसह तातडीने घटनास्थळी दाखल झाले. गंभीर जखमी अवस्थेतील दीक्षा भगत हिला उपचारासाठी एका खासगी हास्पिटलमध्ये दाखल केले. दरम्यान, या प्रकरणी भाग्यनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती. कोचिंग क्लासेसच्या परिसरात भरदिवसा तरु णीवर झालेल्या या हल्ल्यामुळे विद्यार्थी, पालक तसेच परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

## 'एमपीएससी'वर कारवाईचा मार्ग मोकळा

**मुंबई/प्रतिनिधी :** एमपीएससी आयोगाचे माजी आणि विद्यमान अध्यक्ष, तसेच सदस्यांविरोधात संविधानाच्या कलम ३१७ नुसार कारवाई करण्यासाठी एक विशेष समिती गठीत करण्याची शिफारस मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यपाल जिष्णूदेव वर्मा यांच्याकडे केली आहे.उच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायाधीशांच्या अध्यक्षतेखाली ही समिती स्थापन करू न तीन महिन्यांत अहवाल मागवावा आणि त्यातील निष्कर्षांच्या आधारे पुढील कठोर कारवाई करावी,



अशी विनंती देवेंद्र फडणवीस यांनी या शिफारशीद्वारे केली आहे. मुख्यमंत्र्यांच्या या मोठ्या निर्णयानंतर आता एमपीएससी आयोगाचे अध्यक्ष आणि सदस्यांच्या अडचणी वाढण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. गेल्या काही दिवसांपासून एमपीएससीकडून घेतल्या जाणा-या विविध परीक्षांमध्ये सातत्याने घोळ सुरू असल्याच्या तक्रारी येत आहेत. यामुळे राज्यातील वातावरण चांगलेच तापले असून पुण्यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांच्या नेतृत्वात विद्यार्थ्यांचे मोठे आंदोलन सुरू आहे. संतप्त विद्यार्थ्यांकडून एमपीएससी आयोगाच्या अध्यक्षांच्या राजीनाम्याची जोरदार मागणी केली जात असून विरोधी पक्षांनीही या आंदोलनाला आपला जाहीर पाठिंबा दर्शवला आहे. या सर्व घडामोडींच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्र्यांनी उचललेले हे पाउल आंदोलकांसाठी एक मोठे यश मानले जात आहे.- या सर्व वाढत्या दबावाच्या आणि आंदोलनांच्या पार्श्वभूमीवर आता राज्य सरकारकडून कारवाईसाठी मोठे पाउल उचलण्याची तयारी सुरू झाल्याचे स्पष्ट झाले आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांनी राज्यपालांना समिती गठीत करण्याची शिफारस केल्याने, एमपीएससी परीक्षांमधील अनियमिततेच्या प्रकरणाला आता एक नवे आणि निर्णायक वळण मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

पान १ व १० वरून

### बॅलेट पेपरवर निवडणुका झाल्या

झालेल्या गुन्ह्याबद्दल केंद्र व राज्य सरकारवर चौफेर हल्ला चढवला. जर सत्ताधाऱ्यांमध्ये आणि निवडणूक आयोगात हिंमत असेल तर आगामी सर्व निवडणुका बॅलेट पेपरवर घेऊन दाखवाव्यात. ईव्हीएम मधील घोळ आणि मतचोरी थांबल्यास भाजपला त्यांची खरी जागा जनता दाखवून देईल, असा थेट इशारा अरविंद सावंत यांनी शेवटी दिला.

### 16 ऑक्टोबरपासून राज्यभरात

भविष्यात पाणीटंचाई निर्माण झाल्यास त्याचा थेट परिणाम नागरिकांवर होउ नये, यासाठी प्रत्येक धरणातील पाणीसाठ्याचे सूक्ष्म नियोजन करण्यात आले आहे. सरकारच्या माहितीनुसार, सन २०१६ च्या खरीप हंगामातील ट्रिगर-१ लागू झालेल्या राज्यातील २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे.

**पिण्याच्या पाण्यासाठी राखीव साठा-**बाष्पीभवन, गाळ तसेच अनधिकृत पाणी उपसा यामुळे प्रत्यक्ष उपलब्ध पाण्यात होणारी घट लक्षात घेउन ३१ ऑगस्ट २०२७ पर्यंत पिण्याच्या पाण्याचा साठा राखून ठेवला जाणार आहे. भविष्यातील अनिश्चित परिस्थितीचा सामना करण्यासाठी प्रत्येक धरणात १० टक्के अतिरिक्त आपत्कालीन बफर साठा ठेवण्याचे नियोजन करण्यात आले आहे. परिस्थिती अत्यंत गंभीर झाल्यास तांत्रिक तपासणीनंतर मृतसाठ्यातील पाण्याचाही वापर करण्याचा पर्याय खुला ठेवण्यात आला आहे.

**शेतीसाठी पाण्याचे प्राधान्यक्रम निश्चित-**दुष्काळी परिस्थितीत शेतीसाठी उपलब्ध होणा-या पाण्याचेही नियोजन करण्यात आले आहे. सर्वप्रथम पिण्याचे पाणी, जनावरांसाठी पाणी आणि चा-याची गरज भागवली जाईल. त्यानंतरच उर्वरित पाण्याचा सिंचनासाठी वापर केला जाणार आहे. रबी हंगामात प्रथम भुसार आणि चारा पिकांना पाणी देण्यास प्राधान्य राहील. त्यानंतर इतर रबी पिकांचा विचार केला जाईल. पाणीसाठा उपलब्ध राहिल्यासच बारमाही पिकांना पाणी देण्यास मंजुरी दिली जाणार आहे.

**उद्योगांनाही पाणी वापराबाबत निर्बंध-**औद्योगिक क्षेत्रासाठीही सरकारने पाणी वापराबाबत महत्त्वाचा निर्णय घेतला असून उद्योगांमध्ये वापरल्या जाणा-या पाण्यापैकी किमान ३० टक्के पाण्याचा पुनर्वापर किंवा पुनर्चक्रण करणे बंधनकारक करण्यात आले आहे. त्यामुळे उपलब्ध गोड्या पाण्यावरील उद्योगांचा दबाव कमी करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

**अनधिकृत पाणी उपशावर कायदेशीर कारवाई-** धरणे, नद्या आणि कालव्यांमधून होणारा अनधिकृत पाणी उपसा रोखण्यासाठीही कठोर कारवाई केली जाणार आहे. यासाठी महसूल, पोलिस आणि जलसंपदा विभागाची संयुक्त पथके तयार करू न गस्त घालण्यात येणार आहे. उपशासाठी वापरले जाणारे पंप आणि इतर साहित्य जप्त केले जाणार आहेत.

### 8 कोटी 25 लाखांचे

सूक्ष्म नियोजन करण्याचे आदेश दिले आहेत. राज्यातील पावसाचे घटलेले प्रमाण तसेच एल निनोचे संकट या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने पाणी नियोजनाचा मास्टर प्लॅन जाहीर केला आहे. राज्यातील पाण्याचे ३१ ऑगस्ट २०२७ पर्यंत नियोजन करण्याचे आदेश जलसंपदा विभागाचे मंत्री गिरीश महाजन यांनी दिले आहेत.राज्यातील धरणे आणि जलाशयातील पाण्याचा पहिला हक्क लोकांना पाणी पिण्याचे पाणी पुरवण्यासाठी केला जाणार आहे. तसेच राज्यातील जलाशयातील १० टक्के पाणी बफर स्टाक म्हणून राखीव ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहे. तर दुसरीकडे मात्र, मुंबई महानगर पालिकेने शहरातील रस्ते पाण्याने धुण्यासाठी ८ कोटी २५ लाख ३३ हजार ४८ रु पयांचे कंत्राट काढले आहे.मुंबईत आता दररोज रस्ते धुण्याकरता पाण्याचा वापर केला जाणार आहे. मुंबई महापालिकेच्या स्थायी समितीत ८ कोटी २५ लाखांच्या पाणी टँकर खर्चाचा प्रस्ताव समोर आला आहे. एकीकडे राज्य दुष्काळाच्या झळा झेलत असताना तसेच मुंबईतच १० टक्के पाणीकपात लागु असताना रस्ते धुण्यासाठी पाणी आणणार कुठून हा प्रश्न निर्माण झाला आहे. रस्ते धुण्याकरता जेटिंग व्यवस्थेसह पाण्याचे टँकर भाडेतत्त्वावर घेण्यात येणार आहेत.

मुंबईतील सार्वजनिक रस्त्यांवरील धूळ आणि वायू प्रदूषण नियंत्रणासाठी मुंबई महानगर पालिकेने मुंबईतील रस्ते दररोज धुण्याचा निर्णय घेतला आहे. मुंबईतील ७ परिमंडळांमध्ये १५० दिवसांसाठी टँकर सेवा दिली जाणार आहे. पावसाळ्याचा कालावधी वगळून रस्ते धुण्याचे नियोजन करण्यात येणार आहे. २ हजार, ५ हजार आणि १० हजार लिटर क्षमतेचे टँकर या कामासाठी वापरले जाणार आहे. सातही परिमंडळांसाठी एकूण कंत्राटाचा खर्च ८ कोटी २५ लाख ३३ हजार ४८ रु पये असणार आहे.

### 'कोरोनापेक्षा राज्यातील दुष्काळाचे

समस्या व निवडणुकीवर लक्ष केंद्रित करावे, असेही त्यांनी सांगितले. विदर्भाचा कार्यकर्ता म्हणून आपण स्वत? निवडणूक यंत्रणेवर लक्ष ठेवणार असून दररोज किती मतदारांची नोंदणी केली, याची माहिती एसएमएसद्वारे देण्याच्या सूचनाही त्यांनी केल्या.भाजपचे माजी आमदार अनिल सोले यांना उमेदवारी न मिळाल्याने काहीशी निराशा झाली असली तरी ते पक्षाचे नेते आहेत. पक्षाने उमेदवार निश्चित केल्यानंतर सर्वांनी एकत्रित काम करणे अपेक्षित आहे. आपण स्वत? सोले यांच्याशी चर्चा करू न निवडणुकीत सहकार्य करण्याची विनंती करणार असल्याचे बावनकुळे यांनी सांगितले.

**एमपीएससी आंदोलनावरु न काँग्रेसवर टीका-**एमपीएससी विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर सरकारची भूमिका सकारात्मक असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विद्यार्थ्यांनी मांडलेल्या प्रश्नांवर निर्णय घेतले आहेत. तरीही काही आंदोलन सुरू असून काँग्रेसकडून चिथावणीखोर वक्तव्ये केली जात असल्याचा आरोप बावनकुळे यांनी केला. विद्यार्थ्यांच्या भवितव्याचा प्रश्न राजकारणासाठी वापरू नये, असे ते म्हणाले.

**कर्जमाफी शेवटच्या शेतक-यापर्यंत पोहोचविण्यासाठी प्रयत्न-** केवायसी किंवा ॲग्रीस्टॅक कार्डाच्या कारणामुळे कर्जमाफीपासून वंचित राहिलेल्या सुमारे दहा टक्के शेतक-यांनाही कर्जमाफीचा लाभ देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. कर्जमाफी शेवटच्या शेतक-यापर्यंत पोहोचविण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याची माहिती बावनकुळे यांनी दिली.

### संशोधनासाठी 3 शास्त्रज्ञांना

शरीरविज्ञान अथवा वैद्यकशास्त्रातील नोबेल पारितोषिक म्हणून ओळखले जाते. हा पुरस्कार १९०१ पासून दिला जातो.२०२५ मध्ये कुणाला मिळाला होता हा पुरस्कार? -२०२५ मध्ये वैद्यकशास्त्रातील नोबेल पुरस्कार मॅरी ई. ब्रु नको, फ्रेड रॅम्सडेलआणि शिमोन साकागुची यांना देण्यात आला होता. त्यांनी 'पेरिफेरल इम्यून टालरन्स' संदर्भात महत्त्वाचे संशोधन केले होते. यामुळे शरीराच्या रोगप्रतिकार प्रणालीला अनियंत्रित होण्यापासून आणि बाह्य आक्रमकांऐवजी स्वतःच्याच उतींवर अथवा पेशींवर हल्ला करण्यापासून रोखण्यास मदत होते.

### आज अंगणवाडी कर्मचा-यांचा

नसल्याचा आरोप संघटनेने केला आहे. प्रोत्साहन भत्त्याची रक्कम मानधनात वर्ग करू न ती दरमहा देण्यात यावी, अशी मागणीही करण्यात आली आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचा दाखला देत अंगणवाडी कर्मचा-यांना शासकीय कर्मचा-यांचा दर्जा देउन तृतीय व चतुर्थ श्रेणीतील वेतन व भत्ते देण्यात यावेत, अशी मागणी संघटनेने केली आहे. अंगणवाडी कर्मचा-यांच्या या विविध मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी ६ ऑक्टोबर रोजी राज्यभरातील अंगणवाडी कर्मचारी एकदिवसीय संप पुकारणार आहेत. त्यानंतर मुंबईतील आझाद मैदानावर शक्तिप्रदर्शन आणि जेल भरो आंदोलन करण्यात येणार असल्याचे संघटनेने स्पष्ट केले आहे. प्रलंबित मागण्यांवर शासनाने तातडीने निर्णय घ्यावा, यासाठी हे आंदोलन करण्यात येत असल्याचे संघटनेचे चिटणीस राजेश सिंह यांनी सांगितले.

### दोघांचा होरपळून मृत्यू,

तर १०-१२ जण जखमी झाले आहेत जखमींना हिंगोलीच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. तर, मृत्यू झालेल्यांचे मृतदेह देखील रु ग्णालयात आणण्यात आले आहेत. या घटनेनं परिसरात खळबळ उडाली असून प्रशासन खडबडून जागे झाल्याचं पाहायला मिळत आहे. तीन घरांना लागली आग-दरम्यान, या दुर्घटनेत हिंगोली शहरातील ३ घरात आग लागली असून आगीत दोन जणांचा होरपळून मृत्यू झाला आहे, तर १०-१२ जण गंभीर जखमी असल्याची माहिती आहे. घरात फटाके असल्याने फटाक्यांना आधी आग लागली, त्यानंतर घरात आग भडकत केली. फटाक्यामुळे आग विझवायला अडथळा झाला होता, काहीच क्षणात आगीने रौद्ररू प धारण केले. फटाक्यांना नेमकं आग कशामुळे लागली हे अद्याप अस्पष्ट आहे. मात्र, घटनेनंतर अग्निशामक दलाच्या वतीने आग विझवण्याचे युद्ध पातळीवर प्रयत्न सुरु होते.

### 'इंडिया' आघाडीचा आज

**१९ पक्षांकडे लोकसभेत १७८ खासदार-** इंडिया ब्ल ?कचे १९ पक्ष मोर्चा काढणार आहेत. त्यांच्याकडे लोकसभेत १७८ आणि राज्यसभेत ६२ खासदार आहेत. हे पक्ष आहेत काँग्रेस, समाजवादी पार्टी, टीएमसी, एनसीपी (एसपी), शिवसेना (यूबीटी), आरजेडी, सीपीएम, सीपीआय, एनसी, पीडीपी, जेएमएम, सीपीआय-एमएल, आययूएमएल, केसी (एम),एमडीएमके, व्हीसीके, आरएसपी, एआयएफबी आणि केसी (जे).

### किरण सरनाईक शिंदे सेनेचे उमेदवार

सरनाईक यांना उमेदवारी दिली आहे आणि आजच नामांकन दाखल करण्यात आले आहे. त्यांनी सरनाईक यांच्या विजयाचा पूर्ण विश्वास व्यक्त केला.पत्रकारांनी जेव्हा त्यांना विचारले की, शिवसेनेचेच माजी आमदार प्रा. श्रीकांत देशपांडे यांनीही उमेदवारी अर्ज दाखल केला आहे, त्यावर ते म्हणाले की बंडखोरी नाही होणार याचा आम्हाला विश्वास आहे. शिंदे सेनेचे सर्व पदाधिकारी पार्टीने निवडलेल्या उमेदवाराचा साथ देतील.

### ऑनलाइन गेमिंगच्या आड तीन

कवच'अंतर्गत सायबर जनजागृती तसेच गुन्ह्यांच्या तपासावर विशेष भर देण्यात येत आहे. त्याचदरम्यान शिरजगाव पोलिस ठाण्यात सायबर गुन्हा दाखल करण्यात आला. या गुन्ह्याचा पुढील तपास सायबर पोलिस ठाणे, अमरावती ग्रामीणकडे सोपविण्यात आला. गुन्ह्याच्या तपासादरम्यान तांत्रिक माहितीचे सखोल विश्लेषण आणि आर्थिक व्यवहारांची पडताळणी करण्यात आली. त्यातून आरोपींच्या पुढील साखळीचे धागेदोरे पुण्यापर्यंत पोहोचल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर अमरावती ग्रामीण सायबर पोलिसांचे पथक पुण्यात दाखल झाले. पुण्यातील धायरी परिसरातील यमुना ताई पोखळे नगर येथील अर्णव हाईट्समधील एका सदनिकेवर पोलिसांनी छापा टाकला.

या कारवाईत तीन आरोपींना अटक करण्यात आली. अटक आरोपीमध्ये भूषण सुभाषराव दंडाळे (वय २३, रा. कुर्डी, पो. सुरळी, ता. वरुड), रोशननंद राजू दंडाळे (२८, रा. वॉर्ड क्रमांक १, सावंगा, ता. वरुड), अंकित विठ्ठलराव मसुळे (२६,रा. वॉर्ड क्रमांक १, जरुड, ता. वरुड), यांचा समावेश आहे. या कारवाईनंतर सदर गुन्ह्यात आतापर्यंत अटक करण्यात आलेल्या आरोपींची संख्या सात झाली आहे. पोलिसांनी केलेल्या प्राथमिक तपासणीत जप्त मोबाईल आणि लॅपटॉपचा ऑनलाइन गेमिंग व बेटिंगशी संबंधित व्यवहारांसाठी तसेच डिजिटल माध्यमांच्या वापरासाठी उपयोग झाल्याचे समोर आले आहे. या उपकरणांचे डिजिटल आणि फॉरेन्सिक विश्लेषण सुरू असून, त्यातून आर्थिक व्यवहार, आरोपींचे संपर्क, व्यवहारांची साखळी आणि गुन्ह्यात सहभागी असलेल्या अन्य व्यक्तींची माहिती मिळविण्याचा प्रयत्न सुरू आहे.

**तीन कोटींच्या व्यवहारांचा तपास-** गुन्ह्याच्या आर्थिक तपासादरम्यान उपलब्ध बँक व्यवहारांचे प्राथमिक विश्लेषण करण्यात आले. त्यातून आतापर्यंत सुमारे तीन कोटी रुपयांची सायबर फसवणूक झाल्याचे पोलिसांच्या प्राथमिक तपासात निष्पन्न झाले आहे. संबंधित बँक खाती, व्यवहारातील लाभार्थी, अंतिम लाभार्थी आणि आर्थिक व्यवहारांच्या साखळीशी संबंधित अन्य व्यक्तींचा शोध घेतला जात आहे. तपास पुढे जात असताना आणखी आर्थिक व्यवहार आणि आरोपी निष्पन्न होण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे.

### जिल्हा बँकेत प्रशासक नियुक्तीचा

संचालकांची याचिका फेटाळून लावली. हायकोर्टाच्या या निर्णयामुळे विद्यमान संचालक मंडळाचा कार्यकाळ निवडणुकीपर्यंत वाढवण्याच्या आशेला धक्का बसला आहे.

दरम्यान, जिल्हा बँकेच्या आगामी निवडणुकीची प्रक्रियाही पुढे सरकत आहे. प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध झाल्यानंतर त्यावर आलेल्या आक्षेप व सूचनांची प्रक्रिया सुरू आहे. सहकार विभागाच्या वेळापत्रका नुसार १४ ऑक्टोबर रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध केली जाणार आहे. त्यानंतर निवडणुकीचा पुढील कार्यक्रम स्पष्ट होण्याची शक्यता आहे.अशा परिस्थितीत हायकोर्टाचा हा निर्णय बँकेच्या आगामी प्रशासकीय व्यवस्थेसोबतच निवडणूक प्रक्रियेच्या दिशेनेही महत्त्वाचा ठरला आहे. आता सहकार विभाग न्यायालयाच्या निर्णयानंतर बँकेच्या कारभाराबाबत काय पाऊल उचलते आणि निवडणूक प्रक्रिया कोणत्या गतीने पुढे जाते हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

### लक्ष केंद्रित केल्याने मिळाले यश,

एशियन गेम्समध्ये आतापर्यंतचे सर्वाधिक मेडल जिंकले आहेत. भारताला मेडल मिळवून देण्याचा तो क्षण अभिमानाने भरलेला आहे. इतक्या देशांमध्ये आपल्या भारताचा तिरंगा फडकवणे अभूतपूर्व राहिले. यशदीपच्या मते सरकारने खेळाडूंसाठी उत्तम व्यवस्था केली आहे. आज चांगल्या खेळाडूंना सर्व शक्य मदत केली जात आहे, ज्यामुळे ते यश मिळवत आहेत.यावेळी आर्चरीचे महाराष्ट्र सचिव प्रमोद चांदूरकर यांनी सांगितले की, १९८१ पासून तिरंदाजीची सुरुवात झाली आणि १९८२ मध्ये भारताचे प्रतिनिधित्व करणारी पहिली टीम अमरावतीचीच गेली होती. त्यांनी सांगितले की, या एशियन गेम्समध्ये जिंकल्यामुळे आता ऑलिम्पिकचे दरवाजे खुले झाले आहेत आणि आता खेळाडूंचे लक्ष्य ऑलिम्पिकमध्ये गोल्ड जिंकण्याचे आहे. पत्रकार परिषदेमध्ये आर्चरी असोशिएशनचे अध्यक्ष एड. प्रशांत देशपांडे आणि त्यांचे प्रशिक्षक टीम देखील उपस्थित होते.

### अंजनगाव सुर्जी तालुक्यात

सोयाबीन नष्ट झाल्यासारखे झाले आहे. विशाल यांनी युको बँक रहिमापुर चिंचोली शाखेचे कर्ज घेतले होते, अशी माहिती समोर आली आहे. यावर्षी तालुक्यात पावसाने पाठ फिरवल्याने दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यांच्या शेतातील पीक पूर्णपणे वाया गेल्याने हातातोंडाशी आलेला घास हिरावला गेला.कर्जाची परतफेड कशी करायची या विवंचनेत विशाल गेल्या काही दिवसांपासून होते, असे गावकऱ्यांनी सांगितले.केवळ शेतकरीच नव्हे, तर गावातील शेतमजुरांवरही दुष्काळाचे सावट आहे. पिके न आल्याने शेतात कामे नाहीत, त्यामुळे मजुरांना रोजगार मिळणे कठीण झाले आहे. एकूणच कुंभारगावसह संपूर्ण तालुक्यात चिंताजनक परिस्थिती आहे. विशाल हा घरातील कर्ता मुलगा होता. त्याच्या पश्चात आई-वडील आहेत. एकुलता एक मुलगा कर्जामुळे गेल्याने आई-वडिलांना मोठा धक्का बसला असून त्यांचा आक्रोश हृदय पिळवटून टाकणारा आहे. या घटनेमुळे संपूर्ण कुंभारगावावर शोककळा पसरली आहे.

### एमआयडीसीतील चोरीचा छडा;

येत आहे. जाधव स्टिल अलॉयजचे व्यवस्थापक अमोल दादाराव पुंड (वय ३९, रा. जलाराम नगर, अमरावती) यांनी याबाबत राजापेठ पोलीस ठाण्यात तक्रार दिली होती. १३ सप्टेंबर रोजी सायंकाळी साडेसात वाजताच्या सुमारास कंपनीच्या कंपाउंडजवळ ठेवलेले एस.एस. प्लेट, लोखंडी राउंड बार, रॉफ्ट, चॅनल, अँगल तसेच मोल्डिंग बॉक्स असा सुमारे १ लाख ३० हजार रुपयांचा मुद्देमाल अज्ञात चोरट्याने लंपास केला होता. या तक्रारीवरून राजापेठ पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ७९८/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०३(२) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्ह्याचा तपास सुरू असताना पोलिसांना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे आरोपीचा माग काढण्यात आला. वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक नितीन शिंदे आणि डीबी पथकाने कारवाई करीत मोहित कल्ली राणा (वय १८, रा. प्रभू कॉलनी, उत्तम नगर, अमरावती) याला अटक केली. त्याच्याकडून चोरीचा मुद्देमाल तसेच गुन्ह्यात वापरलेली सुझुकी ॲक्सेस-१२५ मोपेड जप्त करण्यात आली. पोलिसांनी जप्त केलेल्या मुद्देमालामध्ये चार एस.एस. प्लेट, सहा लोखंडी राउंड बार, लोखंडी अँगल व त्याचे तुकडे, दोन लोखंडी चॅनल तसेच काळ्या रंगाची सुझुकी ॲक्सेस-१२५ मोपेड (एमएच २७ ईजी ७७३०) यांचा समावेश आहे. या सर्व मुद्देमालाची एकूण किंमत सुमारे १ लाख ३२ हजार ५०० रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले.या गुन्ह्यातील आर्यन बोरकर (वय १८, रा. महादेवखोरी, अमरावती) याच्यासह आणखी एका आरोपीचा शोध सुरू आहे. ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त श्याम घुगे, सहायक पोलीस आयुक्त संजय खटाळे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण, पोलीस निरीक्षक उमेश मुंढे, सहाय्यक पोलीस निरीक्षक नितीन शिंदे तसेच राजापेठ पोलीस ठाण्यातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी केली.

### निवडणूक आयोगाच्या

येत आहे. तसेच निवडणूक आयोगाच्या सामूहिक निर्णयप्रक्रियेबाबतही प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत. या पार्श्वभूमीवर इंडिया आघाडीने आंदोलनाचा निर्णय घेतला.

या मागण्यांकडे शासनाचे आणि प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी इर्विन चौक येथून जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत ८ ऑक्टोंबर रोजी मोर्चा काढण्यात येणार आहे. मोर्चानंतर जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर करण्यात येणार असल्याची माहिती बैठकीत देण्यात आली.

बैठकीस काँग्रेसचे बबलू देशमुख, सुनील देशमुख, खासदार बळवंतराव वानखडे, बबलू शेखावत, विलास इंगोले, वीरेंद्र जगताप, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष डॉ. राजीव जामठे, ग्रामीण जिल्हाध्यक्ष अनिल जळमकर, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे सुभाष पांडे, भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे रमेश सोनुले, सुनील मेटकर आणि भाकपचे राज्य सचिव तुकाराम भस्मे यांच्यासह इंडिया आघाडीतील पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

### धनादेश अनादर ȣाकरणात जितु

तक्रारकर्त्यातर्फे साक्ष व संबंधीत कागदपत्रे दाखल करुन ती सिध्द करण्यात आली. आरोपीने आपले बचावात नगदी जमा बाबत कोणत्याही व्यवहार झाले नसल्याचे बचाव घेतला. आरोपीचे बचावासाठी त्याला पुरेपुर संधी देवून सुध्दा आरोपी त्याचा दोष नसल्याचे सिध्द करु शकला नाही. न्यायालयाने सदरचे बचाव योग्य नसल्याने व तक्रारकर्त्याचे अधिवक्ता ॲड. प्रदिप चांडक यांनी मांडलेले मुद्दे ग्राहय धरले व त्यानुसार सदरचा धनादेश हा आरोपीने त्याचेवर असलेल्या जबाबदारी पोटी दिला असल्याचे व दोष सिध्द झाल्याने न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, न्यायालय क्र.४, अमरावती डॉ. पद्माकर के. धोंडगे यांनी आरोपीला ४ महिने साध्या कैदीची व दंड म्हणून रक्कम रु. ४,००,०००/- व त्यावर ९ टक्के द.सा.द.शे. दराने व्याज तक्रार दाखल केल्यापासुन सदरची रक्कम अदा करेपर्यंत तक्रारदाराला देण्याचा न्यायनिर्णय पारित केला. सदरची रक्कम न दिल्यास १ महिने अतिरीक्त साधी कैदेची शिक्षा जितु उर्फ जितेंद्र सुरेश केशवानी, यांना घोषित केली आहे. तकारकर्त्या तर्फे ॲड.पी.आर.चांडक यांनी बाजु मांडली व त्यांना त्यांचे सहकारी ॲड. सुमित कनोजिया, ॲड. अंकुश शिरभाते, यांनी सहकार्य केले.

### अशोक खटाळे यांना ȣसमाजरत्न

सभासद आणि ३५ लक्ष निधी उभारण्यासाठी त्यांनी सात महिने ऊन-वारा-पावसाची तमा न बाळगता संपूर्ण अमरावती जिल्हा पिंजून काढला. त्यांच्या याच निस्वार्थ सेवेची दखल घेऊन त्यांना हा सन्मान देण्यात आला.

### युवकाच्या पोटात धारदार

माग काढण्यास सुरुवात केली. हल्ल्यामागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. हल्लेखोरांची ओळख पटवून त्यांना ताब्यात घेण्यासाठी फ्रेजरपुरा पोलिसांसह शहर गुन्हे शाखेचे पथक सक्रिय करण्यात आले आहे. परिसरातील उपलब्ध माहितीच्या आधारे आरोपींचा शोध सुरू असून, या प्रकरणी फ्रेजरपुरा पोलीस ठाण्यात हल्लेखोरांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### नागरिकांच्या प्रश्नांसाठी आमदार

प्रशासनाने तत्परतेने कार्यवाही करून नागरिकांना दिलासा द्यावा, अशी भूमिका आमदार काळे यांनी मांडली. यानंतर पंचायत समिती, चिखलदरा येथे सुरू असलेल्या विविध कामांचा आढावा घेण्यात आला. या बैठकीत ग्रामीण भागातील विकासकामांची सद्यस्थिती, कामांची प्रगती आणि नागरिकांना मिळणाऱ्या सुविधांबाबत चर्चा करण्यात आली.

तालुक्यातील घरकुलांचे रखडलेले हप्ते, मजुरांच्या मस्टरचे प्रलंबित पैसे, दुष्काळी परिस्थिती आणि पाणीटंचाई या गंभीर प्रश्नांवरही आमदार काळे यांनी अधिकाऱ्यांचे लक्ष वेधले. लाभार्थी व मजुरांना त्यांच्या हक्काचे पैसे वेळेत मिळावेत तसेच पाणीटंचाईग्रस्त गावांमध्ये आवश्यक उपाययोजना तातडीने करण्यात याव्यात, अशी मागणी त्यांनी केली.

दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर ग्रामीण भागातील नागरिकांना कोणत्याही प्रकारच्या अडचणींचा सामना करावा लागू नये, यासाठी प्रशासनाने समन्वयाने काम करावे, असेही आमदार काळे यांनी स्पष्ट केले. नागरिकांच्या समस्या प्रत्यक्ष जाणून घेत त्या सोडविण्यासाठी संबंधित विभागांशी सातत्याने पाठपुरावा केला जाईल, अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली.यावेळी चिखलदरा तहसीलदार जीवन मोरणकर, गटविकास अधिकारी विनोद खेडकर, तालुकाध्यक्ष आलोक अलोकार, दिनेश चव्हाण, हिरू हेकडे, शैलेश म्हाला, यशवंत काळे, स्वप्नील भक्ते, अभिषेक राठोड, सुभाष अमोदे, श्रीराम आठवले, महादेव शनवरे, स्वीय सहाय्यक आकाश खैरकर यांच्यासह पदाधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### परतवाडा विदर्भ मील

विस्कळीत झाली होती. टेम्पोतील अनेक प्रवाशी जखमी झाले आहे. जखमी रुग्णांना अचलपूर उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. हे सर्व मजूर मेळघाट मधील असल्याची माहिती समोर आली आह. पुढील तपास पोलिस विभाग करीत आहे. मात्र अवैध वाहतुकीचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले असून पोलिस विभागाचे याकडे दुर्लक्ष होत असल्याचे या प्रकारावरून स्पष्ट होते . परतवाडा - अमरावती महामार्गाचे रुंदीकरण कधी होणार ? विदर्भ मील परिसरात वाढते वाहनाचे अपघाताच्या घटनेवर अंकुश कधी लागणार ? यासाठी स्थानिक प्रशासन ठोस उपाययोजना कधी राबविणार ? असे अनेक प्रश्न निर्माण झाले आहे.या घटनेची माहिती मिळताच आमदारा केवलराम काळे यांच्या मार्गदर्शनात कार्यकर्ते मंडळी ,रुग्णसेवक सोमेश खानझोडे आणि शुभम खेरडे यांच्या रुग्णवाहिकेतून जखमी प्रवाश्यांना शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले.यावेळी नागरिकांची प्रचंड गर्दी घटनास्थळी जमा झाली होती.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय
अकोला । वाशिम । बुलडाणा
■ मंगळवार, ६ ऑक्टोबर २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४
paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com

# खडकी सदारच्या नाल्यात घाणीचे साम्राज्य ; ग्रामपंचायतीच्या दुर्लक्षाचा नागरिकांचा आरोप

## दुर्गंधीने नागरिक त्रस्त ; डासांच्या प्रादुर्भावामुळे आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर

■ प्रतिनिधी | रिसोड ■

रिसोड तालुक्यातील खडकी सदार येथील नाल्यात मोठ्या प्रमाणात घाण व कचरा साचल्याने परिसरात अस्वच्छतेचे चित्र निर्माण झाले आहे. नाल्याची वेळेवर साफसफाई होत नसल्याने परिसरात दुर्गंधी पसरत असून, नाल्यालगत राहणाऱ्या नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. रात्रीच्या वेळी नाल्यातून येणाऱ्या दुर्गंधीमुळे आजूबाजूच्या घरांतील नागरिक हैराण झाले आहेत. साचलेल्या घाणीमुळे डासांचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता असून, मलेरिया, डेंग्यू यांसारख्या आजारांचा संभाव्य धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्याची जबाबदारी नेमकी कोणाची, असा सवाल उपस्थित होत आहे. नाल्यांची स्वच्छता, कचरा हटविणे आणि सार्वजनिक परिसरात आवश्यक स्वच्छता उपाययोजना करणे ही ग्रामपंचायतीची मूलभूत प्रशासकीय जबाबदारी आहे. मात्र, खडकी सदार येथील नाल्याच्या सद्यस्थितीवरून या जबाबदारीची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याची तक्रार नागरिकांकडून केली जात आहे.

### जबाबदारी निश्चित करून तातडीने कार्यवाहीची गरज

नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण होण्याची वाट न पाहता ग्रामपंचायतीने नाल्याची तातडीने साफसफाई करणे, साचलेला कचरा हटविणे, डास प्रतिबंधक उपाययोजना करणे आणि पुढील काळात नियमित स्वच्छतेचे वेळापत्रक निश्चित करणे आवश्यक आहे. संबंधित अधिकारी व ग्रामपंचायत प्रशासनाने या कामाची जबाबदारी निश्चित करून अंमलबजावणी होत आहे की नाही, यावर देखरेख करणे गरजेचे आहे.

'नाला साफ करण्यासाठी नेमका मुहूर्त कधी?' हा प्रश्न आता केवळ नागरिकांचा राहिलेला नसून ग्रामपंचायत प्रशासनाने त्याचे उत्तर कृतीतून देण्याची वेळ आली आहे. स्वच्छता न झाल्यास नागरिकांनी संबंधित वरिष्ठ प्रशासनाकडे तक्रार करून या प्रश्नाचा पाठपुरावा करावा, अशी मागणीही पुढे येत आहे. खडकी सदार : येथील नाल्यात मोठ्या प्रमाणात घाण व कचरा साचल्याने परिसरात अस्वच्छतेचे चित्र निर्माण झाले आहे. नाल्याची वेळेवर साफसफाई होत नसल्याने परिसरात दुर्गंधी पसरत असून, नाल्यालगत राहणाऱ्या नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. रात्रीच्या वेळी नाल्यातून येणाऱ्या दुर्गंधीमुळे आजूबाजूच्या घरांतील नागरिक हैराण झाले आहेत. साचलेल्या घाणीमुळे डासांचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता असून, मलेरिया, डेंग्यू यांसारख्या आजारांचा संभाव्य धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्याची जबाबदारी नेमकी कोणाची, असा सवाल उपस्थित होत आहे.

नाल्यांची स्वच्छता, कचरा हटविणे आणि सार्वजनिक परिसरात आवश्यक स्वच्छता उपाययोजना करणे ही ग्रामपंचायतीची मूलभूत प्रशासकीय जबाबदारी आहे. मात्र, खडकी सदार येथील नाल्याच्या सद्यस्थितीवरून या जबाबदारीची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याची तक्रार नागरिकांकडून केली जात आहे.

### जबाबदारी निश्चित करून तातडीने कार्यवाहीची गरज

नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण होण्याची वाट न पाहता ग्रामपंचायतीने नाल्याची तातडीने साफसफाई करणे, साचलेला कचरा हटविणे, डास प्रतिबंधक उपाययोजना करणे आणि पुढील काळात नियमित स्वच्छतेचे वेळापत्रक निश्चित करणे आवश्यक आहे. संबंधित अधिकारी व ग्रामपंचायत प्रशासनाने या कामाची जबाबदारी निश्चित करून त्याची अंमलबजावणी होत आहे की नाही, यावर देखरेख करणे गरजेचे आहे.



> 'नाला साफ करण्यासाठी नेमका मुहूर्त कधी?' हा प्रश्न आता केवळ नागरिकांचा राहिलेला नसून ग्रामपंचायत प्रशासनाने त्याचे उत्तर कृतीतून देण्याची वेळ आली आहे. स्वच्छता न झाल्यास नागरिकांनी संबंधित वरिष्ठ प्रशासनाकडे तक्रार करून या प्रश्नाचा पाठपुरावा करावा, अशी मागणीही पुढे येत आहे.
>
> **सचिन सदार**

# शौचालयाचे काम पूर्ण न करणाऱ्या...

## नंदिनी इंटरप्राईजेसच्या कंत्राटदाराला काळ्या यादीत टाका !

■ प्रतिनिधी | वाशिम ■

वाशिम शहरातील प्रभाग क्र. ०९ मधील छत्रपती शिवाजी महाराज चौक परिसरातील सार्वजनिक शौचालयाच्या दुरुस्तीचे काम सहा महिने उलटूनही पूर्ण झाले नसल्याचा आरोप करत नगरसेवक शेख रशीद उर्फ नूर शेख शहानुर यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे तक्रार केली आहे. संबंधित कंत्राटदार नंदिनी एंटरप्राइजेस यांना काळ्या यादीत समाविष्ट करून उर्वरित काम दुसऱ्या सक्षम कंत्राटदारामार्फत पूर्ण करून घेण्याची मागणी करण्यात आली आहे.

वाशिम शहरातील प्रभाग क्रमांक ०९ मधील छत्रपती शिवाजी महाराज चौक परिसरातील सार्वजनिक शौचालयाच्या दुरुस्तीच्या कामाबाबत नागरिकांच्या गैरसोयीचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. नगरसेवक शेख रशीद (नूर) शेख शहानुर यांनी जिल्हाधिकारी वाशिम यांना दिलेल्या निवेदनात संबंधित कंत्राटदाराविरोधात कारवाईची मागणी केली आहे.

निवेदनानुसार, सार्वजनिक शौचालयाच्या दुरुस्तीचे काम १८ मार्च २०२६ रोजी नंदिनी एंटरप्राइजेस या कंत्राटदाराला देण्यात आले होते. काम पूर्ण करण्याची मुदत ३० दिवस होती. कामाची सुरुवात करण्यात आली असली तरी सहा महिने उलटूनही अर्ध्याहून अधिक काम अपूर्ण अवस्थेत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. संबंधित कंत्राटदाराला वारंवार सूचना व पाठपुरावा करूनही उर्वरित काम पूर्ण करण्यात आले नसल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. काम रखडल्यामुळे परिसरातील नागरिक, ज्येष्ठ नागरिक तसेच महिलांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. शौचालयातील आवश्यक सुविधा उपलब्ध नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाल्याचेही निवेदनात म्हटले आहे.





नागरिक त्रस्त ; नगरसेवकाची जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार

याप्रकरणी संबंधित कंत्राटदाराने दिलेल्या मुदतीत काम पूर्ण न केल्यामुळे व कामात निष्काळजीपणा दाखवल्यामुळे नियमानुसार कारवाई करण्यात यावी तसेच नंदिनी एंटरप्राइजेस यांना काळ्या यादीत समाविष्ट करून उर्वरित काम दुसऱ्या सक्षम कंत्राटदाराकडून तातडीने पूर्ण करून घ्यावे, अशी मागणी नगरसेवक शेख रशीद ( नूर ) शेख शहानुर यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे. या निवेदनाच्या प्रती पालकमंत्री दत्तात्रेय भरणे तसेच मुख्याधिकारी, नगर परिषद वाशिम यांनाही देण्यात आल्या आहेत.

# सोनाळा फाट्यावरून मोटरसायकलची चोरी

## सीसी टीव्ही कॅमेऱ्यात मोटरसायकल सह चोरही कैद



■ प्रतिनिधी | शेलुबाजार ■

मालेगाव तालुक्यातील किन्हिराजा सोनाळ्या पाट्यावरील मित्राच्या शेतात गेलेल्या चोरद येथील रमेश पवार यांची मोटरसायकल एम एच ३७ एक्स २५३१ दिवसा ढवळ्या चोरून नेल्याची घटना घडली किन्हिराजा परिसरातील सोनाळा फाटा शिवारातील मित्राच्या शेतातील सोयाबीन दुष्काळी परीस्थीतीत कसे वाळले हे पाहण्यासाठी चोरद येथील रमेश वसंता पवार हे गेले असता सोनाळा फाट्यावर दोन तीन अज्ञात व्यक्ती उभे होते त्यांनी पवार यांचेशी चर्चा ही केली पवार व त्यांचे मित्र हे शेताकडे गेले असता रमेश पवार रा चोरद यांची एचएफ मोटरसायकल ही चोरट्यांनी लंपास केली किन्हिराजा येथील मालेगाव वाशीम रोडवरील श्री शिवाजी हायस्कूल समोरील

शुभम सरोदे यांच्या सी सी टीव्ही कॅमेऱ्यात सदर मोटरसायकल व चोर कैद झाले असून किन्हीराजा मालेगाव रोडवरील पेट्रोल पंपावर सी सी टी व्ही कॅमेऱ्यात ही मोटरसायकल एम एच ३७ एक्स २५३१ ही मोटरसायकल नेतांना दिसून आले काही काळ कुणी मित्रांनी किंवा नातेवाईकांनी आपली मोटरसायकल नेली असेल असे वाटत होते परंतू कुणत्याही नातेवाईकांचा वा मित्राचा फोन आला नाही हे लक्षात येताच या बाबत जऊळका पोलीस स्टेशनला या बाबीत तक्रार गाडीचे मालक रमेश वसंता पवार यांनी दिल्याचे समजते.

# शिकलकरी समाजाच्या समस्या तहसीलदारांनी जाणून घेतल्या



■ प्रतिनिधी | रिसोड ■

शहरातील आनंद कॉलनी परिसरात वास्तव्यास असलेल्या शिकलकरी समाजातील नागरिकांच्या विविध समस्या जाणून घेण्यासाठी तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर यांनी परिसराला भेट देत नागरिकांशी संवाद साधला. यावेळी भटके-विमुक्त समाजातील नागरिकांना भेडसावणाऱ्या विविध अडचणींबाबत सविस्तर माहिती घेण्यात आली.

शासकीय योजनांचा लाभघेताना येणाऱ्या अडचणी नागरिकांनी तहसीलदारांसमोर मांडल्या. आधार कार्ड, राशन कार्ड, जातीचा दाखला यासह श्रावणबाळ योजना, संजय गांधी निराधार योजना तसेच इतर शासकीय योजनांचा लाभमिळविताना येणाऱ्या अडचणींबाबत नागरिकांनी माहिती दिली. नागरिकांच्या समस्या प्रत्यक्ष जाणून घेत तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर यांनी संबंधित बाबींची माहिती घेत आवश्यक कार्यवाही करण्याबाबत मार्गदर्शन केले. पात्र लाभार्थ्यांना विविध शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी प्रशासनाच्या माध्यमातून आवश्यक प्रयत्न करण्यात येतील, असे त्यांनी यावेळी सांगितले.

यावेळी भटके-विमुक्त कल्याणकारी परिषदेचे सदस्य तथा वाशिम जिल्ह्याचे अशासकीय सदस्य गोपाल मुधोळकर, रिसोड तालुक्याचे अशासकीय सदस्य संदीप पवार तसेच लोणारचे अशासकीय सदस्य सतीश कालापाड उपस्थित होते.

# आंतरराज्यीय घरफोडी टोळीचा पर्दाफाश

## १० घरफोडीचे गुन्हे उघड ; स्थानिक गुन्हे शाखेची धडाकेबाज कारवाई

■ प्रतिनिधी | अकोला ■

जिल्ह्यातील हिवरखेड, तेल्हारा, पातूर, बाळापूर आणि चान्नी परिसरात घरफोड्या करून धुमाकूळ घालणाऱ्या आंतरराज्यीय टोळीचा स्थानिक गुन्हे शाखेने पर्दाफाश केला आहे. या कारवाईत मध्य प्रदेशातील एका आरोपीला ताब्यात घेण्यात आले असून, त्याच्या चौकशीतून १० घरफोडीचे गुन्हे उघडकीस आले आहेत. पोलिसांनी ९५ ग्रॅम सोन्याची वितळवून तयार केलेली लगड गुन्ह्यात वापरलेली मोटारसायकल असा एकूण १२ लाख ८ हजार २३० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

हिवरखेड येथील जयस्वाल कॉलनीतील रहिवासी सारंगी गोपाल भगत यांच्या घराचा दरवाजा तोडून कपाटातील सोन्या-चांदीचे दागिने चोरीला गेल्याची घटना २१ जून २०२६ रोजी घडली होती. याप्रकरणी हिवरखेड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्याचप्रमाणे जिल्ह्यातील हिवरखेड, तेल्हारा, पातूर, बाळापूर आणि चान्नी परिसरातही घरफोडीच्या घटना घडल्या होत्या. गुन्ह्यांचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिस अधीक्षक अर्चित चांडक यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक नितीन लेव्हरकर यांना गुन्हे उघडकीस आणून आरोपींना अटक करण्याचे निर्देश दिले. त्यानुसार लेव्हरकर यांनी अधिकारी व कर्मचाऱ्यांची स्वतंत्र पथके तयार करून तपासाला सुरुवात केली.

### १८५ सीसीटीव्ही फुटेज तपासले

स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अकोला शहरासह विविध ठिकाणांवरील तब्बल १८५ ठिकाणांचे सीसीटीव्ही फुटेज तपासले. तांत्रिक विश्लेषण, गुप्त बातमीदारांकडून मिळालेली माहिती आणि आरोपींच्या हालचालींचा मागोवा घेत तपास पुढे नेण्यात आला. आरोपींच्या शोधासाठी पोलिस पथकाने बुलढाणा, जळगाव खान्देश, बुऱ्हाणपूर, इच्छापूर आणि नेपानगर असा सुमारे ७०० किलोमीटरचा प्रवास केला. तपासादरम्यान हिवरखेड परिसरातील घरफोडीचा संबंध मध्य प्रदेशातील नेपानगर येथील दौलतखान गफारखान (२१, रा. केरपानी, ता. नेपानगर, जि. बुऱ्हाणपूर) याच्याशी असल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर पोलिसांनी नेपानगर येथे सापळा रचून त्याला शिताफीने ताब्यात घेतले.

### साथीदारासह दहा घरफोड्यांची कबुली

दौलतखान याची सखोल चौकशी केली असता, त्याने साथीदार हुसेनखान करीमखान (रा. केरपानी, मध्य प्रदेश) याच्यासोबत अकोला जिल्ह्यातील हिवरखेड, तेल्हारा, बाळापूर, पातूर आणि चान्नी परिसरात एकूण १० घरफोड्या केल्याची कबुली दिल्याचे पोलिसांनी सांगितले. चोरी केलेला काही मुद्देमाल नेपानगर येथील गोपाल कालुराम सोनी (६०) याच्याकडे विकल्याची माहितीही चौकशीत समोर आली. त्यानुसार पोलिसांनी गोपाल सोनी याच्याकडून चोरीचा मुद्देमाल जप्त केला.



१२ लाख ८ हजार २३० रुपयांचा मुद्देमाल जप्त

### १० लाख ८८ हजारांचे सोन्याचे दागिने

पोलिसांनी १० गुन्ह्यांमधील चोरीच्या मुद्देमालातील सुमारे ९५ ग्रॅम सोन्याची वितळवून तयार केलेली लगड जप्त केली. तिची सध्याच्या बाजारभावानुसार किंमत १० लाख ८८ हजार २३० रुपये आहे. याशिवाय गुन्ह्यात वापरलेली १ लाख २० हजार रुपये किमतीची मोटारसायकल जप्त करण्यात आली. अशाप्रकारे एकूण १२ लाख ८ हजार २३० रुपयांचा मुद्देमाल पोलिसांच्या हाती लागला. या कारवाईमुळे हिवरखेड पोलिस ठाण्यातील ५, चान्नी पोलिस ठाण्यातील २, तर तेल्हारा, बाळापूर आणि पातूर पोलिस ठाण्यातील प्रत्येकी १, असे एकूण १० घरफोडीचे गुन्हे उघडकीस आले आहेत. टोळीतील इतर सदस्यांचा सहभाग तसेच चोरीच्या मुद्देमालाच्या व्यवहाराबाबत पुढील तपास सुरू आहे.

### या अधिकारी-कर्मचाऱ्यांचा सहभाग

ही कारवाई पोलिस अधीक्षक अर्चित चांडक, अतिरिक्त पोलिस अधीक्षक बी. रेड्डी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक नितीन लेव्हरकर यांच्या नेतृत्वात करण्यात आली. कारवाईत स्थानिक गुन्हे शाखेचे अधिकारी निलेश देशमुख, गोपाल जाधव, विष्णू बोडखे, माजिद पठाण, अनिल चव्हाण तसेच पोलिस अंमलदार सुलतान पठाण, अमित दुबे, शेख हसन, उमेश पराये, फिरोज खान, भारकर धोत्रे, अब्दुल माजिद, रविंद्र खंडारे, महेंद्र मलिये, किशोर सोनवणे, खुशाल नेमाडे, मंगेश इंगळे, वसीमोद्दीन, एजाज अहमद, राहुल गायकवाड, खप्नील खेडकर, श्रीकांत पातोंड, पवन डांबलकर, सतीश पवार, अन्सार अहमद, राज चंदेल, आकाश मानकर, धिरज वानखडे, अभिषेक पाठक, मोहम्मद आमीर, अशोक सोनवणे, भीमराव दिपके तसेच चालक मनीष ठाकरे, प्रविण कश्यप, रामकिसन डोईफोडे, देवानंद खरात आणि प्रकाश लोखंडे यांनी सहभाग घेतला.

# दुर्गादेवी मंडळ पदाधिकाऱ्यांची बैठक संपन्न



■ प्रतिनिधी | मानोरा ■

तालुक्यात घटस्थापनेनिमित्त दुर्गादेवी व शारदा मंडळांकडून आयोजित करण्यात येणारा धार्मिक उत्सव शांततेत, शिस्तीत आणि सामाजिक सलोखा राखत पार पडावा, यासाठी मानोरा पोलीस स्टेशनमध्ये ५ ऑक्टोबर रोजी मंडळाच्या पदाधिकाऱ्यांची बैठक घेण्यात आली. कारंजा उपविभागीय पोलीस अधिकारी मनीष ठाकरे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत उत्सवाच्या नियोजनासह विविध विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले.

यावेळी मनीष ठाकरे यांनी मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी शासनाच्या नियमांचे काटेकोर पालन करून धार्मिक उत्सव साजरा करावा, असे आवाहन केले. उत्सवाच्या माध्यमातून भक्तीबरोबरच सामाजिक एकोपा, शांतता आणि बंधुभावाची भावना अधिक दृढ करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. दरम्यान, उत्सवात गुलालाऐवजी फुलांचा वापर करावा, तसेच ध्वनिप्रदूषण टाळण्यासाठी डीजेला फाटा देत पारंपरिक वाद्यांना प्राधान्य द्यावे, असे आवाहन पोलिस प्रशासनाच्या वतीने करण्यात आले.

# गुरुकुलचा डंका! अजित चव्हाण व ओम थेर यांची राष्ट्रीय स्पर्धेसाठी महाराष्ट्राच्या हँडबॉल संघात निवड

■ प्रतिनिधी | कारंजा ■

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय वाशिम तसेच हौशी हँडबॉल असोसिएशन वाशिम यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १ ते ३ ऑक्टोबर दरम्यान तालुका क्रीडा संकुल, कारंजा लाड येथे आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय शालेय हँडबॉल क्रीडा स्पर्धेत (वयोगट १७ वर्षे मुले) अमरावती विभागाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या गुरुकुल विद्यालय, कोळी-कारंजा संघाने दमदार कामगिरी करत चौथा क्रमांक पटकावला.

या स्पर्धेत गुरुकुल विद्यालयाच्या खेळाडूंनी उत्कृष्ट सांघिक खेळ, जिद्द आणि कौशल्याचे प्रदर्शन करत अमरावती विभागाचे नाव राज्यस्तरावर उंचावले. विशेष म्हणजे संघाचा कर्णधार अजित चव्हाण तसेच उपकर्णधार ओम थेर या दोन्ही खेळाडूंची त्यांच्या उल्लेखनीय कामगिरीच्या जोरावर राष्ट्रीय शालेय हँडबॉल स्पर्धेसाठी महाराष्ट्र राज्याच्या संघात निवड झाली आहे.

या दुहेरी यशामुळे गुरुकुल विद्यालयाच्या क्रीडा क्षेत्रातील कामगिरीला आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला असून, अजित चव्हाण व ओम थेर यांच्या राष्ट्रीय निवडीबद्दल सर्व स्तरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. दोन्ही खेळाडूंना त्यांच्या आगामी राष्ट्रीय स्पर्धेसाठी मान्यवरांनी शुभेच्छा दिल्या.



या यशाचे श्रेय खेळाडूंचे आई-वडील, गुरुकुल विद्यालयाचे मुख्याध्यापक अमोल राऊत, संचालिका मेघा राऊत, शिक्षकेतर कर्मचारी तसेच क्रीडा शिक्षक सनी काळे सर यांना देण्यात आले.

यावेळी जिल्हा क्रीडा अधिकारी सचिन चव्हाण सर, क्रीडा अधिकारी किशोर बोंडे सर, क्रीडा अधिकारी मारुती सोनकांबळे, तालुका क्रीडा अधिकारी कारंजा मंगला शेंडे मॅडम, हौशी हँडबॉल असोसिएशनचे अध्यक्ष देवव्रत दादा डहाके, सचिव शुभम चव्हाण, तालुका संयोजक पराग गुल्हाणे तसेच स्वराज्य स्पोर्ट्स अकॅडमीचे अध्यक्ष संकेत देशमुख यांनी गुरुकुल विद्यालयाच्या खेळाडू व मार्गदर्शकांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. राष्ट्रीय स्तरावर महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळालेल्या अजित चव्हाण व ओम थेर यांच्या निवडीमुळे गुरुकुल विद्यालयाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला असून, त्यांच्या राष्ट्रीय कामगिरीकडे आता संपूर्ण कारंजा तालुक्याचे लक्ष लागले आहे.

# जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक ३०९ ■ मंगळवार ६ ऑक्टोबर २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.००रु


# पावसाने पाठ फिरवली; धरणांनी दिला आधार, पिकांना दिलासा

## ३६.९२ टक्के पावसाची तूट; 'धाम'चे पाणी पिण्यासाठीच राखणे भाग



**वर्धा जनमाध्यम** जिल्ह्यावर यंदा वरुणराजाची अवकृपा राहिली आणि त्याचा फटका आता शेतीसह पाणी व्यवस्थेलाही बसू लागला आहे. मान्सूनच्या चार महिन्यांत सरासरीपेक्षा तब्बल ३६.९२ टक्के कमी पाऊस झाल्याने शेतपिके माना टाकू लागली आहेत. या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांच्या मागणीची दखल घेत जिल्ह्यातील चार मोठ्या व मध्यम जलाशयांतून पाणी सोडण्यात आले आहे. बोर, निम्न वर्धा आणि वर्धा कार नदी प्रकल्पातून सिंचनासाठी पाणी सोडण्यात आले असून महाकाळी येथील धाम प्रकल्पातून पिण्याच्या पाण्यासाठी पाणी सोडण्यास सुरुवात झाली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांसह नागरिकांना काहीसा दिलासा मिळाला असला तरी जिल्ह्यावर पुढील काळातील जलसंकटाची टांगती तलवार कायम आहे.जिल्ह्यात जून ते सप्टेंबर या चार महिन्यांत सरासरी ८७४.०५ मिमी पाऊस अपेक्षित असतो. मात्र यंदा प्रत्यक्षात केवळ ५५८.०३ मिमी पावसाची नोंद झाली. म्हणजेच सरासरीच्या तुलनेत ३६.९२ टक्के पावसाची तूट राहिली आहे. ऑक्टोबरमध्येही पाऊस समाधानकारक होईल याची शाश्वती नसल्याने पाणीटंचाईचे संकट अधिक तीव्र होण्याची शक्यता आहे.

जिल्ह्यात ११ मोठे व मध्यम जलाशय असून त्यांची एकूण पाणी साठवण क्षमता ६११.०४४ दलघमी आहे. अपुऱ्या पावसामुळे हे जलाशय पूर्ण क्षमतेने भरले नाहीत. सध्या या जलाशयांमध्ये ४२१.६६८ दलघमी उपयुक्त जलसाठा शिल्लक आहे. त्यामुळे उपलब्ध पाण्याचे काटेकोर नियोजन करण्याची वेळ आली आहे.

पिकांना पाण्याची गरज निर्माण झाल्याने शेतकऱ्यांनी धरणांमधून सिंचनासाठी पाणी सोडण्याची मागणी केली होती. त्यानुसार सेलू तालुक्यातील बोर, आर्वी तालुक्यातील निम्न वर्धा आणि कारंजा तालुक्यातील वर्धा कार नदी प्रकल्पातून सिंचनासाठी पाणी सोडण्यात आले आहे. या निर्णयामुळे हजारो हेक्टरवरील पिकांना जीवदान मिळण्याची शक्यता आहे.

**बोरमधून १ दलघमी पाणी; १३ हजार हेक्टरला लाभ**

सेलू तालुक्यातील बोर प्रकल्पातून २ ऑक्टोबरपासून कॅनलद्वारे सिंचनासाठी पाणी सोडण्यास सुरुवात झाली आहे. आणखी काही दिवस पाणी सोडण्यात येणार असून या पाळीत सुमारे १ दलघमी पाणी सोडण्याचे नियोजन आहे. याचा लाभ सुमारे १३ हजार हेक्टर क्षेत्रातील पिकांना होणार आहे.

निम्न वर्धेतून ७ दलघमी; १४ हजार हेक्टरला सिंचन

आर्वी तालुक्यातील धनोडी बहादरपूर येथील निम्न वर्धा प्रकल्पातून ४ ऑक्टोबरपासून कॅनलद्वारे सिंचनासाठी पाणी सोडण्यात आले आहे. आणखी काही दिवस हा विसर्ग सुरू राहणार असून या पाळीत सुमारे ७ दलघमी पाणी सोडण्यात येणार आहे. त्यामुळे सुमारे १४ हजार हेक्टरवरील पिकांना सिंचनाचा आधार मिळणार आहे.

**वर्धा कार नदीतून ३.५ दलघमी पाणी**

कारंजा तालुक्यातील वर्धा कार नदी प्रकल्पातून २ ऑक्टोबरपासून सिंचनासाठी पाणी सोडण्यास सुरुवात झाली आहे. पुढील काही दिवस विसर्ग सुरू राहणार असून या पाळीत सुमारे ३.५ दलघमी पाणी सोडण्यात येणार आहे. यामुळे सिंचन लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे,

**धाम'चे पाणी वर्धेसह २४ गावांची तहान भागवणार**

महाकाळी येथील धाम प्रकल्पातून शनिवार ३ ऑक्टोबरपासून पिण्यासाठी पाणी सोडण्यास सुरुवात करण्यात आली आहे. धाम नदीच्या येळाकाळी आणि पवनार येथील पात्रातून पाण्याची उचल करून वर्धा शहराला नगरपालिका प्रशासनामार्फत, तर पिपरी मेघेसह १४ गावांना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत पिण्याच्या पाण्याचा पुरवठा केला जातो.

वर्धा शहरासह परिसरातील १४ गावे आणि धाम नदीकाठावरील सुमारे १० गावांची तहान भागविण्यासाठी धाम प्रकल्पाचे पाणी महत्त्वाचे ठरणार आहे.

त्यामुळे या प्रकल्पातून सोडण्यात आलेल्या पाण्याचा पिण्याच्या पाण्यासाठीच काटेकोर वापर करणे क्रमप्राप्त आहे. शेतीसाठी पाण्याचा अनावश्यक उपसा झाल्यास भविष्यात नागरिकांच्या घशाला कोरड पडण्याची भीती आहे. उपलब्ध साठा मर्यादित असताना पाण्याचा प्रत्येक थेंब जपण्याचे आव्हान प्रशासनासमोर उभे ठाकले आहे.

# नवरात्रात पोलिसांची करडी नजर; छेडछाडीवर 'झिरो टॉलरन्स'



## दुर्गा मंडळांच्या पदाधिकाऱ्यांची बैठक; 'सेव्ह वॉटर'सह सुरक्षित उत्सवाचे आवाहन

**वर्धा जनमाध्यम :** नवरात्रोत्सव शांततामय, शिस्तबद्ध आणि सुरक्षित वातावरणात पार पाडण्यासाठी जिल्हा पोलिसांनी कंबर कसली आहे. उत्सवादरम्यान छेडछाड, गैरवर्तन आणि अनुचित प्रकारांना थारा देऊ नका, महिला व मुलींच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य द्या, अशा स्पष्ट सूचना पोलिस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल यांनी दुर्गा मंडळांच्या पदाधिकाऱ्यांना दिल्या. छेडछाड व गैरवर्तनाविरोधात 'झिरो टॉलरन्स' धोरण राबविण्याचे आवाहनही त्यांनी केले.

नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर सोमवारी पोलिस अधीक्षक कार्यालयात जिल्ह्यातील दुर्गा मंडळांच्या पदाधिकाऱ्यांची बैठक घेण्यात आली. यावेळी कायदा व सुव्यवस्था, ध्वनिप्रदूषण, डीजे, लेझर लाईट, वाहतूक आणि महिला सुरक्षेबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

मंडळांनी आवश्यक परवानग्या घेऊनच गरबा, दांडिया व अन्य कार्यक्रमांचे आयोजन करावे. ध्वनीवर्धकाचा वापर निर्धारित वेळेत व नियमांनुसारच करावा. जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार प्रतिबंधित लेझर लाईटचा वापर करू नये. मंडपाची अग्निसुरक्षा, पुरेशी प्रकाश व्यवस्था, सीसीटीव्ही कॅमेरे तसेच महिला व सुरक्षा स्वयंसेवकांची नियुक्ती करावी, अशा सूचना देण्यात आल्या.

'एक मंडळ, एक जबाबदार पदाधिकारी, एक पोलिस अंमलदार' या संकल्पनेनुसार प्रत्येक मंडळाने एका जबाबदार पदाधिकाऱ्याची नियुक्ती करून संबंधित पोलिस अंमलदाराशी नियमित संपर्क ठेवावा, असेही सांगण्यात आले.

'नवदुर्गा सन्मान'मधून मंडळांना प्रोत्साहन

यंदा जिल्हा पोलिस दलाच्या वतीने 'नवदुर्गा सन्मान २०२६' पुरस्कार स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. महिला सुरक्षा, नारीशक्ती, महिला आर्थिक स्वावलंबन, मुलींचे शिक्षण, पर्यावरण संवर्धन, सामाजिक उपक्रम, स्वच्छता, सुरक्षित उत्सव व्यवस्थापन आणि नाविन्यपूर्ण उपक्रम राबविणाऱ्या मंडळांना पोलिस ठाणे व जिल्हास्तरावर गौरविण्यात येणार आहे.

पाणी बचतीचा संदेश देण्याचे आवाहन

यंदा राज्यात दुष्काळसदृश परिस्थिती असल्याने नवरात्रोत्सवातून ङ'सेव्ह वॉटर'ङचा संदेश देत पाणी बचत आणि जलसंवर्धनाबाबत जनजागृती करावी, असे आवाहन अग्रवाल यांनी केले. संशयास्पद व्यक्ती किंवा वस्तू आढळल्यास नागरिकांनी कायदा हातात न घेता तत्काळ पोलिसांना माहिती द्यावी. सोशल मीडियावर अफवा अथवा धार्मिक आणि सामाजिक तेढ निर्माण करणारा अप्रमाणित मजकूर प्रसारित करू नये, असेही त्यांनी स्पष्ट केले.

बैठकीला पोलिस उपअधीक्षक प्रमोद मकेश्वर, स्थानिक गुन्हे शाखा व जिल्हा विशेष शाखेचे पोलिस निरीक्षक, वर्धा शहर, सेवाग्राम, सावंगीचे ठाणेदार तसेच जिल्ह्यातील विविध दुर्गा मंडळांचे पदाधिकारी उपस्थित होते. सर्व उपविभागीय पोलिस अधिकारी आणि पोलिस ठाण्यांचे प्रभारी अधिकारी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे सहभागी झाले.

# आज लोकनेते रमेशभाऊ वरकड स्मृतीदिन समारोहाचे आयोजन

## वृक्षारोपण, संगितमय श्रद्धांजली, महाप्रसाद



**साहूर जनमाध्यम :** साहुर येथील लोकनेते रमेशभाऊ वरकड यांच्या आठव्या स्मृती दिनानिमित्त आज दि. ६ ऑक्टोबर रोजी साहुर येथे स्मृतीदिन समारोहाचे आयोजन करण्यात आले आहे. वृक्षारोपण, संगितयय श्रद्धांजली, भजन, किर्तन, महाप्रसाद असे विविध कार्यक्रम होणार आहे. दुपारी १२.३० वाजता मान्यवरांच्या उपस्थितीत श्रद्धांजलीचा मुख्य कार्यक्रम होईल.

यावेळी आ.सुमित वानखेडे, माजी आमदार दादाराव केचे, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष सरिताताई गाखरे, भाजपा माजी जिल्हाध्यक्ष सुनिल गफाट, जिल्हा परिषद माजी सभापती मिलींद भेंडे, विजय आगलावे, माजी जिल्हा परिषद सदस्य फकिराजी खडसे, भाजप महिला आघाडीच्या जिल्हा उपाध्यक्ष तथा जिल्हा कार्यकारिणी सदस्य नंदाताई रमेशराव वरकड, माजी जिल्हा परिषद सदस्य छायाताई घोडीले, भाजपा अनुसूचित जाती मोर्चाचे जिल्हाध्यक्ष अशोक विजयकर, उत्तमराव करांगळे, भाजपा तालुकाध्यक्ष अंकिता होले, सरपंच प्रकाश गायकवाड, उपसरपंच रिताताई ढवळे, सावंगाचे सरपंच विनोद सोनोने, सेवा सोसायटीचे अध्यक्ष प्रभाकर भोरे आदी उपस्थित राहणार आहे.

तत्पूर्वी सकाळी ७ वाजता मान्यवरांच्या उपस्थितीत वृक्षारोपण होईल. सकाळी १०.३० वाजता गायक प्रशांत रोंघे तसेच योगेश चांदुरकर, विनय तळहांडे व संच संगितमय श्रद्धांजली सादर करतील. दुपारी १.३० वाजता महाप्रसादाचा कार्यक्रम होईल. गावकऱ्यांनी कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन आयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

### लोकनेते रमेश वरकड यांच्याविषयी

लोकनेते रमेश वरकड हे तीनदा साहूर ग्रामपंचायतचे सरपंच, तीनदा जिल्हा परिषद सदस्य, एकवेळ पंचायत समिती सदस्य व पं.स. उपसभापती, जिल्हा परिषदेच्या कार्यकाळात जिल्हा नियोजन समिती सदस्य व जि.प. सदस्य नसतांनाच्या काळात जिल्हा नियोजन समितीचे शासन नियुक्त निमंत्रित सदस्य असे तब्बल ३५ वर्ष ते पंचायतराज संस्थेत पदाधिकारी म्हणून कार्यरत होते.

# शॉर्टसर्किटचा भडका; वयोवृद्ध दाम्पत्याची दोन लाखांची रोकड आणि साहित्य जळून खाक

**वडनेर जनमाध्यम :**

_वडनेर येथील वार्ड क्रमांक १ मध्ये भवानी माता मंदिरामागे राहणाऱ्या वयोवृद्ध दाम्पत्याच्या घराला सोमवारी सकाळी शॉर्टसर्किटमुळे अचानक आग लागली. आगीने काही क्षणांतच रौद्ररूप धारण केल्याने घरातील संसारोपयोगी साहित्य आणि पेटीत ठेवलेली सुमारे दोन लाख रुपयांची रोकड जळून खाक झाली. आयुष्यभर कष्ट करून जमविलेली पुंजी आगीत भस्मसात झाल्याने सदोबाजी शिंदे आणि त्यांच्या पत्नीवर मोठे संकट कोसळले आहे.सोमवारी ५ ऑक्टोबर रोजी सकाळी सुमारे ११ वाजताच्या सुमारास ही घटना घडली. सदोबाजी कृष्णा शिंदे वय ७५ हे पत्नी शकुंतला शिंदे वय ७० यांच्यासह पत्र्याच्या घरात वास्तव्यास आहेत. मजुरी तसेच शेती मक्त्याने देऊन मिळणाऱ्या उत्पन्नातून हे दाम्पत्य उदरनिर्वाह करते.घरातील पेटीत त्यांनी आयुष्यभराची जमापुंजी तसेच शेताच्या मक्त्याची रक्कम मिळून सुमारे दोन लाख रुपये ठेवले होते. अचानक घरातील विद्युत यंत्रणेत शॉर्टसर्किट झाल्याने आग लागली. आगीची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेत आग आटोक्यात आणण्याचे प्रयत्न सुरू केले. सुमारे दीड तासांच्या अथक प्रयत्नांनंतर आगीवर नियंत्रण मिळविण्यात आले.मात्र तोपर्यंत घरातील बहुतांश संसारोपयोगी साहित्य जळून खाक झाले होते. विशेषतः पेटीत ठेवलेली दोन लाखांची रोकडही आगीच्या भक्ष्यस्थानी पडली. त्यामुळे वृद्ध दाम्पत्याचा आधारच आगीत जळून खाक झाला आहे. प्रशासनाने पंचनामा करून नुकसानग्रस्त दाम्पत्याला तातडीने आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी होत आहे.

# बालविवाहाच्या बोहल्यावर जाणाऱ्या चिमुकलीला प्रशासनाने वाचविले

## चाईल्ड हेल्पलाईनच्या एका फोनने थांबला अल्पवयीन मुलीचा विवाह

**कारंजा घाडगे जनमाध्यम :** बालवयातच विवाहाच्या बोहल्यावर जाणाऱ्या अल्पवयीन मुलीचे भविष्य उद्ध्वस्त होण्यापासून प्रशासनाने वाचविले. कारंजा तालुक्यातील एका गावात ३ ऑक्टोबर रोजी होणारा बालविवाह चाईल्ड हेल्पलाईनच्या सतर्कतेमुळे ऐनवेळी थांबविण्यात आला. एका फोनने सुरू झालेल्या कारवाईमुळे एका चिमुकलीच्या शिक्षणाची आणि स्वप्नांची वाट पुन्हा मोकळी झाली.

मध्य प्रदेशातील शिवणी जिल्ह्यातील धारणा येथील अल्पवयीन मुलीचा विवाह कारंजा तालुक्यातील २४ वर्षीय युवकाशी ठरला होता. याची माहिती चाईल्ड हेल्पलाईनच्या १०९८ क्रमांकावर मिळताच महिला व बालविकास विभागाने तातडीने हालचाली सुरू केल्या. स्थानिक गुन्हे शाखेच्या अनैतिक मानवी वाहतूक पथकातील पोलिस कर्मचारी नवनाथ मुंडे यांच्याशी संपर्क साधून घटनास्थळाचा शोध घेण्यात आला.

जिल्हा महिला व बालविकास अधिकारी तृप्ती चव्हाण आणि जिल्हा बाल संरक्षण अधिकारी महेश कामडी यांच्या मार्गदर्शनाखाली संयुक्त पथक घटनास्थळी पोहोचले. दोन्ही कुटुंबीयांचे समुपदेशन करून विवाह थांबविण्यात आला. मुलीला बाल कल्याण समिती, वर्धा येथे हजर करण्याचे निर्देश देण्यात आले असून पुढील कायदेशीर व पुनर्वसनाची कार्यवाही समितीमार्फत होणार आहे.

बालविवाह रोखणे ही केवळ प्रशासनाची नव्हे तर समाजाचीही जबाबदारी आहे. बालविवाहाची माहिती मिळताच नागरिकांनी १०९८ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# फुले-शाहू-आंबेडकर विचारांची मशाल घेऊन कराळे गुरुजी मैदानात

**नागपूर / वर्धा जनमाध्यम :** हातात भारतीय संविधानाची प्रत, अंगावर महात्मा ज्योतिबा फुले यांची वेशभूषा आणि सोबत सावित्रीबाई फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर व महात्मा गांधी यांच्या वेशभूषेतील कार्यकर्ते. अशा आगळ्यावेगळ्या रॅलीतून नितेश कराळे गुरुजी यांनी नागपूर पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीत अपक्ष उमेदवार म्हणून उमेदवारी अर्ज दाखल केला. त्यांच्या रॅलीला विविध जिल्ह्यांतून आलेल्या तरुणांचा प्रतिसाद मिळाला.

कराळे यांच्या उमेदवारीमुळे नागपूर पदवीधर मतदारसंघातील राजकीय समीकरणात आणखी एक घटक दाखल झाला आहे. काँग्रेसचे अभिजित वंजारी आणि भाजपचे सुधाकर कोहळे यांच्यासह अन्य उमेदवार मैदानात असल्याने निवडणुकीतील राजकीय हालचालींना वेग आला आहे.

रॅलीतून फुले, शाहू, आंबेडकर यांच्या सामाजिक समता, शिक्षण, न्याय आणि संविधानवादी विचारांचा संदेश देण्यात आला. शिक्षण, बेरोजगारी, स्पर्धा परीक्षांमधील पारदर्शकता, सरकारी भरती, पदवीधरांच्या रोजगाराच्या संधी तसेच शेतकरी आणि सर्वसामान्यांचे प्रश्न हे आपल्या भूमिकेच्या केंद्रस्थानी असल्याचे कराळे यांनी सांगितले. स्पर्धा परीक्षांमध्ये पारदर्शकता आणि अधिकाधिक सरकारी भरतीची गरज असल्याचे त्यांनी यापूर्वीही मांडले आहे.

# दोन वर्षे रस्ता खोदून ठेवला ; संतापलेल्या गावकऱ्यांनी भदाडी पुलावर वाहतूक रोखली

**देवळी / वर्धा जनमाध्यम :** दहेगाव–देवळी–वायगाव–कोसुर्ला मार्गाचे काम दोन वर्षांपासून रखडल्याने अखेर नऊ गावांतील गावकऱ्यांचा संताप रस्त्यावर आला. सोमवारी, ५ ऑक्टोबर रोजी जामणी येथील भदाडी नदीच्या पुलावर रस्त्याच्या कामासाठी परिसरातील नऊ गावांतील नागरिकांनी रास्ता रोको आंदोलन केले. अर्धवट पूल, खोदलेले रस्ते आणि रखडलेल्या बांधकामामुळे वाहनचालक व ग्रामस्थांना होत असलेल्या त्रासाचा उद्रेक या आंदोलनातून झाला.

या मार्गासाठी तब्बल २३७ कोटी ७९ लाख रुपयांचा निधी मंजूर असून ७ ऑक्टोबर २०२४ रोजी कामाला सुरुवात झाली. कामाची निर्धारित मुदत ७ ऑक्टोबर २०२६ रोजी संपत आहे. मात्र, अद्यापही रस्त्याचे आणि पुलाचे काम पूर्ण झालेले नाही. कंत्राटदाराला पुढील मुदतवाढ किती कालावधीची देण्यात आली, याबाबतही स्पष्ट माहिती नाही.

भदाडी पुलाचे अर्धवट बांधकाम वाहनचालकांसाठी डोकेदुखी ठरत आहे. रस्ता खोदून माती-मुरूम टाकल्यानंतर काम बंद पडल्याने खराब मार्गावरून वाहतूक करावी लागत आहे. त्यामुळे अपघाताचा धोका वाढला आहे.

प्रकल्पाचे कंत्राट आर. एम. एन. इन कंपनी, हैदराबाद यांना देण्यात आल्याचे सांगण्यात येते. आतापर्यंत ७१ कोटी ७२ लाख रुपयांची उचल झाल्याची माहिती आहे. एवढा मोठा निधी खर्च होऊनही कामाची गती संथ असल्याने प्रकल्पाची प्रगती, बांधकामाची गुणवत्ता आणि देखरेख याबाबत नागरिकांनी प्रश्न उपस्थित केले.

**'कमिशन'च्या चर्चेनेही तापले वातावरण-** एवढ्या मोठ्या निधीचा प्रकल्प असूनही काम रखडल्याने 'कमिशन'च्या कथित गणितामुळे कामाचा वेग मंदावला आहे का, अशी चर्चा नागरिकांमध्ये सुरू झाली आहे. आमदारांचा कथित हिस्सा? किती आणि ठेकेदाराच्या खिशात अखेर किती रक्कम उरणार, असा प्रश्न उपस्थित होत आहे. या आरोपांना अधिकृत दुजोरा मिळालेला नसला तरी प्रकल्पातील आर्थिक व्यवहारांची पारदर्शक चौकशी करून खर्चाचा संपूर्ण हिशेब जनतेसमोर मांडावा, अशी मागणी नागरिकांनी केली.



सात दिवसांत काम सुरू करण्याचे लेखी आश्वासन

आंदोलनाची माहिती मिळताच आमदार राजेश बकाने, तहसीलदार समर्थ क्षीरसागर, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंता मुत्तलवार, अभियंता महेश मोकलकर, ठाणेदार संदीप कापडे यांच्यासह अधिकारी आंदोलनस्थळी दाखल झाले. अधिकाऱ्यांनी आंदोलकांशी चर्चा केली.

आमदार बकाने यांनी पालकमंत्री, जिल्हाधिकारी तसेच वरिष्ठ अधिकाऱ्यांशी दूरध्वनीवरून चर्चा करून प्रश्न तातडीने सोडविण्याची मागणी केली. त्यानंतर सार्वजनिक बांधकाम विभागाने येत्या सात दिवसांत काम सुरू करून पर्यायी वाहतूक व्यवस्था उपलब्ध करून देण्याचे लेखी आश्वासन दिले.

आंदोलनामुळे काही काळ बसेस व इतर वाहने माघारी फिरवावी लागल्याने प्रवाशांना त्रास सहन करावा लागला. मात्र, प्रत्यक्ष काम सुरू होईपर्यंत पाठपुरावा सुरू ठेवण्याचा निर्धार नागरिकांनी केला.

आंदोलनात भाविक आखूड, गौरव गावंडे, नंदकिशोर बिजवार, दिलीप परचाके, लता पुनसे, निशिगंधा पुनसे, मंदा गौरदिपे, फुलचंद बोरकर यांच्यासह परिसरातील नागरिक उपस्थित होते.

# बुलडोझर फिरला, चुली विझल्या

## आष्टीत अतिक्रमण हटावाची धडक कारवाई

### हातगाडीवाले, फेरीवाले आणि किरकोळ विक्रेत्यांवर उपासमारीची वेळ

**आष्टी (शहीद) जनमाध्यम :** आष्टी–वरुड राष्ट्रीय महामार्गाच्या रुंदीकरणाच्या मार्गातील अतिक्रमणांवर सोमवारी राष्ट्रीय महामार्ग प्रशासनाने बुलडोझर चालविला. नालीपासून सुमारे तीन फुटांच्या अंतरातील अतिक्रमणे हटविण्यात आली. रस्त्यालगतची दुकाने आणि व्यावसायिक बांधकामे जमीनदोस्त झाल्याने वर्षानुवर्षे छोट्या व्यवसायावर कुटुंबाचा उदरनिर्वाह करणाऱ्या विक्रेत्यांसमोर आता रोजगाराचा गंभीर प्रश्न उभा ठाकला आहे.अतिक्रमण हटाव मोहिमेदरम्यान महामार्ग प्रशासनाच्या अधिकाऱ्यांसह आष्टी पोलिसांचा मोठा बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. पोलीस उपनिरीक्षक भिलावे, नंदागवळी तसेच गृहरक्षक दलाच्या जवानांनी परिस्थितीवर नियंत्रण ठेवले.महामार्गालगत चहा, नाश्ता, फळे, भाजीपाला तसेच विविध किरकोळ वस्तूंची विक्री करून अनेक कुटुंबे आपला संसार चालवत होती. कारवाईत त्यांची दुकाने हटविल्याने त्यांच्या हातचा रोजगार हिरावला गेला आहे. अतिक्रमण हटविणे नियमांचा भाग असला, तरी छोट्या विक्रेत्यांच्या पोटावरच बुलडोझर चालणार का, .मोठ्या व्यावसायिक आस्थापनांसोबत हातगाडीवाले आणि फेरीवाल्यांवरही कारवाई झाली.



त्यामुळे प्रभावित विक्रेत्यांनी प्रशासनाकडे पर्यायी जागा आणि पुनर्वसनाची मागणी केली आहे. अनेक वर्षांपासून छोट्या व्यवसायावर अवलंबून असलेल्या कुटुंबांना अचानक रस्त्यावर आणण्याऐवजी त्यांच्यासाठी नियमानुसार पर्यायी जागा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.महामार्ग मोकळा झाला; मात्र या विक्रेत्यांच्या चुली पेटणार कशा, याचे उत्तर आता प्रशासनाला द्यावे लागणार आहे.

# आज कुलगुरुंच्या उपस्थितीत कर्तृत्वसंपन्नांचा होणार सन्मान



## गाडगेबाबा सामाजिक प्रतिष्ठानचा स्तूत्य उपक्रम

**अकोला/प्रतिनिधीः-** गेल्या पाच वर्षापासून विविध सामाजिक उपक्रम राबविणारी सामाजिक संस्था म्हणून ख्याती प्राप्त असलेली तथा संस्थेचे संस्थापक प्रा .रोहन पन्नालाल बुंदेले या कर्तृत्व संपन्न व्यक्तीमत्वाच्या नेतृत्वात कार्य करणाऱ्या गाडगेबाबा सामाजिक प्रतिष्ठान अकोला या सामाजिक संघटनेद्वारे विविध क्षेत्रात उल्लेखनिय कार्य केलेल्या यशस्वी व्यक्तीमत्वांचा गौरव आज अकोला येथील सिव्हील लाईन चौकातील आय एम ए हॉल येथे सकाळी ११ वाजता संपन्न होत आहे . या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ मिलींद बारहाते तथा प्रमुख पाहुणे या नात्याने याच विद्यापीठाचे अधिसभा सदस्य डॉ संतोष कुटे , अकोला महानगराचे माजी महापौर निखिलेश दिवेकर व या पुरस्कार सोहळ्यातील पुरस्कार निवड समितीचे अध्यक्ष प्राचार्य डॉ रामेश्वर भिसे यांची उपस्थिती लाभणार आहे . या कार्यक्रमामध्ये प्रा डॉ प्राची प्रविण बुरघाटे ( मेंढे ) अकोला व प्रा गजानन रामकृष्ण भारसाकळे ( शिवाजी अभियांत्रिकी व तांत्रिकी महाविद्यालय , अकोला ) यांना संशोधनपर तसेच स्व. प्रा .दादासाहेब काळमेघ स्मृती प्रित्यर्थ उत्कृष्ट राष्ट्रीय सेवा योजना शिबिर पुरस्कार या सदरात सरस्वती कला महाविद्यालय दहिहांडा जि . अकोला व श्री सुधाकरराव नाईक कला उमा शंकर खेतान वाणिज्य महाविद्यालय अकोला तसेच स्वच्छ भारत स्वस्थ भारत अभियान उत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार या सदरात डॉ. एच.एन.सिन्हा कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय पातूर जि . अकोला. तसेच विद्यार्थी विकास सर्वोत्कृष्ट संचालक पुरस्कार म्हणून डॉ राजीव बोरकर संचालक ,विद्यार्थी विकास विभाग संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती तसेच राज्यस्तरीय उत्कृष्ट प्राचार्य पुरस्कार या सदरात डॉ माधव कदम,प्राचार्य गोपिकाबाई सितारााम गावंडे महाविद्यालय उमरखेड जि. यवतमाळ, डॉ करमसिंग राजपूत, प्राचार्य,श्री पुंडलिक महाराज कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय नांदुरा. जि . बुलढाणा व डॉ रक्षा डवरे प्राचार्य आदर्श कंप्यूटर अँड मॅनेजमेंट महाविद्यालय अकोला तसेच राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार या सदरात प्रा डॉ रोनिल आहाळे, वाणिज्य विभाग डॉ एच.एन.सिन्हा महाविद्यालय पातूर जि.अकोला. प्रा.डॉ.नूतनवर्षा देशमुख, श्री शिवाजी कला वाणिज्य विज्ञान महाविद्यालय अकोट,डॉ. विदुला शैलेश वट्टमवार , फुलसिंग माईक महाविद्यालय पुसद जि . यवतमाळ, प्रा.नेत्रा मानकर, संगीत विभाग, श्री शिवाजी कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला. डॉ. ज्योती विजय शेगोकार, विभाग प्रमुख, रसायनशास्त्र विभाग, अभियांत्रिकी व तांत्रिकी महाविद्यालय बाभूळगाव-अकोला व प्रा.रामानंद गजानन मंगळे गणित विभाग, श्री शिवाजी कला वाणिज्य विज्ञान महाविद्यालय ,अकोट तसेच राज्यस्तरीय युवा गौरव पुरस्कारार्थी या सदरात पर्यावरण क्षेत्रात अभिनेत्री अद्वयी सुगत वाघमारे , रोशन आहेरकर, शेतीमित्र तेल्हारा जि .अकोला. प्रा श्रद्धा कोल्हटकर (डगवार)(अमरावती शैक्षणिक व साहित्य क्षेत्र),ॲड.राणी वाकडे(राठोड)सामाजिक क्षेत्र, सुनयना नरवाडे (अकोला)आरोग्य क्षेत्र,उत्कर्ष वानखडे उद्योग क्षेत्रात (अकोला), पिहू राठोड (क्रीडा क्षेत्र) ,पारुल राठोड (क्रीडा क्षेत्र), डॉ शैलेश केवटकर, संशोधन क्षेत्र.(बुलढाणा), प्रेम अलोट नाट्य संस्कृती क्षेत्रात अकोला , होमगार्ड प्रदीप दांडेकर, (अमरावती) सामाजिक क्षेत्र, यश देशमुख,(अकोला) सामाजिक क्षेत्र,सुरज वाघ (चिखली) सामाजिक सांस्कृतिक क्षेत्र, अनिशा हरिभाऊ कोल्हे (अकोला), सामाजिक सांस्कृतिक क्षेत्र, सायली मोहन गोतमारे (बुलढाणा) सामाजिक सांस्कृतिक संशोधन क्षेत्र,सुमेध शिरसाठ आरोग्य क्षेत्र (अमरावती), पल्लवी प्रवीण जंजाळ (वीर शहीद प्रवीण जंजाळ यांच्या पत्नी) ,देवानंद मोहोळ उद्योजक समाजसेवा क्षेत्र , विकास पल्हाडे आकाशवाणी उत्कृष्ट गायन,सतिष विठ्ठल अस्वार (अकोला) सामाजिक सांस्कृतिक क्षेत्र , शुभम लांडे सामजिक, सांस्कृतिक उद्योग क्षेत्र इत्यादी अमरावती विभागातील यशस्वी व्यक्तीमत्वांचा सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात येणार आहे . कार्यक्रमाचे सूत्र संचालन अकोला आकाशवाणीचे सूत्रसंचालक विकास पल्हाडे करणार असून पुरस्कार्थी यांना परिवारासह आमंत्रित करण्यात आलेले आहे . शिक्षण क्षेत्र क्षेष्ठपद लाभलेल्या प्रतिभासंपन्न कुलगुरुंच्या शुभहस्ते संपन्न होणाऱ्या या सोहळ्याला आवर्जून उपस्थित राहण्याची विनंती गाडगेबाबा सामाजिक प्रतिष्ठानच्या वतीने प्रतिष्ठानच्या कार्यकारणीतील संपूर्ण पदाधिकारी व संस्थेचे सदस्य यांनी केलेली आहे.

संघर्षातूनच यशाची वाट, शॉर्टकटला थारा नाही..!

# डॉ. भावेश भाटिया यांना 'वंदन सन्मान' पुरस्कार प्रदान

**यवतमाळ/प्रतिनिधीः-** परिस्थिती कितीही प्रतिकूल असली तरी त्यातून मार्ग काढण्याची जिद्द असेल तर यश दूर राहत नाही. आयुष्यात संधीची वाट पाहत बसण्यापेक्षा ती स्वतः निर्माण करण्याची तयारी ठेवली पाहिजे. कोणतेही काम छोटे-मोठे नसते; ते मनापासून आणि प्रामाणिकपणे केले तर त्यातूनच मोठी वाट निर्माण होते. संघर्षाच्या खडतर मार्गाला पर्याय नाही आणि यशासाठी कोणताही शॉर्टकट नसतो, असा संदेश सनराईज कॅन्डल्स, महाबळेश्वरचे सामाजिक उद्योजक डॉ. भावेश भाटिया यांनी दिला. येथील मोहनलाल-शांताबाई राठी चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने रविवारी यवतमाळातील बालाजी लॉन येथे आयोजित ११ वा वंदन सन्मान सोहळ्यात डॉ. भावेश भाटिया यांना यंदाचा वंदन सन्मान पुरस्कार प्रदान करण्यात आला. पद्मश्री डॉ. प्रकाश आमटे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या सोहळ्याला पद्मश्री डॉ. मंदाकिनी आमटे, डॉ. अविनाश सावजी, नीता भाटिया आदी उपस्थित होते. शाल, श्रीफळ, सन्मानचिन्ह, सन्मानपत्र आणि एक लाख रुपये असे पुरस्काराचे स्वरूप होते. संपूर्ण सुरेश, पवन आणि राठी परिवाराच्या वतीने भावेश भाटिया व नीता भाटिया यांचा सन्मान करण्यात आला. दृष्टी नसली तरी दृष्टिकोन



असावा, असे सांगत डॉ. भाटिया म्हणाले, 'जीवनात व्हिजन असणे आवश्यक आहे. मी जग पाहू शकत नाही; मात्र एक दिवस संपूर्ण जग तुला पाहील, असे काम कर, हा कानमंत्र माझ्या आईने दिला. हाच माझ्या आयुष्यातील टर्निंग पॉइंट ठरला.' सनराईज कॅन्डल्सच्या माध्यमातून अंध बांधवांना आत्मनिर्भर होण्याची संधी मिळाली. केवळ रोजगार नव्हे, तर या कामामुळे कुटुंब आणि समाजानेही त्यांना स्वीकारण्यास सुरुवात केली. डोळ्यांनी जग पाहता येत नसले तरी त्यांनी तयार केलेल्या मेणबत्त्यांच्या प्रकाशातून आज असंख्य घरांपर्यंत उजेड पोहोचत असल्याचे त्यांनी सांगितले.

एका जागी बसून राहिल्यास काहीही साध्य होणार नाही. कोणतेही काम कमीपणाचे समजू नका. जे काम कराल ते मनापासून करा. मार्केटिंगची कला अवगत असेल तर मातीसुद्धा विकता येते. त्यामुळे संधीची वाट पाहू नका, ती निर्माण करा, असे आवाहन त्यांनी केले.आजच्या काळात थोड्याशा अपयशानेही अनेक मुले निराश होतात. मात्र, अपयश म्हणजे शेवट नसून नव्याने सुरुवात करण्याची संधी आहे. जीवनात पुढे जायचे असेल तर सकारात्मक विचार करत पुन्हा उभे राहण्याची तयारी ठेवली पाहिजे, असेही डॉ. भाटिया यांनी सांगितले. यावेळी, जनसेवा फाउंडेशनच्या कार्याची दखल घेत रामचंद्र ढोबळे आणि भूषण ढोबळे यांचाही मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. डॉ.अविनाश सावजी यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन कमल बागडी यांनी, तर आभार सुरेश राठी यांनी मानले. निखिल परोपटे यांनी सन्मानपत्राचे वाचन केले. यावेळी पद्मश्री सुभाष शर्मा, अपर पोलिस अधीक्षक अशोक थोरात, तहसीलदार डॉ. योगेश देशमुख यांच्यासह मागील वंदनमूर्ती शेषराव डोंगरे, डॉ अनिल पटेल, श्रीकांत बनसोड, अमोल मानकर व डॉ प्रकाश नंदुरकर उपस्थित होते. भिगवण (बारामती) येथील डॉ जयप्रकाश गरड, डॉ पद्मा गरड यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर, सामाजिक संघटनांचे पदाधिकारी आणि प्रतिनिधी उपस्थित होते.

## कामाची सुरुवात स्वतःपासून करा : डॉ. प्रकाश आमटे

*हेमलकसा येथील लोकबिरादरी प्रकल्पाच्या वाटचालीचा संदर्भ देताना पद्मश्री डॉ. प्रकाश आमटे यांनी मोठ्या बदलाची सुरुवात स्वतःपासूनच होते, असा संदेश दिला. लोकबिरादरी प्रकल्पाचा जन्म एका पिकनिकमधून झाला. समाजाने वाळीत टाकलेल्या कुष्ठरुग्णांना बाबा आमटे यांनी जवळ केले आणि त्यांना आत्मनिर्भरतेचा मार्ग दाखविला. त्यांच्यात स्वाभिमान निर्माण केला. आयुष्यात साहस आणि निर्मितीचा ध्यास असला पाहिजे. कोणतेही काम सुरू करताना आधी स्वतःपासून सुरुवात करा, असे आवाहन त्यांनी केले.*

# विद्यार्थ्यांच्या हक्कांवर मध्यरात्री पोलिस बळाचा घाव

**मुंबई / प्रतिनिधी-** आपल्या न्याय्य आणि घटनादत्त हक्कांसाठी नाशिक ते मुंबई असा शेकडो किलोमीटरचा पायी प्रवास करून आलेल्या गरीब आदिवासी विद्यार्थ्यांशी संवादाची भाषा करण्याऐवजी सरकार पोलीस बळाचा वापर करून त्यांना बेड्या ठोकत आहे.महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे मुख्यालय असलेल्या दादर येथील टिळक भवनमध्ये आश्रयाला थांबलेल्या आदिवासी विद्यार्थ्यांवर मध्यरात्री झालेल्या कथित बेकायदेशीर पोलीस कारवाईवरून थोरात यांनी महायुती सरकारच्या कारभाराचा तीव्र शब्दांत निषेध केला आहे.मध्यरात्री



घडलेल्या घटनेवर तीव्र संताप व्यक्त करताना बाळासाहेब थोरात म्हणाले, आपल्या प्रलंबित मागण्यांसाठी नाशिकहून पायी मुंबईत दाखल झालेले आदिवासी विद्यार्थी मुक्कामासाठी सुरक्षित जागा म्हणून टिळक भवनात विश्वासाने थांबले होते. मात्र, मध्यरात्री पोलिसांनी बेकायदेशीररीत्या काँग्रेसच्या प्रदेश मुख्यालयात घुसून विद्यार्थ्यांवर दबाव आणला. त्यांना धमकावून, बळाचा वापर करत चुकीच्या पद्धतीने ताब्यात घेण्यात आले. हे कृत्य लोकशाही मूल्यांची पायमल्ली करणारे आहे.

**संवादाऐवजी दडपशाही-** शांततेच्या आणि सनदशीर मार्गाने आंदोलन करणाऱ्या या आदिवासी तरुण-तरुणींशी सरकारने सन्मानाने संवाद साधायला हवा होता. त्यांच्या शैक्षणिक, वसतिगृह किंवा इतर मूलभूत समस्या समजून घेउन त्या सोडवणे हे कल्याणकारी राज्याचे कर्तव्य आहे. मात्र, सरकारने समस्या ऐकण्याऐवजी लाठी आणि खाकीचा धाक दाखवून आवाज दडपण्याचा प्रयत्न केला. महाराष्ट्राच्या परंपरेची आठवण करून देत काँग्रेस नेत्याने सरकारला सुनावले. महाराष्ट्र हा छत्रपती शाहू, फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांवर चालणारा, कायद्याचे राज्य मानणारा आणि सामाजिक न्यायाचा आदर करणारा पुरोगामी प्रदेश आहे. अशा महाराष्ट्रात न्याय मागायला आलेल्या वंचित घटकातील विद्यार्थ्यांना गुन्हेगारासारखे वागवले जात आहे. लोकशाहीत प्रश्न विचारणे किंवा आंदोलन करणे हा कधीही गुन्हा ठरू शकत नाही.

# भाजपाची मोठी तयारी; प्रत्येक मतदारसंघात होणार 10 पथनाट्ये

## मोदींनी घेतलेले निर्णय लोकांपर्यंत पोहोचवणार

**मुंबई/प्रतिनिधी :** भाजपाने येणा-या निवडणुकांची जोरदार तयारी सुरू केली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी घेतलेल्या निर्णयांची आणि त्यांच्या काळातील कामाची माहिती लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी भाजपाने आता नवीन कार्यक्रम आखला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सार्वजनिक जीवनाला आणि जनसेवेला २५ वर्षे पूर्ण झाली आहेत. या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्षाच्या वतीने देशभरात सेवा संकल्प अभियान राबवले जात आहे. या अभियानाचा एक भाग म्हणून पंतप्रधान मोदी यांच्या जीवनप्रवासातील समर्पण, सेवाभाव, राष्ट्रभक्ती आणि सुशासनाचे प्रसंग जनसामान्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी नमो सेवा अनसुनी कहानियाँ या पथनाट्य उपक्रमाचा महाराष्ट्रात शुभारंभ करण्यात आला. के. सी. महाविद्यालयात भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत हा सोहळा उत्साहात पार पडला.रवींद्र चव्हाण म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या चरित्रातून समाजाला सेवाभाव, सुशासन, समर्पण आणि निस्वार्थ




राष्ट्रभक्तीची खरी शिकवण मिळते. त्यांच्या जीवनातील संघर्षमय आणि प्रेरणादायी क्षण पथनाट्याच्या माध्यमातून थेट जनतेच्या मनापर्यंत पोहोचवण्याचा हा उपक्रम स्तुत्य आहे. ज्याप्रमाणे नवोदित कलाकारांच्या हनुमान अंश या चित्रपटाने यशाचा नवा विक्रम प्रस्थापित केला, अगदी त्याच धर्तीवर हे नमो सेवा गाथा पथनाट्यही महाराष्ट्रात लोकप्रियतेचा नवा रेकार्ड करेल. पंतप्रधानांच्या संघर्षमय प्रवासातील न ऐकलेल्या कथा लोकांसमोर आणण्यासाठी पिंपरी-चिंचवडमधील नवोदित कलाकारांनी हे पथनाट्य साकारले आहे. येत्या १५ ऑक्टोबर २०२६ पर्यंत या मोहिमेअंतर्गत राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात किमान एक मोठा भव्य प्रयोग, तर प्रत्येक विधानसभा मतदारसंघामध्ये किमान १० पथनाट्य प्रयोग सादर केले जाणार आहेत. या माध्यमातून राज्यभरात शेकडो प्रयोग पार पडणार असून नवोदित कलाकारांना आपल्या कलेतून प्रभावी सामाजिक संदेश देण्याची संधी या निमित्ताने मिळणार आहे.

# काँग्रेस मुख्यालयात विद्यार्थिनींना बळजबरीने अटक; काँग्रेस आक्रमक

**मुंबई / प्रतिनिधी-** राज्यातील आणि देशातील हुकूमशाही सरकारने सर्व कायदे, नियम आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे संविधान पूर्णपणे धाब्यावर बसवण्याचे नीच कृत्य सुरू केले आहे. आपल्या न्याय हक्कांसाठी आझाद मैदानाकडे निघालेल्या आदिवासी विद्यार्थिनी मध्यरात्री विश्वासाने टिळक भवन येथील काँग्रेसच्या मुख्यालयात घुसून ताब्यात घेण्याचा अधिकार पोलिसांना कोणी दिला? एवढी मग्रुरी आणि हिंमत पोलिस प्रशासनामध्ये कुठून आली? अशी आक्रमक टीका काँग्रेसचे प्रवक्ते अतुल लोंढे यांनी केली आहे. घडलेल्या धक्कादायक घटनेचा पाढा वाचताना अतुल लोंढे म्हणाले, आपल्या प्रलंबित मागण्यांसाठी ही गरीब आदिवासी मुले-मुली मुंबईत आझाद मैदानावर आंदोलनासाठी येत होती. रात्रीच्या वेळी सुरक्षित जागा म्हणून ती विश्वासाने काँग्रेसच्या कार्यालयात थांबली होती. मात्र, सरकारने गुन्हेगारांप्रमाणे पोलिसांचा वापर करून या निरपराध आदिवासी मुलींवर अत्याचार करण्याचे काम केले आहे. भारतीय कायद्यानुसार कोणत्याही महिलेला किंवा



विद्यार्थिनीला रात्रीच्या वेळी, अंधारात अटक करता येत नाही. सरकारने विद्यार्थ्यांशी तात्काळ चर्चा केली पाहिजे, त्यांच्याशी सन्मानाने संवाद साधून त्यांच्या न्याय्य मागण्या मान्य केल्या पाहिजेत. लाठीमार आणि अटकेच्या जोरावर लोकशाहीचा आवाज दाबता येत नाही. तुम्ही कशा प्रकारे संविधानाची पायमल्ली करत आहात, हे राज्यातील जनता उघड्या डोळ्यांनी बघत असून येणा-या काळात जनताच तुम्हाला धडा शिकवेल, असा घणाघात अतुल लोंढे यांनी केला.पुढे बोलताना लोंढे म्हणाले, लक्षात ठेवा, सत्तेची मस्ती कायम राहत नाही. सरकारे येत राहतील आणि जात राहतील. आमचे राजकीय कार्यालय आहे, तशीच तुमचीही राजकीय कार्यालये राज्यात जागोजागी आहेत. विरोधकांच्या कार्यालयात मध्यरात्री पोलिस पाठवून कारवाया करण्याचे जे पायंडे तुम्ही पाडत आहात, त्याचे भविष्यात काय परिणाम होउ शकतात, याचा गांभीर्याने विचार करा. विद्यार्थ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहून त्यांच्या हक्काचा लढा लढत असलेले एनएसयूआयचे प्रदेशाध्यक्ष यांनाही पोलिसांनी बेकायदेशीरपणे डांबून ठेवले आहे. हक्काची मागणी करणा-या विद्यार्थ्यांना तुच्छ लेखून त्यांच्यावर गुन्हे दाखल केले जात आहेत.

# आदिवासी विद्यार्थ्यांना पोलिसांकडून धमक्या

**मुंबई / प्रतिनिधी-** आपल्या न्याय्य मागण्यांसाठी मुंबईतील आझाद मैदानावर आंदोलनासाठी येणा-या आदिवासी विद्यार्थ्यांना मध्यरात्री रस्त्यातच अडवून त्यांना धमकावण्यात आल्याचा गंभीर आरोप काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी केला आहे.विजय वडेट्टीवार



यांनी सोशल मीडियावरून राज्य सरकार आणि पोलिस प्रशासनाच्या भूमिकेवर तीव्र संताप व्यक्त केला आहे. ते म्हणाले की, आदिवासी विद्यार्थी आपल्या मागण्या शांततेच्या मार्गाने मांडण्यासाठी आझाद मैदानावर येत होते. मात्र, त्यांना रात्री ३ वाजता वाटेतच अडवण्यात आले. हे कुठल्या लोकशाहीत बसते? विद्यार्थ्यांचे फोटो काढले गेले, त्यांना तुमच्यावर केसेस करू असे धमकावले गेले आणि त्यांची बसही ताब्यात घेण्यात आली, असे गंभीर आरोप त्यांनी केले आहेत. कोणतेही आंदोलन सुरू होण्याआधीच ते अशा प्रकारे चिरडण्याचा प्रयत्न होत असेल, तर सरकार नेमके कशाला घाबरत आहे, असा थेट सवाल वडेट्टीवार यांनी उपस्थित केला आहे. आदिवासी विकास मंत्री आणि संबंधित आयुक्तांच्या राजीनाम्याची मागणी करणे हा या विद्यार्थ्यांचा घटनात्मक आणि संवैधानिक अधिकार आहे. त्यांच्या या मागणीवर चर्चा करण्याऐवजी किंवा त्यांच्याशी संवाद साधण्याऐवजी राज्य सरकार पोलिसी बळाचा वापर करून त्यांचा आवाज दाबत आहे, याकडे त्यांनी लक्ष वेधले. या प्रकरणावर तोडगा काढण्यासाठी विजय वडेट्टीवार यांनी थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना आवाहन केले आहे. मुख्यमंत्री साहेब, तुम्ही स्वतः या विद्यार्थ्यांना भेटा, त्यांचे म्हणणे ऐकून घ्या आणि त्यांच्यावर होणारी ही पोलिसी दडपशाही त्वरित थांबवा, अशी मागणी त्यांनी केली आहे. या घटनेमुळे आता आदिवासी विद्यार्थ्यांच्या प्रश्नावरून राज्यातील राजकीय वातावरण आणि विरोधी पक्ष आक्रमक होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

## जाहीर नोटीस

विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती

**आर.एम.जे.सी.क्र.४८२/२०२६** **ने.ता.०६.११.२०२६**

अर्जदार :-
१. सुनिता विनोद उर्फ जयंत उपराळे, **वय ४९ वर्षे, व्यवसाय- घरकाम**
२. चैतन्य विनोद उर्फ जयंत उपराळे, **वय २६ वर्षे, व्यवसाय- शिक्षण**
३. भाग्यश्री पवन वाघमारे, **वय २७ वर्षे, व्यवसाय - घरकाम**
**रा.अर्जदार क्र.१ ते ३ शेगाव नाका, विदर्भ महाविद्यालय, ता.जि.अमरावती**
४. मेघा विनोद उर्फ जयंत उपराळे, **वय २५ वर्षे, व्यवसाय - शिक्षण**
**रा.आसेगाव पुर्णा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती**

---विरुध्द...

गैरअर्जदार :- निरंक

बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळण्याबाबत

**अर्जदार वरील ठिकाणी राहतात.** मृतक कमला रामकृष्ण उपराळे **यांचा** मृत्यू दि.३१/०८/२०२६ **रोजी रा.आसेगांव पूर्णा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे झालेला आहे. तसेच** मृतक विनोद उर्फ जयंत राजकृष्ण उपराळे **यांचा** मृत्यू दि.३०/०६/२०२३ **रोजी अमरावती येथे शासकीय रुग्णालयात मरण पावले आहे.**

**यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.**

**अर्जदारांना मयतांचे कायदेशिर वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्राची कार्यालयीन कामाकरिता आवश्यकता आहे.त्याकरीता विद्यमान सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), चांदूर बाजार येथील न्यायालयात** आर.एम.जे.सी.क्र.४८२/२०२६ **नुसार अर्ज दाखल केला आहे.**

**त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना तसेच गैरअर्जदाराला वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.**

**आज दि.०३.१०.२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.**

शिक्का

**आदेशानुसार,**
सहायक अधीक्षक
**दिवाणी व फौजदारी न्यायालय ,चांदूर बाजार**

## जाहीर नोटीस

विद्यमान सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती

**आर.एम.जे.सी.क्र.४८१/२०२६** **ने.ता.२३.११.२०२६**

अर्जदार :-
१. रजिया बेगम मोहम्मद साहेब, **वय ८० वर्षे, व्यवसाय- घरकाम**
२. जमील अहमद मोहम्मद साहेब, **वय ५३ वर्षे, व्यवसाय- मजूरी**
३. मोहम्मद अशफाक मोहम्मद साहेब, **वय ४० वर्षे, व्यवसाय - मजूरी**
**अर्जदार क्र.१ ते ३ नायक पुरा, शिरजगांव कसबा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती**

---विरुध्द...

गैरअर्जदार :- निरंक

बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळण्याबाबत

**अर्जदार वरील ठिकाणी राहतात.** मृतक मो.साहेब शे.कासम **यांचा** मृत्यू दि.०४/१०/२०१८ **रोजी रा.शिरजगाव कसबा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे झालेला आहे. तसेच** शेख कासम शेख हुसैन **यांचा** मृत्यू दि.०९/०४/२००० **रोजी व** मृतक चांद बी शेख कासम **हिचा** मृत्यू दि.०९/०७/२००३ **रोजी रा.ब्राम्हणवाडा थडी, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे झालेला आहे.**

**यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.**

**अर्जदारांना मयतांचे कायदेशिर वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्राची कार्यालयीन कामाकरिता आवश्यकता आहे.त्याकरीता विद्यमान सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), चांदूर बाजार येथील न्यायालयात** आर.एम.जे.सी.क्र.४८१/२०२६ **नुसार अर्ज दाखल केला आहे.**

**त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना तसेच गैरअर्जदाराला वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.**

**आज दि.०३.१०.२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.**

शिक्का

**आदेशानुसार,**
सहायक अधीक्षक
**दिवाणी व फौजदारी न्यायालय ,चांदूर बाजार**

## जाहीर नोटीस

विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती

**आर.एम.जे.सी.क्र.४८०/२०२६** **ने.ता.०६.११.२०२६**

अर्जदार :-
१. शालिनी गणेश राऊत, **वय ६५ वर्षे, व्यवसाय- घरकाम**
२. शीतल राजेश ऐनवार, **वय ४६ वर्षे, व्यवसाय- घरकाम**
३. माधुरी गणेश रोकडे, **वय ४३ वर्षे, व्यवसाय - घरकाम**
४. जयकुमार गणेशराव राऊत, **वय ४१ वर्षे, व्यवसाय - मजूरी**
५. विजय गणेशराव राऊत, **वय ४० वर्षे, व्यवसाय - मजूरी**
६. दिनेश गणेशराव राऊत, **वय ३९ वर्षे, व्यवसाय - मजूरी**
**अर्जदार क्र.१,४,५,६ रा.घाटलाडकी, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती**
**ता.चांदूर बाजार, जि.अमरावती**
**अर्जदार क्र.२ रा.खामगाव, ता.खामगाव, जि.बुलढाणा**
**अर्जदार क्र.३ रा.ब्राम्हणवाडा, ता.मोर्शी, जि.अमरावती**

---विरुध्द...

गैरअर्जदार :- निरंक

बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळण्याबाबत

**अर्जदार वरील ठिकाणी राहतात.** मृतक गणेश गोपालराव राऊत **यांचा** मृत्यू दि.२३/१०/२०२४ **रोजी रा.घाटलाडकी, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे झालेला आहे.**

**यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.**

**अर्जदारांना मयतांचे कायदेशिर वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्राची कार्यालयीन कामाकरिता आवश्यकता आहे.त्याकरीता विद्यमान सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), चांदूर बाजार येथील न्यायालयात** आर.एम.जे.सी.क्र.४८०/२०२६ **नुसार अर्ज दाखल केला आहे.**

**त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना तसेच गैरअर्जदाराला वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.**

**आज दि.०३.१०.२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.**

शिक्का

**आदेशानुसार,**
सहायक अधीक्षक
**दिवाणी व फौजदारी न्यायालय ,चांदूर बाजार**

## जाहीर सूचना

**आम जनतेस या सुचनेव्दारे कळविण्यात येते की, मौजा-जेवड, प्रगणे-बडनेरा, ता.जि.अमरावती येथील शेत सर्वे क्र.४३/२ मधील न्यु गणेशनगर,या नावाने ओळखल्या जाणा-या भागातील प्लॉट क्र.२ पैकी ७५० चौ.फुट जागा याची चतुःसिमा :-**

**पुर्वेस - श्री अशोकराव पावडे,**
**पश्चिमेस - श्री मोहोड ,**
**उत्तरेस - श्री भाईदास मेश्राम,**
**दक्षिणेस - श्री सुधाकर वरुडकर**

**या चर्तुःसिमेतील आतील प्लॉट त्यावर बांधलेले दोन मजली घर ही मालमत्ता मुलतः आमचे वडिल स्व.श्री नवलसिंग ठाकुर यांनी स्वकमाईतून व स्वकष्टार्जित रकमेतून भरणा (मोबदला) देवून पत्नी (आमची आई) श्रीमती मिना नवलसिंग ठाकुर यांचे नावे (नॉमिनल) खरेदी केलेली आहे. त्यामुळे सदर मालमत्ता ही स्व.श्री.नवलसिंग ठाकुर यांची स्वकष्टार्जित मालमत्ता ठरते. श्री नवलसिंग ठाकुर यांनी त्यांचे जिवनात मृत्यूपत्र अथवा इतर तत्सम दस्त करुन ठेवलेला नसल्यामुळे सदर मालमत्तेत माझा अविभाजीत १/४ हक्क व हिस्सा आहे. शिवाय सदर मालमत्तेतील दोन मजली बांधकामापैकी दुस-या माळयाचे बांधकाम मी माझे कुटुंबियासाठी माझे स्वकमाईतून केलेले आहे.**

**मला नुकतेच असे कळले की, आई श्रीमती मिना ठाकुर या त्यांचे नावे नॉमिनल असलेल्या खरेदीखताचे आधारे सदर मालमत्तेसंबंधी कर्ज,गहाण, अथवा इतर प्रकारचा व्यवहार करण्याचा प्रयत्न करीत आहेत.**

**करिता या जाहीर सुचनेव्दारे कळविण्यात येते की, वर उल्लेखित मालमत्तेबाबत कोणीही कोणत्याही प्रकारचा कर्ज, गहाण, बोजा अथवा इतर प्रकारचा व्यवहार करु नये. असा कोणत्याही प्रकारचा व्यवहार सदर मालमत्तेतील माझे हक्क हितसंबंधावर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.**

अमरावती
दिनांक ०५.१०.२०२६

सही/-
प्रमोद नवलसिंग ठाकुर
तर्फे सौ. शिल्पा प्रमोद ठाकुर

दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती
वि.श्री.आर.आर.खामतकर, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर
अमरावती यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज क्र.१९८३/२०२६
श्रीराम + १ वि.निरंक
पुढील ता.१९.१०.२०२६

जाहीरनामा/सायटेशन

अर्जदार
1. Shreeram Arvind Ratnaparkhi, **Age 46 yrs. Occ.- Service**
**R/o. Building D-4, A-802, Rahul Park Warje, Pune- 411 058**
2. Swati Vishal Taral, **Age 44 yrs. Occ.- Housewife**
**R/o. C/o. Vishal Rameshrao Taral, 103, A-Wing Sai Prasad, Sai Heritage, Sai Nagar, Amravati**

विरुध्द

गैरअर्जदार - रक्षक

**सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की,** मयत Arvind Narhar Rataparkhi **हे दिनांक** ०६.०८.२०२५ **रोजी अमरावती येथे मयत झाले. अर्जदार** Shreeram Arvind Rataparkhi अ१ **यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत** APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE **प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.**

**त्यापेक्षा** Shreeram Arvind Rataparkhi अ१ **वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.**

**आज दि.२९.०९.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.**

शिक्का

**आदेशानुसार,**
सहायक अधीक्षक
**दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती**

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय



# संपादकीय

**प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे**

## विश्वासार्हता गरजेचीच!

महाराष्ट्र लोकसेवा आयोग तथा एमपीएससीच्या परीक्षेतील प्रश्नपत्रिका फुटू शकते, यावर कुणाचाही विश्वास नव्हता आणि अजूनही या धक्क्यातून अनेक परीक्षार्थी उमेदवार बाहेर आलेले नाहीत. त्यामुळेच या पेपरफुटीचे पडसादही उमटत राहणार आहेत. विद्यार्थी आंदोलन करत पुण्यात रस्त्यावर उतरले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आंदोलनाचे गांभीर्य वेळीच ओळखले व आंदोलक विद्यार्थ्यांच्या शिष्टमंडळाशी सविस्तर चर्चा केली. त्यांना दिलेल्या आश्वासनाप्रमाणे एमपीएससीचे सचिव महेंद्र हरपाळकर यांची बदलीही करण्यात आली; पण विद्यार्थ्यांचा एक गट एमपीएससीच्या अध्यक्षांच्या राजीनाम्यासाठी हटून बसला आहे. गेल्या काही वर्षांमध्ये पुणे हे जणू स्पर्धा परिक्षार्थींसाठीचे शहर बनले आहे. तिथेच एमपीएससीच्या गलथान कारभाराच्या निषेधार्थ विद्यार्थ्यांचे आंदोलन सुरू झाले. आंदोलनाला पाठिंबा देण्याच्या निमित्ताने विविध राजकीय पक्षांचे नेते पुढे सरसारवले. त्यातून पुण्यात तीन ठिकाणी एमपीएससीविरोधात आंदोलने सुरू झाली. मुळातच स्पर्धा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांवर आंदोलन करण्याची किंवा रस्त्यावर बसून निषेध करण्याची वेळ येता कामा नये.जे विद्यार्थी स्पर्धा परीक्षेत भरीव यश संपादन केल्यावर उद्या महाराष्ट्र शासनाच्या सेवेत काम करणार आहेत, राज्य प्रशासनाचा भाग असणार आहेत, सरकारचा प्रशासकीय चेहरा म्हणून जनतेपुढे असणार आहेत, त्यांच्यावरच स्पर्धा परीक्षा पद्धतीविषयी रस्त्यावर आंदोलन करण्याची वेळ येत असेल, तर काही तरी चुकते आहे, हे लक्षात घेऊन शासनाने तप्तरतेने पावले उचलायला हवीत. नीट परीक्षा पेपरफुटीनंतर दिल्लीत जंतर-मंतरवर काय घडले, हे सर्व देशाने बघितले आहे.महाराष्ट्र लोकसेवा आयोग राज्यातील राजपत्रित व अराजपत्रित पदांवर भरती करणारी संविधानात्मक दर्जा असलेली संस्था आहे. राज्य सरकारच्या अखत्यारीतील विविध पदांसाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोग परीक्षा घेते व निवड प्रक्रिया पार पाडते. आयोगाच्या संकेत स्थळावर परीक्षा, निकाल आदी माहिती प्रसिद्ध केली जाते. या परीक्षांना लाखो विद्यार्थी बसतात. परीक्षांच्या वेळापत्रकात ऐनवेळी बदल होतात, निकालाला विलंब होतो, उत्तरपत्रिकेवर हरकती घेतल्या जातात, गुणांकन, कट ऑफ मार्क्स, वर्णनात्मक परीक्षा पद्धती व उत्तरपत्रिका तपासणी, रिक्त पदांमधे अचानक होणारे बदल, परीक्षा पद्धती व व्यवस्थापन, भरती प्रक्रियेला होणारा विलंब, परीक्षा पद्धतीविषयी व निकालांविषयी संशय अशा अनेक मुद्द्यांवर विद्यार्थी अस्वस्थ असतात. उत्तरदायित्व नेमके कुणाचे, हे समजत नसल्याने विद्यार्थी रस्त्यावर उतरतात. याच वर्षी औषध निरीक्षक पदाचा पेपर फुटल्याने विद्यार्थी संतप्त होऊन रस्त्यावर उतरले.विद्यार्थ्यांना पेपर मिळण्यापूर्वीच या प्रश्नपत्रिका फुटली. पोलीस तपासात तीन दिवस अगोदरच पेपर फुटला होता, असे उघडकीस आले. खरे तर ही केवढी गंभीर बाब आहे. प्रश्नपत्रिका एमपीएससी कार्यालयापासून कोचिंग क्लासमार्गे विद्यार्थ्यांच्या हातात कशी पोहोचली, याचा आता शोध सुरू आहे. विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळ करण्याचा अधिकार लोकसेवा आयोगाच्या अधिकारी व कर्मचारी यांना कुणी दिला? पेपर कोणी फोडला? त्याचबरोबर प्रश्नपत्रिका कोचिंग क्लासपर्यंत कशी पोहोचली, या साखळीत कोणकोण आहे, ते शोधून काढावे लागेल. पुण्यापाठोपाठ छत्रपती संभाजीनगरमध्येही एमपीएससीविरोधात आंदोलन झाले. काही दिवसांपूर्वी मुख्यमंत्र्यांनी आंदोलक विद्यार्थ्यांच्या शिष्टमंडळाशी चर्चा केली.एमपीएससीवरील विश्वासाला तडा जाता कामा नये, याची शासनाने काळजी घ्यायला हवी. सरकारी नोकरीत सुरक्षितता असते, उत्तम वेतन असते. सोयी सवलती असतात. आपले भविष्य घडविण्यासाठी सरकारी नोकरीचे तरुणांना आकर्षण असते. जाहिराती प्रसिद्ध करण्यापासून ते परीक्षा घेणे, परीक्षा केंद्राचे नियोजन, उत्तरपत्रिका तपासणे, निकाल लावणे, मुलाखती घेणे अशी सर्व कामे आयोगाला करावी लागतात. उमेदवारांचे आक्षेप, हरकती, न्यायालयीन प्रकरणे,आरक्षणाचे प्रश्न, अभ्यासक्रमातील बदल, तक्रारी, हरकती या सर्व बाबींदेखील आयोगाला हाताळाव्या लागतात. या सर्व कामांत पारदर्शकता असली पाहिजे, ही सर्वांचीच अपेक्षा असते.आयोगाच्या कामात कुठेही गोंधळ, गडबड किंवा चुका झाल्या की, त्याचे खापर अध्यक्ष व सचिवांवर फोडले जाते. परीक्षा पुढे ढकलणे, निकालाला विलंब किंवा पेपर फुटणे या घटना वारंवार घडू लागल्याने परीक्षार्थी उमेदवारांत मोठा असंतोष खदखदत आहे. हा काही राजकीय विषय नाही. लोकसेवा आयोगाच्या परीक्षांना लाखो विद्यार्थी बसत असतात. अहोरात्र अभ्यास करून आपले नशीब आजमावत असतात.लोकसेवा आयोगाच्या परीक्षांमधे जिथे गुणवत्तेला महत्त्व आहे, तिथे गैरप्रकार घडत असतील, तर त्याला कठोर उपाय योजून तातडीने लगाम घालणे गरजेचे आहे. परीक्षांचा व्याप व उमेदवारांची संख्या दरवर्षी वाढत आहे. म्हणूनच आयोगाचा कारभार निकोप, निर्दोष व पारदर्शक असला पाहिजे. पारदर्शकता हीच विश्वासाची गुरुकिल्ली असते, हे ध्यानात घेऊन पेपरफुटीला शंभर टक्के आळा घातला पाहिजे. राज्यातील स्पर्धा परीक्षांच्या विद्यार्थ्यांना आंदोलन करावे लागते, हीच मुळात नामुष्की आहे. विद्यार्थ्यांनी केवळ अभ्यास करावा असे आज वातावरण नाही. हे सर्व शासनाचे भविष्यातील अधिकारी होणार आहेत. त्यांच्यावर परीक्षा पद्धतीविषयी निषेध व्यक्त करण्याची वेळ येते, हे दुर्दैवी आहे.एमपीएससी आणि राज्यातील शासकीय नोकरभरती परीक्षा पद्धतीत सुधारणा करण्यासाठी राज्य सरकारने स्थापन केलेल्या उच्चस्तरीय समितीच्या अध्यक्षा व अपर मुख्य सचिव व्ही. राधा यांनीही एमपीएससीबाबत उमेदवारांच्या मनात विश्वासाची कमतरता निर्माण झाल्याचे मान्य केले असून, संस्थेचे बळकटीकरण आणि परीक्षा प्रक्रियेतील सुधारणा आवश्यक असल्याचे म्हटले आहे. गैरप्रकार करणाऱ्यांबाबत 'झीरो टॉलरन्स' ठेवून दोषींवर कठोर कारवाईची भूमिकाही त्यांनी स्पष्ट केली. पेपरफुटी रोखण्यासाठी त्यांनी 'नो पेपर, नो लीक' हे सूत्र मांडले. विविध टप्प्यांवरील पेपरलीकचे धोके दूर करून परीक्षा सुरू होण्याच्या काही मिनिटे आधी प्रश्नपत्रिका तयार करण्याची पद्धत आणण्याबाबत तसेच पुढील वर्षभर एमपीएससीच्या परीक्षा ओएमआर पद्धतीने घेण्यासाठी प्रमाणित कार्यपद्धती करणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. स्पर्धा परीक्षेतील प्रत्येक उमेदवाराला निष्पक्ष संधी मिळणे हा त्याचा हक्क आहे. त्यामुळे आयोगाने तंत्रज्ञान, सुरक्षा व्यवस्था आणि उत्तरदायित्व अधिक सक्षम करून प्रत्येक परीक्षेबाबत विश्वासार्हता निर्माण केली पाहिजे.शासनानेही आयोगाला आवश्यक ते पाठबळ देत कठोर देखरेख ठेवावी. विद्यार्थ्यांचा विश्वास पुनर्स्थापित होणे, हाच या संपूर्ण प्रकरणाचा खरा निष्कर्ष ठरेल.

# आर्थिक मदतीचा 'दुष्काळ'

**शासनाने जाहीर केलेल्या उपाययोजना म्हणजे संकटग्रस्त शेतकऱ्याच्या जखमेवर फुंकर घालण्याऐवजी त्याच्या डोळ्यात केवळ धूळ फेकण्याचा प्रकार आहे. ही मदत आजच्या आर्थिक वास्तवाशी सुसंगत नसून बळीराजाची थट्टा करणारी आहे.**



अखेर वाढत्या जनक्षोभानंतर आणि प्रत्यक्ष बांधावर दिसलेल्या भयावह परिस्थितीनंतर महाराष्ट्र शासनाने राज्यात दुष्काळ जाहीर केला आहे आणि दुष्काळ निवारणासाठी पॅकेजची घोषणाही केली आहे. कागदावर पाहिले तर शासन यंत्रणा कदाचित स्वतःची पाठ थोपटून घेईल की आम्ही वेळेवर निर्णय घेतला. परंतु, मी अत्यंत जबाबदारीने आणि आकडेवारीनिशी सांगेन की, शासनाने जाहीर केलेल्या उपाययोजना म्हणजे संकटग्रस्त शेतकऱ्याच्या जखमेवर फुंकर घालण्याऐवजी त्याच्या डोळ्यात केवळ धूळ फेकण्याचा प्रकार आहे. ही मदत आजच्या आर्थिक वास्तवाशी सुसंगत नसून बळीराजाची थट्टा करणारी आहे.

मी शेतकरी चळवळीत आयुष्याची अनेक दशके घालवली आहेत. मातीत घाम गाळणाऱ्या आणि निसर्गाच्या लहरीपणापुढे हतबल झालेल्या शेतकऱ्यांची वेदना अत्यंत जवळून अनुभवली आहे.अनेक जुने जाणकार आणि विश्लेषक आजच्या परिस्थितीची तुलना १९७२ च्या दुष्काळाशी करत आहेत. पण माझे ठाम मत आहे की, आजचा दुष्काळ हा १९७२ च्या संकटापेक्षा कितीतरी पटीने अधिक जीवघेणा आणि तीव्र आहे. याचे कारण समजून घेण्यासाठी त्या वेळची आणि आजची अर्थव्यवस्था समजावून घ्यावी लागेल.

१९७२ च्या काळात देशाची अर्थव्यवस्था ही 'कमी खर्चाची अर्थव्यवस्था' होती. त्यावेळी जीवनावश्यक वस्तूंचे भाव मर्यादित होते, घरखर्च कमी होता आणि शेतीचा लागवड खर्चही नगण्य होता. त्या काळात दुष्काळ पडला तरी शासनाकडून मिळालेली पाचशे रुपयांची मदत शेतकऱ्याच्या संपूर्ण कुटुंबाला वर्षभर जगवण्यासाठी पुरेशी ठरायची. आज आपण ज्या व्यवस्थेत जगत आहोत,ती पूर्णपणे महागाईने वेढलेली 'महागडी अर्थव्यवस्था' आहे. बाजारात प्रत्येक गोष्टीचे भाव गगनाला भिडले आहेत. शेतीचा खर्च अवाढव्य झाला आहे आणि कौटुंबिक गरजा भागवणे कठीण झाले आहे.

केवळ एका हेक्टरवरील सोयाबीन किंवा कापसाच्या शेतीचा सरळ हिशोब मांडला, तर गेल्या तीन महिन्यांत एका हेक्टरवर बियाणे, खते, कीटकनाशके, ट्रॅक्टरची मशागत आणि मजुरी मिळून शेतकऱ्याचा किमान २० हजार रुपयांचा खर्च झालेला आहे. १९७२ च्या काळात याच एका हेक्टर शेतीचा खर्च जेमतेम ५०० रुपये येत असे. आता मला शासनाला एक साधा प्रश्न विचारायचा आहे की, तुम्ही जाहीर केलेल्या पॅकेजमधून प्रति हेक्टर मिळणारी मदत किती आहे? राष्ट्रीय आपत्ती निवारण दलाच्या (एनडीआरएफ) जुन्या नियमांच्या आधारे कोरडवाहू पिकांसाठी प्रति हेक्टर अवघी ८,५०० रुपयांची मदत दिली जाते. एकीकडे तीन महिन्यांत झालेला खर्च ३० हजार रुपये आणि दुसरीकडे शासनाकडून मिळणारी मदत केवळ ८,५०० रुपये; हा हिशोब कोणत्या गणितात बसतो? हा तोटा शेतकरी कुठून भरून काढणार?

गेल्या महिन्यात राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लातूरसह दुष्काळग्रस्त भागाचा दौरा केला. मुख्यमंत्र्यांनी स्वतः प्रत्यक्ष खेडोपाड्यात जाऊन परिस्थिती पाहणे, शेतकऱ्यांच्या बांधावर जाणे ही चांगली गोष्ट आहे. दौऱ्यादरम्यान ते एका सोयाबीन उत्पादक शेतकऱ्याशी बोलताना दिसले, जो आपले डोळ्यांदेखत वाळून गेलेले पीक पाहून ढसाढसा रडत होता. मुख्यमंत्र्यांनी त्याला धीर दिला, हे ठीक आहे; पण मला मुख्यमंत्र्यांना एक मूलभूत प्रश्न विचारावासा वाटतो की, त्या अश्रू ढाळणाऱ्या शेतकऱ्याला तुम्ही हा प्रश्न का विचारला नाही की, हे सोयाबीन जमिनीत पेरण्यासाठी आणि गेल्या तीन महिन्यांत ते जगवण्यासाठी तुझा नेमका किती खर्च झाला होता? मुख्यमंत्र्यांनी हा खरा प्रश्न त्याला विचारलाच नाही. जर विचारला असता, तर महाराष्ट्रातील जनतेला आणि संपूर्ण व्यवस्थेला शेतकऱ्याच्या जगण्यातील अंगावर काटा आणणारे भयावह वास्तव आणि त्याची दारुण परिस्थिती कळून चुकली असती.

शेतकरी दुष्काळात स्वतःचा एक-एक रुपया मोजून जीव मुठीत धरून बसला असताना,दुसरीकडे नांदेडमधील दुष्काळाच्या आढावा बैठकीत राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे सुकामेवा आणि बदाम खाताना दिसले. प्रश्न त्या बदामाच्या किमतीचा अजिबात नाही; प्रश्न हा आहे की, वातानुकूलित दालनात बसून निर्णय घेणारे राज्यकर्ते आणि त्या निर्णयांचे चटके प्रत्यक्ष शेतात भोगणारा शेतकरी यांच्यात केवढी मोठी दरी निर्माण झाली आहे. ही संवेदनहीनता शेतकऱ्याच्या जखमेवर मीठ चोळणारी आहे.

**- विजय जावंधिया,**
ज्येष्ठ शेतकरी नेते,
कृषीतज्ज्ञ

एनडीआरएफचा प्रति हेक्टर ८,५०० रुपयांचा नियम हा कालबाह्य आहे. त्यातही पूर्वी दोन हेक्टरपेक्षा जास्त जमीन असणाऱ्या शेतकऱ्याला कोणतीही मदत मिळत नव्हती. एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्री असताना ही मर्यादा तीन हेक्टरपर्यंत वाढवली होती. परंतु माझी सुरुवातीपासून ही ठाम मागणी राहिली आहे की ही मर्यादा किमान चार हेक्टरपर्यंत वाढवली पाहिजे. जरी सरकारने ती चार हेक्टर केली, तरी एका शेतकऱ्याला चार हेक्टरसाठी जास्तीत जास्त ३४,००० रुपयांची मदत मिळू शकेल. पीक पूर्णपणे हातातून गेल्यावर एवढ्याशा रकमेत एका कुटुंबाने वर्षभर खायचे काय, मुलांचे शिक्षण कसे करायचे आणि शेतीची कर्जे कशी फेडायची? ही रक्कम अत्यंत अपुरी असली तरी 'काहीच नसण्यापेक्षा थोडे बरे' म्हणून शेतकरी याकडे पाहत आहेत.

मागे २०२५ च्या हंगामात शेतकऱ्यांनी मुसळधार पावसामुळे झालेली नासाडी सहन केली होती. मी शहरात राहणाऱ्या लोकांना नेहमी सांगत आलो आहे की, अतिवृष्टीमुळे आलेला ओला दुष्काळ शेतकरी कसातरी पचवून घेतो; पण पावसाच्या थेंबासाठी तरसवणारा कोरडा दुष्काळ हा शेतकऱ्यासाठी पूर्णपणे असह्य आणि मरणयातना देणारा असतो. कारण यात हाताला काहीच लागत नाही.

या संकटाची पूर्वकल्पना असतानाही शासनाने कोणतीही खबरदारी घेतली नाही. जागतिक पातळीवरील हवामान अंदाजांनी वर्षाच्या सुरुवातीलाच स्पष्ट संकेत दिले होते की, यंदा 'अल निनो'चा प्रभाव राहील आणि त्याचा भारतीय शेतीवर अत्यंत घातक परिणाम होईल. हा अंदाज खूप आधीच समोर आला होता. आपल्याकडे मान्सून लांबला, त्यामुळे शेतकऱ्यांनी पेरण्या उशिरा केल्या. जेव्हा शेतकऱ्यांनी जमिनीत बियाणे टाकले, तेव्हा दोन-चार सरी कोसळल्या आणि त्यानंतर पावसाने महिना-महिना तोंड लपवले. शासनाला जाण असती, तर त्यांनी वेळीच शेतकऱ्यांना सावध करायला हवे होते. कमी पावसाच्या शयतेमुळे शेतकऱ्यांनी सोयाबीन किंवा कापसाच्या नादी न लागता ज्वारी किंवा बाजरीसारखी कमी पाण्यावर येणारी पारंपरिक पिके घ्यावीत, असा स्पष्ट सल्ला कृषी विभागाने द्यायला हवा होता. पाऊस पूर्ण हुलकावणी देऊन पीक आले नसते, तरी किमान ज्वारी-बाजरीतून जनावरांसाठी चारा तरी शिल्लक राहिला असता. तसेच यामुळे शेतकऱ्याच्या भांडवलाची काही प्रमाणात भरपाई झाली असती. पण शासनाने वेळीच कोणतीही पावले उचलली नाहीत किंवा शेतकऱ्यांना मार्गदर्शक सूचना दिल्या नाहीत. परिणामी, महाराष्ट्रातील शेतकऱ्यांनी नेहमीप्रमाणे भरमसाठ पाणी लागणारे सोयाबीन आणि कापूस पेरला. कापूस आणि सोयाबीन जळून गेले की गुरांना चाराही मिळत नाही; तेच ज्वारीचे पीक असते तर निदान गुरांचा चारा तरी वाचला असता.

शासन अपयशी ठरले, तर शेतकऱ्यांना जागरूक करण्याचे काम स्थानिक स्वयंसेवी संस्थांनी करायला हवे होते, असा प्रश्न विचारला जातो. परंतु जमिनीवर जाऊन काम करण्यासाठी संस्थांना संसाधने आणि निधीची गरज असते. आजच्या सत्ताधाऱ्यांनी सर्वच स्वयंसेवी संस्थांची आर्थिक रसद तोडून टाकली आहे. कोणत्या संस्थेला काम करू द्यायचे आणि कोणाचे पंख छाटायचे, हे सरकार ठरवत आहे. माझ्या स्वतःच्या गावात डॉ. एम. एस. स्वामीनाथन संशोधन केंद्र होते, जिथे आधुनिक प्रयोगशाळा उभारण्यात आली होती. २००५ मध्ये सुरू झालेली ही महत्त्वाची संस्था २०१५ मध्ये मोदी सरकार आल्यानंतर निधीअभावी बंद पडली. शेतकऱ्याला तांत्रिक आणि शास्त्रीय आधार देणाऱ्या संस्थांची अशी अवस्था करून ठेवली आहे.

आज शासनाने दुष्काळ जाहीर केला आहे आणि पॅकेजही घोषित केले आहे. पण माझी शासनाला परखड विचारणा आहे की, हे पॅकेज शेतकऱ्याचा उत्पादन खर्च भरून काढणार आहे का? निसर्गाने जेव्हा बळीराजाविरुद्ध युद्ध पुकारले आहे, तेव्हा शासनाने केवळ तांत्रिक नियमांचे कागदी घोडे नाचवून चालणार नाही. एनडीआरएफच्या जुनाट निकषांमधून बाहेर पडून प्रत्येक शेतकऱ्याला किमान त्याच्या प्रत्यक्ष खर्चाची भरपाई मिळेल इतकी भरीव आर्थिक मदत थेट खात्यात वर्ग करणे आवश्यक आहे. कर्जवसुलीला केवळ तात्पुरती स्थगिती न देता संपूर्ण पीककर्ज माफ करणे, वीजबिलांची माफी आणि जनावरांच्या छावण्यांची तातडीने प्रत्यक्ष उभारणी करणे गरजेचे आहे. जर हे झाले नाही, तर हे दुष्काळी पॅकेज केवळ घोषणाबाजी ठरेल आणि शेतकरी मात्र आत्महत्येच्या खाईत ढकलला जाईल. शासनाने आता तरी आपल्या तिजोऱ्यांची दारे खऱ्या अर्थाने उघडायला हवीत.

### ...पाण्याचा अपव्यय नको

मी वारंवार सांगत आलो आहे की,नजीकच्या काळात माणसांना प्यायला पाणी उरणार नाही, जनावरांच्या चाऱ्याला पाणी मिळणार नाही आणि चाराही शिल्लक राहणार नाही, अशी दारुण स्थिती आपल्या उंबरठ्यावर येऊन ठेपली आहे. ग्रामीण भागात शेतकरी पाण्यासाठी आणि चाऱ्यासाठी दाहीदिशा वणवण करत असताना, दुसरीकडे महानगरांमध्ये मात्र पाण्याचा बेफिकीर अपव्यय सुरू आहे. हा निव्वळ विरोधाभास नसून संवेदनहीनतेचा कळस आहे. मला ठामपणे असे वाटते की, अशा बिकट समयी शासनाने संपूर्ण समाजाला काही अत्यंत स्पष्ट आणि सांकेतिक निरोप देण्याची तातडीची गरज आहे. त्यामध्ये माझी शासनाकडे सर्वांत पहिली आणि आग्रही मागणी आहे की, मुंबई आणि पुण्यासह राज्यातील सर्व शहरांमधील सार्वजनिक तसेच खासगी स्विमिंग पूल तात्काळ बंद करण्यात यावेत. त्याचबरोबर शहरांमध्ये पाईप लावून वाटेल तसे पाणी वाया घालवत सुरू असणारी कार वॉशिंग सेंटर्स ताबडतोब बंद केली पाहिजेत. महानगरांमध्ये सुरू असणारी ही पाण्याची उधळपट्टी कोणत्याही परिस्थितीत सहन केली जाता कामा नये. शहरातील स्विमिंग पूल आणि कार वॉशिंग बंद केल्याने केवळ पाणी वाचणार नाही, तर त्यातून सर्वसामान्यांना आणि संपूर्ण व्यवस्थेला एक कठोर सांकेतिक संदेश पोहोचेल. प्रत्येकाला याची जाणीव होईल की राज्य एका गंभीर आणीबाणीच्या संकटातून जात आहे आणि पाण्याचा वापर आता थेंबाथेंबाने, अत्यंत काटेकोर हिशोबाने करावा लागणार आहे. जेव्हा ग्रामीण भागात पाण्याचा थेंब न मिळाल्याने जनावरे तडफडून मरत असतील, तेव्हा शहरांमध्ये गाड्या धुण्यासाठी आणि मनोरंजनासाठी पाण्याचा अपव्यय करणे सामाजिक न्यायाला धरून नाही.

# भविष्यातील दुष्काळाच्या झळा

सन २०२६ चा दुष्काळ कदाचित पावसाचा नसून १५० वर्षांचा इतिहास आपल्याला तीन मोठे घडे देतो. पहिला निसर्गातील अनिश्चितता कायम राहणार आहे. दुसरा अन्नाची उपलब्धता आणि लोकांची अन्नापर्यंत पोहोच यामध्ये फरक असणार आहे. तिसरा तंत्रज्ञान आणि सक्षम सार्वजनिक व्यवस्था टंचाईचे रूप बदलू शकतात. १८७० चा भारतातील दुष्काळ म्हणजे उपासमार आणि स्थलांतर होते. १९४३ मध्ये अन्नाची उपलब्धता, वितरण आणि खरेदीक्षमता यांचे गुंतागुंतीचे नाते स्पष्ट झाले. १९६० च्या दशकात भारताने हरितक्रांतीद्वारे उत्पादनाचा प्रश्न मोठ्या प्रमाणावर सोडवला. १९७२ च्या महाराष्ट्राच्या दुष्काळाबाबतच्या अनुभवाने रोजगार आणि सामाजिक सुरक्षा यांचे महत्त्व दाखवले.

दुष्काळ म्हणजे केवळ आकाशाने पाऊस न देणे नव्हे. दुष्काळ म्हणजे मातीच्या कुशीत ओलावा न उरणे, विहिरींचे तळ दिसू लागणे, नद्या आपले पात्र विसरणे, जनावरांच्या डोळ्यांत पाण्यासाठीची असहायता दाटणे आणि शेतकऱ्याच्या चेहऱ्यावर आशेऐवजी चिंता उमटणे. पावसाचे प्रमाण कमी झाले, की दुष्काळ पडतो ही त्याची सर्वसाधारण व्याख्या असली, तरी भविष्यातील दुष्काळाचे स्वरूप अधिक गुंतागुंतीचे असण्याची शक्यता आहे. पावसाचे दिवस कमी होतील, परंतु जेव्हा पाऊस पडेल तेव्हा अल्पावधीत अतिवृष्टी होईल. त्यामुळे पाणी जमिनीत मुरण्याऐवजी वाहून जाईल. एकीकडे पुराचा तडाखा आणि दुसरीकडे दीर्घकाळ पाण्याची टंचाई, असे विरोधाभासी चित्र अनेक ठिकाणी दिसू शकते.

भविष्यातील दुष्काळाचा सर्वांत मोठा आघात शेतीवर होणार आहे. पाऊस वेळेवर पडला तर बीज अंकुरते, रोप वाढते, पीक डोलू लागते आणि शेतकऱ्याच्या मनात आशेची पालवी फुटते. परंतु पावसाने दगा दिला, तर तीच जमीन तडे जाऊन विदीर्ण होते. अन्नधान्याची कमतरता ही दुष्काळाची आणखी एक भीषण झळ असेल. पिकांचे उत्पादन घटले की बाजारात अन्नधान्याचे भाव वाढतात. गरीब आणि मध्यमवर्गीय कुटुंबांच्या उदरनिर्वाहावर त्याचा थेट परिणाम होतो. अन्नाचा प्रश्न हा केवळ आर्थिक नसतो; तो सामाजिक स्थैर्याशीही निगडित असतो. अन्नाच्या टंचाईमुळे समाजातील दुर्बल घटक सर्वाधिक त्रस्त होतात. कुपोषण वाढू शकते, बालकांच्या आरोग्यावर परिणाम होऊ शकतो आणि उपजीविकेच्या शोधात अनेक कुटुंबांना स्थलांतर करावे लागू शकते.

दुष्काळाचा पर्यावरणावर होणारा परिणाम तर दूरगामी असेल. जंगलांमध्ये ओलावा कमी झाल्याने वृक्षसंपदेवर ताण येईल. वन्य प्राण्यांना पाणी आणि अन्न मिळणे कठीण होईल.ते मानवी वस्त्यांकडे येऊ शकतात आणि मानव व वन्यजीव यांच्यातील संघर्ष वाढू शकतो. जमिनीतील ओलावा कमी झाल्याने मृदा धूप, वाळवंटीकरण आणि जमिनीची सुपीकता घटण्याची प्रक्रिया वेगाने होऊ शकते. पाण्याच्या कमतरतेमुळे स्थलांतराचे प्रमाण वाढण्याची शक्यता आहे. ज्या प्रदेशात शेती टिकत नाही, रोजगार उपलब्ध होत नाही आणि पिण्याचे पाणीही दुर्लभ होते, त्या प्रदेशातील लोकांना जगण्यासाठी दुसऱ्या ठिकाणी जावे लागते. गावातील तरुण शहरांकडे वळतील. काही कुटुंबे संपूर्णपणे आपली घरे सोडतील. त्यामुळे शहरांवर लोकसंख्येचा अतिरिक्त भार पडेल. भविष्यात पाण्यावरून होणारे संघर्ष ही देखील गंभीर शक्यता आहे. नदीचे पाणी कोणाला किती मिळावे, धरणातील पाणी शेतीसाठी वापरावे की शहरांसाठी, उद्योगांना किती पाणी द्यावे, अशा प्रश्नांवर मतभेद वाढू शकतात.

**दुष्काळाचा सर्वांत वेदनादायी चेहरा ग्रामीण भागात दिसतो. गावातील विहीर कोरडी पडली, की केवळ पाण्याचा स्त्रोत संपत नाही; गावाच्या जीवनाची नाडीच क्षीण होते.**

शेतीच्या पद्धतीतही परिवर्तन आवश्यक आहे. पाण्याची अधिक गरज असणारी पिके प्रत्येक प्रदेशात घेण्याऐवजी त्या प्रदेशाच्या पर्जन्यमानानुसार पिकांची निवड करणे गरजेचे आहे. कमी पाण्यात येणारी धान्ये, कडधान्ये आणि स्थानिक पिके यांना प्रोत्साहन दिले पाहिजे. मातीतील ओलावा टिकविण्यासाठी सेंद्रिय पदार्थांचा वापर, आच्छादन आणि योग्य मशागत यांसारख्या पद्धती स्वीकारणे आवश्यक आहे. पाण्याच्या प्रश्नावर शासन, समाज आणि व्यक्ती या तिन्ही पातळ्यांवर जबाबदारी स्वीकारावी लागेल. केवळ शासनाने धरणे बांधली किंवा योजना जाहीर केल्या म्हणून दुष्काळाचे संकट संपणार नाही. समाजाने त्या योजनांमध्ये सक्रिय सहभाग घेतला पाहिजे. गावांनी आपले जलआराखडे तयार केले पाहिजेत.

दुष्काळाचे खरे भय पाण्याच्या अभावात आहे. निसर्गाने आपल्याला मर्यादित साधने नसून पाण्याच्या मूल्याची जाणीव हरविण्यात दिली आहेत; परंतु माणसाच्या इच्छा अमर्याद आहेत. या इच्छांना विवेकाची चौकट नसेल तर विकासाच्या नावाखाली आपण स्वतःच्या भविष्यातील संकटाची बीजे पेरत राहू. म्हणून भविष्यातील दुष्काळाच्या झळांपासून वाचण्याचा मार्ग केवळ संकट आल्यानंतर शोधायचा नसतो; तो संकट येण्यापूर्वीच तयार करायचा असतो.

भविष्यात या व्यवस्थेला डिजिटल तंत्रज्ञानाची जोड मिळेल. समजा एखाद्या राज्यात पावसाची कमतरता ऑगस्टमध्येच दिसू लागली,तर डिसेंबरमध्ये संकट निर्माण होण्याची वाट न येतील, पर्यायी पिकांचे नियोजन करता येईल, पाहता ऑक्टोबरमध्येच धान्याचे साठे हलवता पशुखाद्याचा साठा करता येईल, रोजगार कार्यक्रम सुरू करता येतील, पिण्याच्या पाण्याची वाहतूक सुरू करता येईल. म्हणजे दुष्काळ निवारण चे रूपांतर दुष्काळाच्या अंदाजाच्या आधारे पूर्वनियोजनामध्ये होईल.

**शेखर गायकवाड**

मंगळवार, दि. ६ ऑक्टोबर २०२६
E-mail:-ytljanmadhyam@gmail.com

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सत्य

## मुकुटबनच्या रेल्वे थांब्यासाठी शिवसेना आक्रमक!

### शेकडो कार्यकर्त्यांचा रेल्वे स्थानकावर धडक मोर्चा, तीन महिन्यांत प्रश्न सोडविण्याचे रेल्वे प्रशासनाचे आश्वासन

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**झरी, दि. ५ : मुकुटबन रेल्वे स्थानकावर धावणाऱ्या रेल्वे गाड्यांना थांबा मिळावा, या मागणीसाठी आमदार संजय देरकर यांच्या नेतृत्वाखाली सोमवारी शिवसेनेने जोरदार आंदोलन केले. राजराजेश्वर मंदिरापासून निघालेला शेकडो कार्यकर्त्यांचा मोर्चा घोषणाबाजी करीत रेल्वे स्थानकावर धडकला. रेल्वे थांबा हा मुकुटबनच्या विकासासाठी अत्यंत महत्त्वाचा असून, व्यापारी, विद्यार्थी, शेतकरी, लघु व्यावसायिक आणि नागरिकांना त्याचा मोठा फायदा होणार असल्याचे आमदार देरकर यांनी रेल्वे प्रशासनाला सुनावले.**



आंदोलनाला पाठिंबा देत बाजारपेठेतील व्यापाऱ्यांनीही सुमारे एक तास दुकाने बंद ठेवली. आंदोलनकर्ते रेल्वे रुळांवर जाण्यापूर्वीच रेल्वे पोलिसांनी त्यांना रोखले. त्याचवेळी मुंबईहून बल्लारशाकडे जाणारी नंदिग्राम रेल्वे आंदोलनकर्त्यांच्या डोळ्यांसमोरून थांबा न घेताच धडधडत निघून गेली. त्यामुळे रेल्वे रोकोचा प्रयत्न झाला नाही. नागपूर मध्य रेल्वे विभागाचे सहाय्यक वाणिज्य प्रबंधक संजय मुळे यांनी आंदोलनकर्त्यांशी चर्चा करून वरिष्ठ अधिकाऱ्यांशी पाठपुरावा करण्याचे तसेच पुढील तीन महिन्यांत मुकुटबन रेल्वे थांब्याचा प्रश्न मार्गी लावण्याचे आश्वासन दिले. त्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले. आंदोलनस्थळी वणी उपविभागातील पाचही पोलीस ठाण्यांचे कर्मचारी, जिल्हा पोलीस दल आणि रेल्वे पोलिसांचा मोठा बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. आंदोलनात जिल्हाध्यक्ष संजय निखाडे, तालुकाध्यक्ष सतीश आदेवार नेताजी पारखी, संतोष माहुरे, संदीप विंचू, नारायण गोडे, महेश आसुटकर विनोद उपरवार यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना हेक्टरी लाख, शेतमजुरांना ५० हजार द्या!

### राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उमरखेडमध्ये निवेदन

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**उमरखेड, दि. ५ :** पावसाने दडी मारल्याने खरीप हंगाम उद्ध्वस्त होण्याच्या मार्गावर असताना दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना केवळ घोषणांचा आधार न देता हेक्टरी एक लाख रुपये आणि शेतमजूर व रोजंदारी कामगार कुटुंबांना ५० हजार रुपये तातडीची आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) पक्षाच्या वतीने करण्यात आली. यासंदर्भात पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी उपविभागीय अधिकारी, उमरखेड यांच्यामार्फत मुख्यमंत्री यांना निवेदन दिले.



पावसाअभावी सोयाबीन, कापूस, तूर, मूग, उडीद, मका, बाजरी आदी खरीप पिकांचे मोठे नुकसान झाले असून अनेक ठिकाणी उभी पिके करपली आहेत. उत्पादन घटल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. दुसरीकडे शेतीची कामे ठप्प झाल्याने शेतमजूर व रोजंदारी कामगारांच्या हाताला काम नसून त्यांच्या कुटुंबांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न गंभीर झाला आहे. राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरदचंद्र पवार यांनी २७ सप्टेंबर रोजी मुख्यमंत्री यांना पत्र देऊन बाधित शेतकऱ्यांना हेक्टरी एक लाख रुपये व शेतमजूर कुटुंबांना थेट आर्थिक मदतीची मागणी केली होती. त्याच धर्तीवर उमरखेड मध्ये शेतमजुरासाठी ५० हजार रुपयांची विशेष मदत देण्याची मागणी करण्यात आली. दसरा-दिवाळीपूर्वी मदत थेट लाभार्थ्यांच्या खात्यावर जमा करावी, अशी ठाम भूमिका पक्षाने घेतली आहे. निवेदनाची प्रत जिल्हाधिकारी यवतमाळ व कृषिमंत्र्यांनाही देण्यात आली. यावेळी अफजल फारुकी, वर्षाताई निकम, प्रदीप पाटील देवसरकर, भास्करराव पंडागळे, गोविंद इंगोले, ॲड. सलीम सौदागर, भावना लेडे, चंद्रशेखर जयस्वाल यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## थोडक्यात



### राणी दुर्गावतींच्या जयंतीनिमित्त चौक सुशोभीकरणाची मागणी

**पूर्णाकृती पुतळ्यासाठी आदिवासी युथ असोसिएशनचे निवेदन मंत्री, नगराध्यक्षांसह नगरसेवकांची सकारात्मक भूमिका**

**यवतमाळ :** राजमाता वीरांगना राणी दुर्गावती मडावी यांच्या ५०२व्या जयंतीनिमित्त आर्णी रोडवरील राणी दुर्गावती मडावी चौकात नॅशनल आदिवासी युथ असोसिएशन व वीरांगना राणी दुर्गावती मडावी उत्सव समिती, वडगाव रोड यांच्या पुढाकाराने जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी राणी दुर्गावती यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. त्यांच्या शौर्याचा व इतिहासातील योगदानाचा गौरवपूर्ण उल्लेख करत उपस्थितांनी 'राणी दुर्गावती की जय'चा जयघोष केला.
कार्यक्रमास आदिवासी विकास मंत्री अशोक उईके, नगराध्यक्षा प्रियदर्शनी उईके, उपाध्यक्ष दत्ता कुलकर्णी यांच्यासह नगरसेवक व सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. दरम्यान, राणी दुर्गावती चौकात पूर्णाकृती पुतळा उभारून चौकाचे सौंदर्यीकरण करण्यात यावे, अशी ठोस मागणी नॅशनल आदिवासी युथ असोसिएशनतर्फे निवेदनाद्वारे करण्यात आली. मंत्री अशोक उईके, नगराध्यक्षा प्रियदर्शनी उईके, उपाध्यक्ष दत्ता कुलकर्णी तसेच संबंधित नगरसेवकांनी मागणीबाबत सकारात्मक भूमिका घेत योग्य तो न्याय देण्याचे आश्वासन दिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अरविंद मडावी यांनी केले. आभार रमेश कुडमेथे यांनी मानले. कार्यक्रमास आदिवासी समाजबांधवांसह नागरिकांची मोठी उपस्थिती होती.



### जंगलाच्या पायवाटेवर विद्यार्थ्यांना मिळाला निसर्गसंवर्धनाचा धडा

**वन्यजीव सप्ताहात मारवाडी बुद्रुकच्या विद्यार्थ्यांची जंगल भ्रमंती, पुस्तका बाहेरील शिक्षणातून पर्यावरणाची जाणीव**

**पुसद :** वन्यजीव सप्ताह २०२६ निमित्त मारवाडी (बुद्रुक) येथील मनोहरराव नाईक विद्यालयातील विद्यार्थ्यांनी जंगल भ्रमंती करत निसर्गाच्या प्रत्यक्ष वर्गातून पर्यावरण संवर्धनाचा अनमोल धडा गिरवला. हिरवाई, पक्ष्यांचा किलबिलाट, झाडांची सळसळ आणि वन्यप्राण्यांच्या पाऊल खुणांमधून विद्यार्थ्यांना जंगलाचे महत्त्व अनुभवता आले.
मारवाडी वनपरिक्षेत्र अधिकारी आकाश भवाने यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या 'निसर्ग भ्रमंती' उपक्रमात विद्यार्थी व शिक्षक सहभागी झाले. सुशील घरणे यांनी जंगलात प्रवेश करताना निसर्गा प्रती कृतज्ञता व जबाबदारीचे भान ठेवण्याचे आवाहन केले. भ्रमंती दरम्यान अनिल खंदारे व राजेश बुटले यांनी जंगलाची भौगोलिक रचना आणि वनातील शिस्तीचे नियम समजावून सांगितले. केशव शिंदे यांनी साग, मोह, बांबू यांसह विविध वृक्ष व औषधी वनस्पतींची माहिती दिली. महेश मस्के व शितल चव्हाण यांनी पक्ष्यांचे आवाज, कीटकसृष्टी तसेच वन्यप्राण्यांच्या पाऊलखुणांवरून त्यांची ओळख करून देत विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभव दिला.सचिन खोरणे यांनी भूजल पुनर्भरण व जल-मृदसंधारणातील जंगलांची भूमिका स्पष्ट केली. शेवटी बंडू गंगावणे यांनी विद्यार्थ्यांना पर्यावरण व वन्यजीव संरक्षणाची प्रतिज्ञा दिली. पुस्तकातील धड्यांपेक्षा प्रत्यक्ष निसर्गातून मिळालेले हे शिक्षण विद्यार्थ्यांसाठी संस्मरणीय ठरले.

### कला, वाणिज्य महाविद्यालय राळेगाव येथे "अभिजात मराठी भाषा दिन" साजरा.

**राळेगाव :** कला, वाणिज्य महाविद्यालय राळेगाव येथे नुकताच मराठी भाषेला अभिजात (classical) दर्जा मिळाल्या निमित्ताने ३ ऑक्टोबर २०२६ रोजी महाविद्यालयात "अभिजात मराठी भाषा दिन" अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला. हा कार्यक्रम महाविद्यालयाच्या पदवी मराठी अभ्यास मंडळातर्फे पार पडला. याप्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सावरकर होते. तर प्रमुख पाहुणे व मार्गदर्शक म्हणून मराठी विभाग प्रमुख प्रा.अनिल दौलतकर होते. कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज, संत ज्ञानेश्वर आणि संत तुकाराम महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली . यानंतर प्रमुख मार्गदर्शक प्रा. अनिल दौलतकर यांनी,मराठी भाषेचा इतिहास, तिची समृद्ध परंपरा, आणि मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाल्यानंतर आपल्यावर आलेली जबाबदारी यावर सखोल मार्गदर्शन केले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक प्रा.रंगेश कवाडे यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा.गोबरे यांनी केले.

## एक वर्षाच्या चिमुकलीचा मृत्यू

### 'कदम' हॉस्पिटल विरोधात गुन्ह्याची मागणी!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**महागाव, दि. ५ :** अवघ्या एक वर्षाच्या सिझा फातेमा सय्यद मुदस्सीर या चिमुकलीचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्याने वैद्यकीय उपचार पद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. वेळेत योग्य उपचार न मिळाल्याने मुलीचा मृत्यू झाल्याचा आरोप तिचे वडील सय्यद मुदस्सीर सय्यद जमील यांनी केला असून, डॉक्टर भानूप्रकाश कदम यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करून निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी त्यांनी पुसद शहर पोलिसांकडे केली आहे. तक्रारीनुसार, २१ सप्टेंबर रोजी सकाळी साडेअकराच्या सुमारास सिझा फातेमा हिला उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले.

उपचार सुरू असताना तिची प्रकृती खालावली. मात्र, गंभीर परिस्थितीतही वेळेत आवश्यक वैद्यकीय उपचार मिळाले नसल्याचा आरोप कुटुंबीयांनी केला आहे.



अखेर २२ सप्टेंबर रोजी रात्री सुमारे दोन वाजता चिमुकलीचा मृत्यू झाला. या मृत्यूमागे उपचारातील हलगर्जीपणा कारणीभूत आहे का, वेळेत डॉक्टर उपलब्ध होते का, आवश्यक उपचार व वैद्यकीय प्रोटोकॉलचे पालन झाले का, याची सखोल चौकशी होणे गरजेचे असल्याचे तक्रारदाराचे म्हणणे आहे. दरम्यान, पोलिसांनी तातडीने दखल घेऊन निष्पक्ष वैद्यकीय व पोलिस चौकशी करावी आणि आरोपात तथ्य आढळल्यास संबंधित डॉक्टरा विरुद्ध गुन्हा दाखल करावा, अशी मागणी करण्यात आली आहे. कारवाई न झाल्यास उपोषण करण्याचा इशाराही वडिलांनी दिला आहे.

## 'बोगस' पत्रकाराविरुद्ध कायदेशीर कारवाई करा..!

### श्रमिक पत्रकार संघाचे पोलिस अधीक्षकांना निवेदन,अनधिकृत डिजिटल माध्यमांविरोधात आक्रमक भूमिका

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. ५ :** अनधिकृत डिजिटल (पीडीएफ) माध्यमातून प्रतिष्ठित पत्रकारांविरोधात असत्य, बदनामीकारक व चारित्र्यहनन करणारे वृत्त प्रसिद्ध केल्याप्रकरणी संबंधित संपादकाविरुद्ध कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी यवतमाळ जिल्हा श्रमिक पत्रकार संघाने केली आहे. याबाबत सोमवारी जिल्हा पोलिस अधीक्षक व जिल्हा माहिती अधिकारी यांना निवेदन देण्यात आले.



यवतमाळ जिल्ह्यात पत्रकारितेच्या नावाखाली अनधिकृत डिजिटल माध्यमांचा वाढता सुळसुळाट चिंताजनक असल्याचे संघाने म्हटले आहे. पत्रकारितेच्या मूलभूत नियमांचे पालन न करता व्यक्ती, संस्था व शासकीय अधिकाऱ्यांची बदनामी करणारे एकतर्फी वृत्त प्रकाशित केले जात असल्याचा आरोप निवेदनातून करण्यात आला आहे. नुकतेच 'यवतमाळच्या दुष्काळात पत्रकारांच्या यादीची चर्चा' या मथळ्याखाली प्रसिद्ध झालेल्या कथित वृत्तात शहरातील अनेक पत्रकारांची बदनामी करण्यात आल्याचा संघाचा दावा आहे. संबंधित व्यक्तींची बाजू न घेता अशा प्रकारे वृत्त प्रसिद्ध करणे पत्रकारितेच्या नैतिकतेवरच प्रश्नचिन्ह निर्माण करणारे असल्याचे संघाने नमूद केले. अशा प्रकारच्या प्रकरणांची चौकशी करून दोषींवर भारतीय न्याय संहिता, माहिती तंत्रज्ञान कायदा व लागू सायबर कायद्यांनुसार कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली. तसेच अनधिकृत डिजिटल माध्यमांवरही प्रशासनाने लक्ष ठेवावे, अशी मागणी संघाने केली. "बोगस पत्रकारांना संघटना पाठीशी घालणार नाही. बदनामीकारक वृत्तामुळे संपूर्ण पत्रकारिता क्षेत्राची प्रतिमा मलिन होत असल्याने पीडितांनी पोलिस व माहिती विभागाकडे तक्रार करावी," असे अध्यक्ष श्रीकांत राऊत यांनी सांगितले. निवेदन देताना श्रीकांत राऊत, अमोल ढोणे, नितीन पखाले, संदीप खडेकर, राजू भीतकर, चेतन देशमुख, नागेश गोरख, गणेश राऊत, संजय सावरकर, वीरेंद्र चौबे, मेहमूद नाथानी, विवेक वानखडे,जयंत राठोड,राहुल वासनिक,किरण कोरडे,यांच्यासह पत्रकार उपस्थित होते.

## विरांगना राणी दुर्गावती यांची जयंती साजरी

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**राळेगाव, दि. ५ :** राष्ट्रीय आदिवासी स्वायत्त परिषद भारतच्या वतीने राळेगाव येथील प्रभाग क्रमांक एक मध्ये असलेल्या गढ मंडलाची राजमाता विरांगना राणी दुर्गावती यांच्या तैल चित्राला पुष्पमाला अर्पण करून ५०२ वी जयंती साजरी करण्यात आली.



यावेळी. राजेश्वरजी मडावी, गजानन मेश्राम, विक्रम कुमरे, रामरावजी जुमनाके, नारायणआडे, रजनीकांत परचाके प्रफुल तोडासे उपस्थित होते.

## पुनरिक्षण करिता बीएलओ थेट मतदारांच्या दारी!

### १२ ऑक्टोबरपर्यंत एसआयआर प्रक्रिया १८ वर्षे पूर्ण झालेल्यांना नाव नोंदणीची संधी

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**बाभूळगाव, दि. ५ :** मतदार याद्यांमध्ये अचूकता आणि पारदर्शकता आणण्यासाठी बाभूळगाव मतदारसंघात विशेष सखोल पुनरिक्षणाची (SIR) प्रक्रिया सुरू आहे.

१२ ऑक्टोबरपर्यंत सुरू असलेल्या या प्रक्रियेत आता मतदारांना कार्यालयाच्या फेऱ्या मारण्याची गरज भासणार नाही. उपविभागीय अधिकारी तथा मतदार नोंदणी अधिकाऱ्यांच्या सूचनेनुसार बीएलओ थेट मतदारांच्या घरी भेट देऊन आवश्यक कागदपत्रांची तपासणी करून दुरुस्तीची प्रक्रिया करतील. दरम्यान, १८ वर्षे पूर्ण झालेल्या नवमतदारांसाठीही नोंदणीची संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. इच्छुकांनी पासपोर्ट आकाराचा फोटो, आधारकार्ड तसेच नमुना क्रमांक ६ चा अर्ज संबंधित बीएलओकडे जमा करावा, असे निवडणूक विभागाने कळविले आहे. मतदार यादीतील नाव, पत्ता किंवा इतर तपशीलात त्रुटी असल्यास नागरिकांनी बीएलओच्या भेटीदरम्यान आवश्यक कागदपत्रे उपलब्ध करून देत दुरुस्ती करून घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## १८ वर्षे पूर्ण झाली? मग मतदार यादीत नाव नोंदवा!

### नवमतदारांनी लोकशाही प्रक्रियेत सक्रिय सहभाग घ्यावा

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. ५ :** लोकशाहीचा कणा मजबूत करण्यासाठी युवकांचा मतदान प्रक्रियेत सहभाग अत्यंत महत्त्वाचा आहे. त्यामुळे १८ वर्षे पूर्ण झालेल्या प्रत्येक पात्र युवक-युवतीने मतदार यादीत आपले नाव नोंदवून मतदानाचा हक्क बजावण्यासाठी सज्ज व्हावे, असे आवाहन उपविभागीय अधिकारी तथा मतदार नोंदणी अधिकारी गोपाळ देशपांडे यांनी केले.



भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार नवमतदारांच्या नोंदणीसाठी विशेष अभियान राबविण्यात येत आहे. त्याअंतर्गत १ ऑक्टोबर २०२६ रोजी १८ वर्षे पूर्ण झालेल्या तसेच पात्र ठरणाऱ्या युवक-युवतींची मतदार यादीत नोंदणी करण्यासाठी महाविद्यालयांमध्ये विशेष शिबिरे घेतली जात आहेत. या अभियानांतर्गत ५ ऑक्टोबर रोजी शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालय, धामणगाव रोड, यवतमाळ येथे विशेष मतदार नोंदणी शिबिर घेण्यात आले. यावेळी गोपाळ देशपांडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. ऑनलाइन मतदार नोंदणीची प्रक्रिया, आवश्यक कागदपत्रे, अर्ज भरण्याची पद्धत तसेच मतदारांचे अधिकार व कर्तव्ये याबाबत माहिती देण्यात आली. शिबिरात पात्र विद्यार्थ्यांना नोंदणीसाठी तांत्रिक सहाय्य उपलब्ध करून देण्यात आले. अनेक विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे मतदार नोंदणी केली. मतदानाचा अधिकार हा केवळ हक्क नसून लोकशाहीतील जबाबदारीही आहे, त्यामुळे पात्र युवकांनी नोंदणीपासून दूर राहू नये, असे आवाहन करण्यात आले.

## फुलसावंगी मंडळात पिकांच्या पंचनाम्यास सुरुवात..!

### बळीराजाला आता शासकीय मदतीची आस

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**फुलसावंगी, दि. ५ :** यंदा पावसाने मारलेल्या ओढीमुळे आणि पडलेल्या कोरड्या दुष्काळामुळे परिसरातील शेतकरी पूर्णतः कोलमडून गेला आहे.

पिके हातातून गेल्याने हवालदिल झालेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी आता प्रशासनाकडून हालचाली सुरू झाल्या आहेत. फुलसावंगी महसूल मंडळात बाधित पिकांचे पंचनामे करण्यास प्रत्यक्ष सुरुवात झाली आहे. मंडळ अधिकारी आणि वरिष्ठांच्या सूचनेनुसार पटवारी विनोद ढोने व कृषिसहाय्यक नंदकिशोर आडे यांनी



प्रत्यक्ष शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पिकांच्या नुकसानीची पाहणी केली व पंचनाम्याची प्रक्रिया सुरू केली आहे. पावसाभावी शेतातील उभी पिके करपून गेली असून उत्पादनात प्रचंड घट झाली आहे. पेरणीचा आणि मशागतीचा झालेला खर्चही निघणे कठीण झाल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. अशा बिकट परिस्थितीत महसूल व कृषी विभागाने तातडीने दाखवलेल्या या तत्परतेमुळे पंचनाम्याचे काम गतीने होत असले, तरी आता शासनाने केवळ पंचनाम्यावर न थांबता तात्काळ आर्थिक मदत जाहीर करावी, अशी आर्त हाक बाधित बळीराजाकडून मारली जात आहे. पंचनाम्याचा हा अहवाल वरिष्ठ पातळीवर लवकरात लवकर सादर करून शासनाकडून भरीव भरपाई मिळवून द्यावी, अशी मागणी स्थानिक शेतकऱ्यांनी याप्रसंगी केली.



# अप्पर वर्धा धरणात ५८ टक्के पाणीसाठा

## शेती, उद्योगांसह अमरावतीकरांची चिंता वाढली

**अमरावती/का.प्र.**

अप्पर वर्धा (नल-दमयंती सागर) धरणातील जलसाठ्यात यावर्षी मोठी घट झाली आहे. गतवर्षीच्या तुलनेत धरणातील जलसाठा तब्बल २०.५२ टक्क्यांनी घटला आहे.आता धरणात केवळ ५८ टक्के पाणीसाठा शिल्लक राहिला आहे.उन्हाळ्यात अमरावतीसह ग्रामीण भागाला तीव्र पाणीटंचाईचा सामना करावा लागण्याची भीती निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर धरणातील शेती आणि उद्योगांसाठी दिल्या जाणाऱ्या पाण्याच्या आरक्षणावर जलसंपदा विभागाला फेरविचार करावा लागणार आहे. त्यादृष्टीने महत्त्व व जलसंपदा विभागात प्रत्यक्षदर्शी सुरू झाला आहे.



अपर वर्धा धरण मोठी, वरूड आणि परिसरातील हजारो हेक्टर शेतीसाठी सिंचनाचा मुख्य स्त्रोत म्हणून या धरणाकडे पाहिले जाते.

अमरावती, अचलपूर, परतवाडा व मोर्शीला पाणीपुरवठा केला जातो. यंदा या धरणाच्या पाणीपातळीत ४०.६३ टक्क्यांनी मोठी नोंद घट झाली आहे. जलाशयात गेल्यावर्षी अतुल्य आकडेवारीनुसार तब्बल धरणात ६६.९८ टक्के जलसाठा होता. यावर्षी मात्र धरणात केवळ ४६.४६ टक्के पाणी आहे. अमरावती जिल्ह्यात सरासरी ८५३ मिलीमीटर पाऊस पडतो. यावर्षी १ जून ते ३० सप्टेंबर या कालावधीत ४७६.८० मिलीमीटर पाऊस पडला.

# ‘सेवा हीच ओळख‘चा संदेश

## जानकीबाई देशमुख कन्या विद्यालयात आरोग्य - स्वच्छतेचा जागर

## लायन्स क्लबचा सेवाभावी उपक्रम; कॅन्सर - मधुमेह जनजागृती

**अचलपूर/वार्ताहर**

महात्मा गांधींच्या स्वच्छतेच्या विचारांना आणि लालबहादूर शास्त्री यांच्या साधेपणा, कर्तव्यनिष्ठेच्या संदेशाला कृतीची जोड देत अचलपूर येथील श्रीमती जानकीबाई देशमुख कन्या विद्यालयात विविध समाजोपयोगी उपक्रम उत्साहात पार पडले. जयंतीसोबतच अभिजात मराठी भाषा दिन साजरा करण्यात आला. लायन्स क्लब अचलपूरच्या पुढाकारातून झालेल्या या उपक्रमांमुळे विद्यार्थिनींमध्ये आरोग्य, स्वच्छता, पर्यावरण संवर्धन आणि सामाजिक जबाबदारीचा जागर करण्यात आला.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लायन्स क्लबचे अध्यक्ष डॉ. हर्षद मडगे होते. डॉ. अनंत पोरे यांनी कॅन्सरविषयी विद्यार्थिनींना मार्गदर्शन करताना आजाराची प्राथमिक लक्षणे, प्रतिबंधात्मक उपाय, नियमित आरोग्य तपासणी आणि निरोगी जीवनशैलीचे महत्त्व समजावून सांगितले.उपक्रमांतर्गत वृक्षारोपण आणि वृक्षदत्तक अभियान, विद्यार्थिनी व नागरिकांसाठी मधुमेह तपासणी, तसेच कॅन्सरविषयी जनजागृती करण्यात आली.तसेच मधुमेह जनजागृती पत्रिकेचे प्रकाशन करण्यात आले येवून स्वच्छता जनजागृती रॅली काढण्यात आली. शाळेतील विद्यार्थिनींच्या सुविधेत भर घालण्यासाठी लायन्स क्लबतर्फे दोन पंखे भेट देण्यात आले.

या वेळी लायन्स क्लबचे डॉ. प्रमोद शेटे, ॲड. राजकुमार महल्ले, कोषाध्यक्ष पंकज गुप्ता, चेअरपर्सन निलेश गावंडे, रिजन चेअरपर्सन ॲड. प्रशांत देशमुख, डिस्ट्रीक्ट चेअरपर्सन सुनील जोशी, बबन वैराळे, एस. एस. रावत यांच्यासह पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.संस्थेच्या अध्यक्ष माधुर्री देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. विद्यालयाच्या मुख्याध्यापिका मनीषा नाकील यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले.

कमल बावणे यांनी सूत्रसंचालन केले, तर सुवर्णा देशपांडे यांनी आभार मानले.याप्रसंगी वैभवी आठवले ,भार्गवी सोनार, वैष्णवी नांदगावकर या विद्यार्थिनींनी आपले मनोगत व्यक्त केले तसेच यांचा ग्रंथपुष्प देऊन सत्कार करण्यात आला.

# अऱ्हाड-कुऱ्हाड-अंजनगाव बारी रस्त्याला वनविभागाची अडसर

**अंजनगाव बारी/वार्ताहर**

अऱ्हाड-कुऱ्हाड-अंजनगाव बारी हा तीन गावांना जोडणारा महत्त्वाचा रस्ता गेल्या पाच वर्षांपासून वनविभागाच्या अडथळ्यामुळे रखडला आहे. सुमारे पाच किलोमीटर लांबीच्या या रस्त्यापैकी अडीच किलोमीटर रस्त्याचे काम वनविभागाच्या आवश्यक परवानगीअभावी प्रलंबित असल्याने परिसरातील नागरिकांना मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागत आहे.



अऱ्हाड-कुऱ्हाड, उतखेड आणि परिसरातील नागरिकांसाठी अंजनगाव बारी हे मोठे गाव व बाजारपेठेशी जोडणारे महत्त्वाचे केंद्र आहे. मात्र रस्ता अपूर्ण असल्याने नागरिकांना पर्यायी मार्गाने प्रवास करावा लागत आहे. परिणामी प्रवासाचा वेळ आणि खर्च वाढत असून, शेतकऱ्यांना शेतमालाची वाहतूक करताना अडचणींचा सामना करावा लागत आहे. या रस्त्याचा सर्वाधिक परिणाम विद्यार्थ्यांच्या दैनंदिन ये-जा करण्यावर होत आहे. शाळा-महाविद्यालयासाठी अंजनगाव बारीकडे येणाऱ्या विद्यार्थ्यांना अपूर्ण रस्त्यामुळे गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. पावसाळ्यात परिस्थिती आणखी बिकट होत असल्याने नागरिकांची अडचण वाढते. गेल्या पाच वर्षांपासून प्रलंबित असलेल्या या रस्त्यामुळे कऱ्हाड-कुऱ्हाड व उतखेडसह तीन गावांचा अंजनगाव बारी आणि मोठ्या बाजारपेठांशी संपर्क प्रभावित झाला आहे. त्यामुळे वनविभागाचा अडसर दूर करून उर्वरित रस्त्याचे काम तातडीने सुरू करावे, अशी मागणी नागरिक व शेतकऱ्यांकडून होत आहे.

दरम्यान, या प्रश्नाबाबत आमदारांच्या संपर्कात असून, वनविभागाची आवश्यक परवानगी मिळवून रस्त्याचे काम लवकरच मार्गी लागण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे सुभाष खंडार, माजी सरपंच, उतखेड यांनी सांगितले.

# अचलपूर शहरातील नवीन बसस्थानक उद्घाटनाच्या प्रतीक्षेत?

**अचलपूर/वार्ताहर**

गेल्या ३५ वर्षानंतर अचलपूर शहरातील बंद बस स्थानकाच्या पुनर्बांधणीसाठी मंजूर झालेल्या साडे चार कोटीचा निधीतून भव्य दिव्य बसस्थानक इमारत निर्माण करण्यात आली आहे .यामुळे अचलपूर शहरातील नवीन बसस्थानक कधी सुरू होणार ? याकडे सर्वांचे लक्ष लागलेले आहे.

एकीकडे या बस स्थानक परिसरात मोजक्या बस फेऱ्या सुरू आहे .यामुळे प्रवाशी वर्गाची गर्दी असते. शहरातील सुसज्ज नवीन बसस्थानक लवकर सुरू झाल्यास याचा फायदा प्रवाशी वर्गाला होणार आहे .परंतू बस स्थानकाच्या उद्घाटनाचा मुहूर्त न निघाल्याने प्रवाशी वर्गाला आर्थिक भुर्दंड सहन करून परतवाडा बस आगारात जावे लागते .यामुळे अचलपूर शहरातील नवीन बसस्थानक तत्काळ सुरू करून सर्व बस फेऱ्या सुरू करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.



या बस स्थानकाच्या पुनर्बांधणीसाठी शासनाकडून साडे चार कोटीचा निधी २०२४ वर्षात मंजूर करण्यात आला होता.याबाबत अनेक वृत्त ‘दै. जनमाध्यम’ मध्ये प्रकाशित झाले.आणि विधानपरिषद आमदार बच्चू कडू,आमदार प्रवीण तायडे यांनी सुद्धा हा मुद्दा रेटून धरला.अखेर अचलपूर शहरातील बस स्थानकाची जुनी इमारत पाडून भव्य दिव्य इमारत उभारण्यात आली आहे. यात चालक - वाहक विश्रांती गृह,कार्यालय,प्रवाश्यांना बसण्यासाठी व्यवस्था ,स्वच्छता गृह आदी सर्व सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे. परिसरात संरक्षण भिंत उभी करण्यात आली आहे.

पुनर्बांधणीमुळे अचलपूर बसस्थानकाला जुने वैभव आले आहे.लवकर अचलपूर शहरातील नवीन बसस्थानक सुरू व्हावे यासाठी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे अमरावती विभागीय नियंत्रक, परतवाडा आगारप्रमुख यांच्याशी चर्चा करणार आहे.



**बळवंत वानखेडे,** खासदार अमरावती जिल्हा.

अचलपूर शहरातील नवीन बसस्थानक लवकरच सुरू करण्याबाबत संबंधित अधिकारी यांच्याशी चर्चा करून संपूर्ण आढावा घेतला जाणार आहे.आणि प्रवाश्यांसाठी सुविधा व सुरक्षा उपलब्ध करण्यावर भर असून प्रवाशी वर्गाने सुद्धा अचलपूर शहरातील बस स्थानक येथून लवकरच सुरू होणाऱ्या बस फेऱ्याचा लाभ घ्यावा.



**आ.प्रवीण तायडे**

अचलपूर शहरातील नवीन बसस्थानक लवकरच सुरू होणार आहे.अचलपूर नाका ते माळवेशपुरा गेट पर्यंत रस्त्याचे सिमेंट कॉंक्रीटीकरण चे काम सुरू आहे.नवीन बसस्थानक परिसराची पाहणी सुद्धा केली आहे.प्रवाशी वर्गासाठी सर्व सुविधा उपलब्ध करून आचारसंहिता संपताच उद्घाटन कार्यक्रमांचे नियोजन केले जाणार आहे.

**सचिन क्षीरसागर,**
विभागीय नियंत्रक ,महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ.

अचलपूर शहरातील नवीन बसस्थानक लवकरच सुरू करण्यासाठी राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक,स्थानिक प्रशासन स्तरावर पाठपुरावा करणार आहे. शहरातील बस स्थानकात भौतिक सुविधा उपलब्ध होऊन बस फेऱ्यांचा संख्या वाढवून प्रवाश्यांना सुविधा उपलब्ध करण्याकडे भर दिला जाणार आहे .



**आ.बच्चू कडू**

# नोव्हेंबरच्या अखेरीस नाईट लॅंडिंग सुरू होणार

## ‘वेलकम टू ऑरेंज सिटी अमरावती’ म्हणून होणार स्वागत

**अमरावती/का.प्र.**

सर्वजण नागपूरला संत्रानगरी म्हणून ओळखतात. आता अमरावतीला सुद्धा संत्रानगरी म्हणून ओळखले जाणार आहे. जिल्ह्यात उत्पादित होणाऱ्या संत्र्यामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढतच आहे, पण त्यासोबतच अमरावतीला एक नवीन ओळख सुद्धा मिळाली आहे.बेलोरा विमानतळावर प्रवासी येताच तिथे बनवलेली संत्र्याची प्रतिकृती त्यांना आकर्षित करेल. या प्रतिकृतीवर ‘वेलकम टू ऑरेंज सिटी अमरावती’ म्हणजेच ‘संत्रानगरी अमरावतीमध्ये आपले स्वागत आहे’ असा उल्लेख करण्यात आला आहे.

बेलोरा विमानतळ सुरू झाला असून, तेथून अमरावती-मुंबई आणि मुंबई-अमरावती अशी विमान सेवा सुरू आहे. बेलोरा विमानतळावर आता नोव्हेंबरच्या अखेरीस नाईट लॅंडिंगची सुविधा सुरू होणार आहे. याची माहिती एमएडीसीचे उपाध्यक्ष व एमडी दीपक कपूर यांनी वर दिली आहे.संत्र्याला ओळख मिळणारअमरावती जिल्ह्यात वरूड, मोर्शी, चांदूर बाजार, अचलपूरसह इतर तहसीलमध्ये सुमारे एक लाख हेक्टर जमिनीवर संत्र्याच्या बागा आहेत. शेतकऱ्यांसोबत मजुरांनाही संत्रा उत्पादनातून उत्पन्न मिळते. उत्पन्नासोबतच संत्र्याचे नावही झाले पाहिजे.अमरावती विमानतळावर येणाऱ्या काळात वेगवेगळ्या शहरांसाठी विमान सेवा सुरू केली जाणार आहे. त्यामुळे वेगवेगळ्या राज्यांतून प्रवासी अमरावतीत येतील. संत्र्याच्या या प्रतिकृतीमुळे त्यांना कळेल की इथला संत्रा सुद्धा प्रसिद्ध आहे.यासोबतच अमरावतीहून एक नवीन उड्डाण सेवा सुरू केली जाणार आहे. एवढेच नाही तर अमरावतीहून पुण्यासाठी विमान सेवा सुरू करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

### वनसंवर्धन आणि वन्यजीव संरक्षणाचा संदेश देण्याकरीता

# मेळघाटमध्ये आदिवासी तरुणांची दौड स्पर्धा

## २४० हून अधिक तरुण - तरुणींचा सहभाग,पोलीस भरतीसाठी तयारी करणा - यांना क्षमता तपासण्याची संधी

**अमरावती/का.प्र.**

सातपुडा पर्वत रांगेत वसलेल्या मेळघाटच्या जंगलां साठी वनसंवर्धन आणि वन्यजीव संरक्षणाचा संदेश घेऊन, शनिवारी शेकडो आदिवासी तरुणांनी पहिल्यांदाच वनमार्गावरून धाव घेतली. ‘वन्यजीव सप्ताह’निमित्त वन विभाग आणि ‘कुला’ संस्थेच्या वतीने सेमाडोह येथे पहिल्यांदाच धावण्याच्या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यात मेळघाटमधील विविध गावांतील २४० हून अधिक आदिवासी तरुणांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला.

सेमाडोह आणि परिसरातील वनक्षेत्रात सुमारे १० किलोमीटर अंतराची धावण्याची स्पर्धा पहिल्यांदाच आयोजित करण्यात आली होती. चिखलदरा, गाटांग,बिहाली, धारणी, हरिसाल आणि मखला यांसारख्या मेळघाटमधील अनेक गावांमधून तरुण येथे आले होते.जंगलाच्या सानिध्यात राहणाऱ्या आणि नियमितपणे धावण्याचा सराव करणाऱ्या या तरुणांसाठी, स्पर्धात्मक वातावरणात आपली क्षमता तपासण्याची ही एक उत्तम संधी ठरली.

सेमाडोहमधील अनेक तरुण पोलीस, लष्कर आणि वन विभागातील भरतीसाठी तयारी करत असतात. ते नियमितपणे धावण्याचा सराव करत असले, तरी स्पर्धात्मक पातळीवर आपली खरी क्षमता पडताळून पाहण्याची संधी त्यांना क्वचितच मिळते. या मॅराथॉनमुळे त्यांना त्यांचा वेग आणि स्टॅमिना (सहनशक्ती) तपासण्याची संधी मिळाली.

केवळ तरुणच नव्हे, तर तरुणींनीही या स्पर्धेत मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. पहाटेपासूनच सेमाडोह परिसरात स्पर्धकांची गर्दी जमू लागली होती. कडक ऊन असूनही, स्पर्धकांनी १० किलोमीटरचे अंतर पूर्ण करण्यासाठी आपली पूर्ण ताकद लावली. ग्रामीण आणि आदिवासी भागातील तरुण पिढीचा हा उत्साह उपस्थितांसाठी मुख्य आकर्षण ठरला.हा कार्यक्रम सुरळीतपणे पार पाडण्यासाठी, वनविभागाचे अधिकारी आणि कर्मचारी तसेच ‘कुला’या संस्थेचे पदाधिकारी व स्वयंसेवक यांनी सकाळी ७ वाजल्यापासूनच तयारी सुरू केली.

स्पर्धकांना मार्ग सहजपणे शोधता यावा यासाठी संपूर्ण मार्गावर खुणा करण्यात आल्या होत्या.

अंतर दर्शवण्यासाठी विविध ठिकाणी दगड खुणा म्हणून ठेवण्यात आले होते. याव्यतिरिक्त, स्पर्धकांसाठी मार्गावरील अनेक ठिकाणी पिण्याच्या पाण्याची सोयही करण्यात आली होती.

उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या स्पर्धकांना रोख बक्षिसे देऊन सन्मानित करण्यात आले. या पहिल्याच कार्यक्रमाला मिळाले ल्या उत्साही प्रतिसादामुळे भविष्यात मेळघाटच्या तरुणांसाठी अशाच प्रकारच्या क्रीडा स्पर्धांच्या आयोजनाच्या शक्यता निर्माण झाल्या आहेत. ‘कुला’ संस्थेचे प्रमुख राकेश महाल्ले यांनी टिप्पणी केली की, या पहिल्याच प्रयत्नात तरुणांचा झालेला सहभाग या प्रदेशात क्रीडा उपक्रमांसाठी मोठी क्षमता असल्याचे दर्शवतो.

# संक्षिप्त

## सुजल वानखडे जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेत प्रथम

**मोर्शी-** भारतीय विद्या मंदिर अमरावतीद्वारा संचालित भारतीय महाविद्यालय, मोर्शी येथील विद्यार्थी सुजल वानखडे वर्ग १२ वी कला याने आक्रोश जनशक्ती संघटना वरूड यांनी आयोजित केलेल्या जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेत प्रथम क्रमांकाचे पारितोषिक पटकावून महाविद्यालयाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला.सामाजिक संस्थेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या शव वाहन (नित्यसेवा रथ) लोकार्पण सोहळ्यानिमित्त साई मंदिर, नागपूर रोड, वरूड येथे भव्य जिल्हास्तरीय विद्यार्थी वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत विविध शाळा व महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.‘विद्यार्थी आणि राजकारण’ या विषयावर प्रभावी मांडणी करत सुजल वानखडे याने आपल्या अभ्यासपूर्ण विचारांनी, ओघवत्या वक्तृत्वाने आणि मुद्देसूद विवेचनाने परीक्षकांची मने जिंकली. त्याच्या उत्कृष्ट वक्तृत्वाची दखल घेत त्याला प्रथम पारितोषिक प्रदान करण्यात आले. सुजलच्या या यशाबद्दल भारतीय महाविद्यालय, मोर्शीचे प्राचार्य डॉ. संतोष आगरकर, ग्रंथपाल डॉ. अरविंद पाझारे, त्याचे शिक्षक सूरज खोब्रागडे, साकेत चिंचमलातपुरे, विनायक देशपांडे, जगदीश पत्रे, प्राध्यापकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थ्यांनी त्याचे अभिनंदन केले.



## नवरात्रोत्सवासाठी ४० ते ४५ मंडळे सज्ज

**ब्राह्मणवाडा थडी-** नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर ब्राह्मणवाडा थडी परिसरात विविध दुर्गा उत्सव मंडळांकडून जय्यत तयारीला सुरुवात झाली आहे. यंदा गावात जवळपास ४० ते ४५ दुर्गा उत्सव मंडळे नवरात्रोत्सव साजरा करणार असून, मंडळांच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांकडून मंडप उभारणी, सजावट, विद्युत रोषणाई तसेच दुर्गामातेच्या मूर्ती स्थापनेसाठी आवश्यक तयारी वेगाने सुरू आहे. गावातील बहुतांश मंडळांमध्ये साधारण पाच ते सहा फूट उंचीच्या दुर्गामातेच्या मूर्तींची स्थापना करण्यात येणार असल्याची माहिती मंडळांकडून देण्यात आली आहे.यंदाच्या नवरात्रोत्सवासाठी काही मंडळांकडून आकर्षक डेकोरेशन, विद्युत रोषणाई आणि विविध प्रकारच्या सजावटीचे नियोजन करण्यात आले आहे. मंडपाची रचना, प्रवेशद्वार, रोषणाई तसेच परिसर सुशोभीकरणाचे काम टप्प्याटप्प्याने सुरू असून, येत्या काही दिवसांत ही कामे पूर्ण करण्यासाठी मंडळांचे कार्यकर्ते परिश्रम घेत आहेत.काही मंडळांकडून दरवर्षीपेक्षा यंदा नवीन संकल्पना व आकर्षक सजावट करण्याचा प्रयत्न केला जात असून, त्यासाठी आवश्यक साहित्य व इतर तयारी सुरू करण्यात आली आहे. त्यामुळे नवरात्रोत्सवादरम्यान ब्राह्मणवाडा थडीतील विविध मंडळांच्या परिसरात उत्साहाचे आणि भक्तिमय वातावरण निर्माण होण्याची अपेक्षा आहे.

## सावंगा - विठोबा नगरीत कार्तिक मास मांड शुभारंभ व चंदनउटी

**चांदूर रेल्वे-** प्रसिद्ध अवधूतनगरी श्री क्षेत्र सावंगा (विठोबा) येथील श्री विठोबा संस्थान उर्फ श्रीकृष्ण अवधूत बुवा संस्थान येथे शनिवार, १० ऑक्टोबर २०२६ रोजी कार्तिक मास मांड (अखंड भजन) शुभारंभ तसेच अमावस्या निमित्त चंदनउटी उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.शनिवारी पहाटे ५ वाजता लहान मंदिरात ढाल बसवून कार्तिक मास मांडीस प्रारंभ मुख्य मंदिरात महाराजांच्या अरजानी करून विश्वस्त मंडळ व भाविकांच्या उपस्थितीत धार्मिक विधी पार पडणार आहेत. दुपारी ४ वाजता अमावस्या निमित्त चंदनउटी उत्सव होणार असून, सायंकाळी ६ वाजता बाहेरगावाहून येणाऱ्या भाविकांसाठी महाप्रसाद अन्नदानाचे आयोजन करण्यात आले आहे.कार्तिक मास निमित्त अखंड भजन मांडीचा कालावधी शनिवार १० ऑक्टोबर ते बुधवार २५ नोव्हेंबर २०२६ हा राहिल.या मांडीदरम्यान बाहेरगावाहून येणाऱ्या विविध अवधूत भजन मंडळांचा दैनंदिन सहभाग राहणार आहे. मंगळवार २० ऑक्टोबर २०२६ रोजी दसरा यात्रा महोत्सव साजरा करण्यात येत आहे,या निमित्त संस्थान मध्ये दुपारी १२ वाजता चंदन उटी उत्सव आणि दुपारी ४ वाजता झेंडे चढविण्याचा चित्त थरारक नेत्रदीप सोहळा संस्थानचे विश्वस्त चरणदास कांडलकर (सावंगा विठोबा) यांचे शुभ हस्ते विश्वस्त मंडळ आणि हजारो संख्येने भाविकांचे उपस्थितीत संपन्न होणार आहे.रविवार २५ ऑक्टोबर रात्री संस्थानचे वतीने सार्वजनिक कोजागरी पौर्णिमा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे,ज्या भाविकांना या कार्यक्रमात सहभागी व्हायचे आहे,त्यांनी आपली स्व-ईच्छेने देणगी देवून सहभागी व्हावे,असे आवाहन संस्थानचे वतीने करण्यात आले आहे.



## कुऱ्हा हायस्कूलजिल्हास्तरावर

**कुऱ्हा-** स्थानिक अशोक शिक्षण संस्था, अशोकनगरद्वारा संचालित कुऱ्हा हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी तालुकास्तरीय मैदानी क्रीडा स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करत शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे. विविध वयोगटातील धावण्याच्या स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन करून जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी आपले स्थान निश्चित केले आहे.या स्पर्धेत शुभम दारोकार याने १७ वर्षे वयोगटातील १०० मीटर व २०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावून आपल्या वेगवान धावण्याची छाप पाडली. त्याचप्रमाणे सुशील मस्करे याने १४ वर्षे वयोगटातील १०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत विजेतपद मिळविले.ओम नेवारे याने १९ वर्षे वयोगटातील ८०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवत दमदार कामगिरी केली. तर अमित डाखोरे याने १९ वर्षे वयोगटातील २०० मीटर तसेच ४०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत विजेतपद मिळवून दुहेरी यश संपादन केले. विद्यार्थ्यांच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल शाळेच्या मुख्याध्यापिका आर. जी. कुमरे,व्ही. आर. इंगोले , प्रा. एच. एन. बोके तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विजयी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.



# आंदोलने आणि वर्तमान परिस्थिती

भारतात आत्ता जिथे जिथे आंदोलने सुरु आहेत तिथे गर्दी जमते आहे. याचे कारण म्हणजे, घडणाऱ्या घटनांबबत वर्तमानपत्रात येणारी माहिति आणि एका पिढीच्या मनात त्याचे उमटणारे पडसाद या दोन वेगळ्या गोष्टी असतात. दुसरी गोष्ट दीर्घकाळ टिकते.कोणतेही आंदोलन प्रत्यक्षात सुरु होण्यापूर्वी कितीतरी आधी लोकांच्या मनात सुरु झालेले असते. या अर्थाने गर्दी एका रात्रीत जमत नाही. ती अनेक वर्ष लोकांच्या मनात आपले घर बांधत असते. 'शांततापूर्ण आंदोलन' हा केवळ आपल्याला काही तरी पटत नाही हे दाखवणे नव्हे तर आपला आवाज उठवणे गरजेचे आहे हे दाखवण्याचा मार्ग आहे.या आंदोलनादरम्यान जे प्रश्न विचारले गेले त्यापलीकडे एक प्रश्न आहे. तो म्हणजे-आपला आवाज उठवणे महत्वाचे आहे असे का वाटते?

माणसांना समाजाला धरुन रहायला नैसर्गिकरीत्याच आवडते.अनेकजण समाजाच्या विरोधात वेगळेपणाने उभे रहाणे नाकारतात. आपला वेगळा आवाज समाजासमोर उठवणे ही कृती करायला घाबरतात. वाद नकोत असे सर्वसाधारण माणसाचे धोरण असते. त्यामुळे आवाज उठवण्याचे नैतिक धैर्य ही लक्षणीय गोष्ट ठरते. त्यामुळे जे हजारो लोक रस्त्यावर गर्दी करुन जमतात त्यांच्यापैकी कित्येकांनी त्याआधी एकाही आंदोलनात भाग घेतलेला नसतो. पण लोकांच्या मनातले उत्तरे न मिळालेले प्रश्न, त्यांनी वेगवेगळ्या प्रकारे गमावलेल्या संधी, गमावलेली परीक्षा, त्यांच्यावर झालेले चुकीचे आरोप, त्यांची नाराजी, त्यांचा आवाज दाबला जाणे हे सगळे कितीतरी वर्ष मनांमध्ये धुमसत असते.

अनिश्चितता,भीती,टीका,वैयक्तिक त्रास आणि काहीतरी गमवावे लागणे यांना सामोरे जावे लागणार हे माहिती असून समाजात आपले म्हणणे मांडायला उभे रहाण्याची इच्छा महत्वाची असते. सर्वसामान्य माणसांनी सत्तेला विचारलेले अवघड प्रश्न यावर इतिहास आणि समाज उभा असतो.मग जेव्हा ते ही कृती करतात त्याआधीचे सगळे त्यांच्या मनात साचत गेलेले असते. पुण्यात गणेशोत्सवातले डीजेबाबतचे आंदोलन/निषेध हे त्याचे एक उदाहरण आहे.




संस्था या सत्तेच्या आधी विश्वासावर उभ्या रहातात.संस्था या न्याय, उत्तरदायित्व आणि माणसाचा आत्मसन्मान जपणाऱ्या असतात यावर नागरिकांचा मूलत: विश्वास असतो.हा विश्वास नियंत्रणाने मिळवता येत नाही. सत्ताधीशांना माणसाचे वर्तन नियंत्रित करता येत नाही आणि अधिकार दडपशाही करुन मागून मिळत नाहीत. ते कमवावे लागतात. विश्वासही कमवावा लागतो आपले म्हणणे ऐकून न्याय मिळतो यावर सामान्यांचा विश्वास उडाल्यानंतर राजकीय सत्तेबाबत नाराजी निर्माण व्हायला लागते. सत्ता, संस्था आणि माणूस यांच्यातले मानसिक नातेसंबंध बिघडायला लागतात. विश्वासाला धक्का बसल्यानंतर तो परत निर्माण करणे हे सहसा सत्तेला सहज जमत नाही असे इतिहास सांगतो.

लोकांच्या मनातले हे धुमसते निखारे कॅमेऱ्यांनी टिपता येत नाहीत. व्यक्तींच्या मनातले हे नैराश्य मग सामूहिक नैराश्याचे रुप घेते. समाजाचे सबकुछ याद रखा जायेगा मध्ये परिवर्तन होते. मग शाळा, मुले, कुटुंब, बिद्यार्थी सगळ्यांच्याच सगळे कसे लक्षात आहे हे दिसायला लागते.उभे राहिलेले प्रत्येक आंदोलन त्यांच्याभोवतीच्या सामाजिक मज्जासंस्थांबद्दल काहीतरी सांगू पहात असते.सत्तेला अवघड, अडचणीत टाकणारे प्रश्न विचारणे कितपत सुरक्षित आहे?ते प्रश्न ऐकले जातील का?त्या प्रश्न विचारण्यावर माझे भवितव्य पणाला लागणार आहे का? माझ्याभोवतालच्या सिस्टीम्सवर माझा विश्वास आहे का?असे प्रश्न प्रत्येकाच्या मनात असतात. लोकांच्या मनातला धुमसता राग, त्रागा केवळ दृश्य जखमांमधूनच समोर येतो असे नाही. लोकांच्या मनात तत्कालीन सत्तेबद्दल तयार झालेल्या धारणा महत्वाच्या असतात.

**सत्ता, सामर्थ्य आणि मानसिकता**

नागरिकांमध्ये नियम आणि कायदे न्यायाने लागू करुन समाजात शांतता प्रस्थापित करणे ही सरकारची जबाबदारी असते. लोकशाहीमध्ये तर नागरिकांचे हक्क, त्यांना शांततापूर्ण मार्गाने आपले मतभेद व्यक्त करण्यासाठी संधी देणे हे महत्वाचे ठरते. या जबाबदाऱ्यांचे संतुलन राखणे हे अवघड असते. मात्र प्रत्येक टीका ही सत्तेला धोका आणि धमकी असल्यासारखे वागणे सरकारकडून सुरु होते तेव्हा विश्वासाचा पायाच उखडला जातो.मग दंडेलशाहीने गर्दी पांगवता येते. मात्र सत्तेवर विश्वास ठेवणारे नागरिक तयार करता येत नाहीत. भीतीने लोक नियम पाळतात पण विश्वासाने सहकार्य मिळते. लोकशाही ही केवळ आदेश आणि हुकूमशाहीवर तग धरु शकत नाही. नागरिकांना आपला आत्मसन्मान न गमावता समाजात रहाता येते का ? हा प्रश्न लोकशाहीत महत्वाचा आहे.

जुलै २०२६ मधल्या जंतरमंतरवरच्या आंदोलनात भाग घेणाऱ्यांपेक्षा घरी बसून हे सगळे पहाणारे लोक कदाचित जास्त महत्वाचे होते. तिथे घडणारी प्रत्येक घटना मुलांसाठी जणू शाळेचा वर्ग झाली होती. मोठ्यांपेक्षा मुलांनी या घटना जास्त प्रमाणात पाहिल्या. त्यांनी खूप जास्त सखोल निरीक्षण आणि विश्लेषण केले. मतभेद कसे हाताळले जातात ते त्यांना दिसले. अधिकारी कशा प्रकारे प्रतिक्रिया देतात ते त्यांना दिसले. धैर्याचा चेहरा त्यांना दिसला. भीती म्हणजे काय असते ते त्यांना समजले. ते बघणारे होते पण बघे नव्हते. त्यांनी पाहिलेले प्रत्येक दृश्य त्यांच्या मनात घुसले आणि त्यांच्या भोवतालच्या परिस्थितीबद्दल, समाजाबद्दल, राजकारणाबद्दल आणि राजकीय नेत्यांबद्दल धारणा तयार व्हायला लागल्या.

मोठी माणसे थेट काय शिकवतात त्यापेक्षा ती काय करतात आणि मुले काय पहातात, काय विश्लेषण करतात त्यावर त्यांचे विचार, भावना, वर्तन आणि धारणा तयार होत जातात. आज पालक, शिक्षक असलेले लोक उद्याचे नागरिक आपल्या शिकवणुकीपेक्षा कृतीतून उद्याचे नागरिक घडवत असतात. त्यामुळे या आंदोलनांमध्ये जे काही घडले ती आपल्या प्रत्येकाची जबाबदारी आहे. लोकांमध्ये मतभेद झाले या कारणाने देशातली व्यवस्था पंगू होत नाही. मात्र एकमेकांना माणूस म्हणून पहाणे बंद झाले तर देशाची व्यवस्था बिघडते. शरीराच्या मज्जासंस्थेप्रमाणे देशाला एक मज्जासंस्था असते. देशाच्या सामूहिक मानसिकतेच्या मज्जासंस्थेवर आघात झाले तर देश खिळखिळा व्हायला लागतो.

अर्थव्यवस्था, तंत्रज्ञान, पायाभूत सुविधा, धोरणे याबाबत बऱ्याचवेळा चर्चा होते. मात्र देशाचे मानसिक वातावरण याबद्दल चर्चा होत नाही. तो विषय लक्षात घेतला जात नाही. व्यक्तिगत पातळीवर ज्याप्रमाणे आशा, निराशा, भीती, विश्वास, करुणा, संशय, उपहास या भावना असतात तशाच देशाच्या भावना बदलत असतात. सार्वजनिकपणे घडलेली प्रत्येक घटना समूहात यापैकी एक किंवा अनेक भावना जागवत असते. आज काय घडले यापेक्षा कोणत्या भावनांवर आधारित भवितव्य समोर उभे आहे हा प्रश्न महत्वाचा असतो. मुले आपल्या संस्थांबरोबरच या भावना देखील पुढे नेणार असतात.

आज विद्यार्थी, पालक, शिक्षक, पोलिस, पत्रकार, सरकारी अधिकारी, मानसशास्त्रज्ञ, राजकारणी आणि नागरिक यांनी एकमेकांवर सतत कुरघोडी करण्याचा विचार सोडायला हवा. संवाद साधताना समोरच्याचे ऐकणे हे कौशल्य वाढवायला हवे. मूल्यो जोपासताना करुणा गमवायला नको. मतभेद व्यक्त करताना




माणुसकीचा हात सोडायला नको.

**-नीलांबरी जोशी**

## नवरात्री उत्सवामागील शास्त्र आणि वास्तव!

महिषासुराच्या नाशासाठी अवतार घेणाऱ्या श्री दुर्गादेवीचा उत्सव म्हणजे नवरात्र ! नवरात्र हे देवीचे व्रत असून महाराष्ट्रासह अनेक ठिकाणी हे व्रत कुलाचार म्हणून पाळले जाते. या व्रतात नऊ दिवस व्रतस्थ राहून देवीची मनोभावे आराधना केली जाते. आज अनेक राज्यांत याला उत्सवाचे स्वरूपही आले आहे. देवीने ९ दिवस महिषासुराशी युद्ध करून दहाव्या दिवशी त्याचा वध केला याचे प्रतीक म्हणून गुजरातमध्ये दांडिया खेळला जातो. दांडिया म्हणजे देवीच्या हातातील शस्त्र असून पूर्वी युद्धाच्या अविर्भावात तो खेळला जात असे. कालांतराने त्याला आता नृत्याचे स्वरूप आले आहे. महाराष्ट्रापासून गुजरात जवळच असल्याने गेल्या काही वर्षांत महाराष्ट्रातही नवरात्री हा उत्सवासारखा साजरा होऊ लागला आहे. त्यानिमित्ताने इथेही रासगरबा आणि दांडिया खेळला जाऊ लागला आहे. हिंदूंच्या धार्मिक उत्सवांचे बाजारीकरण होऊ लागले आहे त्यापासून नवरात्री उत्सवही मागे राहिलेला नाही. नवरात्री उत्सवाचे मुंबईसारख्या शहरांत इव्हेन्ट होऊ लागले आहेत. धनाढ्य उद्योगपती, राजकारणी मोठी मैदाने आरक्षित करून याठिकाणी नऊ दिवस गरब्याचे कार्यक्रम आयोजित करतात. या इव्हेंटमध्ये मोठ्मोठे वाद्यवृंद, गायक आणि सिनेसृष्टीतील कलाकारांना बोलावून लोकांना आकर्षित केले जाते. स्पर्धांचे आयोजन करून प्रतिदिन उत्कृष्ट नृत्य आणि वेशभूषा करणाऱ्यांना बक्षिसे दिली जातात. गरब्यात सहभागी होणाऱ्यांसाठी शेकडो रुपयांची प्रवेश फी आकारली जाते. श्रीमंतांची मुले या कार्यक्रमांत हिरीरीने सहभागी होतात.

देवीच्या उत्सवाचे जसे बाजारीकरण होऊ लागले, तशा काही विकृतींचाही शिरकाव या उत्सवात होऊ लागला आहे. नवरात्री काळात संतती नियमनाच्या साधनांची नेहमीच्या तुलनेत दुप्पट विक्री होते तसेच यानंतरच्या काळात शालेय आणि महाविद्यालयीन विद्यार्थिनींच्या गर्भपाताच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ होते असेही एका सर्वेक्षणातून निदर्शनात आले आहे.

पूर्वी 'गरबा' या नृत्याच्या वेळी देवीची, कृष्णलीलेची आणि संतरचित गीतेच म्हटली जात असत. हल्ली मात्र भगवंताच्या या सामूहिक नृत्योपासनेला विकृत स्वरूप आले आहे. चित्रपटांतील गीतांच्या तालावर विचित्र अंगविक्षेप करून गरबा खेळला जातो. डॉल्बी, डीजेसारखे कानठळ्या बसवणारे संगीत लावले जाते. पूजास्थळी तंबाखूसेवन, मद्यपान, ध्वनीप्रदूषण इत्यादी प्रकारही घडतात. नृत्य करताना अनेक ठिकाणी महिलांच्या छेडछाडीच्या घटना घडतात, यातून मारामाऱ्या होतात. एकूणच यातून उत्सवाचा मूळ उद्देश बाजूला राहतो.

**- जगन घाणेकर**

## जेन झी,जेन अल्फा यांनी वैद्यकीय क्षेत्र सुधारण्यासाठी पुढाकार घ्यावा

लिस्टेड कॉर्पोरेट हॉस्पिटल्स मधील रुग्ण आणि त्या कंपन्यांच्या शेयर्समधील गुंतवणूकदार यांचे हितसंबंध एकमेकांना छेद देणारे आहेत!रुग्णांना स्वस्त सेवा / औषधे मिळू लागली की गुंतवणूकदारांना कमी नफा मिळणार,शेयरची किंमत कमी होणार !हायपोथेटिकल नाही हे. मागच्या आठवड्यात सुप्रीम कोर्टातील न्यायमूर्ती विक्रम नाथ आणि सुदीप मेहता यांच्या बेंचसमोर कॉर्पोरेट हॉस्पिटल्स मध्ये विकल्या जाणाऱ्या औषधांच्या किमतीबद्दल सुनावणी झाली.

कॉर्पोरेट हॉस्पिटल्स मध्ये आपण सर्वच, स्वतः किंवा नातेवाईक, मित्रांच्या बाबतीत, बिल सेटल करतांना, पैसे भरताना रक्तबंबाळ करणाऱ्या अनुभवातून जात असतो.सुनावणी दरम्यान एका कॅन्सर ड्रगचे उदाहरण दिले गेले. जो ड्रग हॉस्पिटल बाहेर २,७०० रुपयांना उपलब्ध आहे तो कॉर्पोरेट हॉस्पिटल मधील औषधांच्या दुकानात २७,००० रुपयांना विकला जातो हे सप्रमाण दाखवून देण्यात आले. (ही काही अपवादात्मक , नजरचुकीने झालेली गोष्ट नाही. हॉस्पिटलमध्ये लागणाऱ्या कापसाच्या बोळ्यापासून जवळपास प्रत्येक गोष्ट या दुकानात भरमसाट किमतींना विकली जाते) 'हा तर नरसंहार आहे. हा दिवसाढवळ्या घातलेला दरोडा आहे' अशा शब्दात न्यायमूर्तींनी ओढलेल्या आसुडाचे वळ डायरेक्ट स्टॉक मार्केटमध्ये उमटले!दुसऱ्या दिवशी मॅक्स, अपोलो, फोर्टिस, मणिपाल अशा लिस्टेड हॉस्पिटल कंपन्यांचे शेअर्स सरासरी ५ टक्क्यांनी कोसळले. देशात सध्या आठ कॉर्पोरेट हॉस्पिटल चेन्स लिस्टेड आहेत आणि त्यांचे बाजारमूल्य ५.२५ लाख कोटी रुपये आहे.

मुद्दा फक्त औषधांच्या बाजारभावाचा नव्हता. दर दहशत, सक्तीचा होता. स्वतःला आधुनिक भांडवलशाहीच्या संस्था म्हणवणारी ही कॉर्पोरेट हॉस्पिटल्स त्यांच्याकडे बरे होण्यासाठी अॅडमिट झालेल्या, आधीच मानसिक दृष्ट्या कमकुवत असणाऱ्या रुग्णांवर, एखाद्या सरंजामदारासारखी दहशत बसवतात.त्या हॉस्पिटल्सच्या आवारात असणाऱ्या,त्याच मालकीच्या/व्यवस्थापनाच्या खाली असणाऱ्या औषधांच्या दुकानातूनच डॉक्टरांनी रुग्णांसाठी लिहून दिलेली सर्व औषधे विकत घेण्याची सक्ती करतात, बाहेरून आणली तर स्टाफ ती वापरायला नकार देतात.

न्यायमूर्तींनी विचारले की लिहून दिलेली तीच औषधे रुग्णाच्या नातेवाईकांनी हॉस्पिटलच्या बाहेर कोठेही स्वतंत्रपणे लायसेन्सड विक्री करणाऱ्या दुकानदाराकडून विकत आणून हॉस्पिटल स्टाफकडे सुपूर्द केली तर ट्रीटमेंट मध्ये काय फरक पडतो? उत्तर सर्वांना माहीत आहे. रुग्णाला काही फरक पडणार नाही. पण कॉर्पोरेट हॉस्पिटलसना पडतो. कारण स्वतःच्या मालकीच्या औषध दुकानातून जी औषधे/रुग्णाला लागणाऱ्या इतर वस्तू ही हॉस्पिटल्स खरेदी करायला लावतात त्याचा त्यांच्या एकूण रेव्ह्यून्यू मध्ये वाटा एक पंचमांश आहे. आणि नफ्याच्या मार्जिन्स जबरदस्त आहेत. यावरून लक्षात येते शेयर्स का कोसळले असतील. न्यायमूर्तींनी म्हटल्या प्रमाणे ते वैद्यकीय सेवा देत नाहीत तर नफेखोरी करणाऱ्या इतर कोणत्याही कंपनीसारखे झाले आहेत.

खाजगी क्षेत्रातील हॉस्पिटल्स आणि इतर सेवा पुरवणाऱ्या कंपन्या भारतातील वैद्यकीय क्षेत्रात जोरदार मुसंडी मारत आहेत. देशातील वैद्यकीय सेवा क्षेत्राचा आकार सात लाख कोटींच्या आसपास आहे. त्यातील खाजगी हॉस्पिटल्सचा वाटा वाढत आहे आणि सार्वजनिक (म्युन्सिपल, सरकारी) क्षेत्राचा घटत आहे.सध्या खाजगी क्षेत्राचा ६८ टक्क्यांवर पोचला आहे आणि सार्वजनिक क्षेत्राचा ३२ टक्के; खाजगी कॉर्पोरेट हॉस्पिटल्सचा धन्दा दार साल दर शेकडा १२ टाक्यांनी वाढत आहे. इस्पितळ उद्योग २०३० पर्यंत १० लाख कोटी रुपयांचा होणार आहे.

या खाजगी कॉर्पोरेट इस्पितळाचा धन्दा कसा करायचा हे आता त्यांचे संस्थपाक/प्रवर्तक डॉक्टर ठरवत नाहीत. या क्षेत्रात वॉल स्ट्रीटपासून बिलियन्स ऑफ डॉलर्स प्रायव्हेट इक्विटी वाहत येत आहे. भारतातील भांडवल बाजारातून हजारो कोटी रुपयांची भांडवल उभारणी झाली आहे. ते अस्तित्वात असणारी इस्पितळे विकत घेत आहेत. ती फक्त महानगरांपुरती नाहीत तर दुसऱ्या /तिसऱ्या फळीतील मध्यम/छोट्या शहरात घुसत आहेत.

भांडवलाचा हा विशिष्ट प्रकार कॉर्पोरेट इस्पितळाच्या बोर्डाला/व्यवस्थापकांना विशिष्ट पद्धतीने निर्णय घ्यायला भाग पाडत आहे. रुग्णांना आपल्याच दुकानातून औषधे खरेदी करण्याची सक्ती हा त्याचाच एक भाग. लक्षात घ्या याचे विश्लेषण खोके/ पेट्यांच्या चिमटीत येत नाही. कोण डॉक्टर/ कोण व्यक्ती हे देखील दुय्यम सिद्ध होते. म्हणून दरवेळी पोलिटिकल इकॉनॉमी समजून घेतली पाहिजे.

जेन झी,जेन अल्फा यांनी शिक्षण व्यवस्था सुधारणायसाठी जसा पुढाकार घेतला आहे. अजूनही घेतील,तसाच पुढाकार सार्वजनिक वैद्यकीय क्षेत्र सुधारण्यासाठी घ्यावा. कारण या पिढीत दम आहे. आमच्या आधीच्या पिढ्यांमध्ये दम नाही. त्यांचे आईवडील, नातेवाईक,शेजारी यांनी त्यांना साथ द्यावी. किमान शिक्षण आणि आरोग्य या दोन क्षेत्रांना कॉर्पोरेटीकरणापासून, खाजगी भांडवलाच्या जास्तीत जास्त नफा कमावण्याच्या रक्तपिपासू जबड्यातून बाहेर खेचून काढण्याची तातडीची गरज आहे.

**संजीव चांदोरकर**




## ऐका पुढच्या हाका...

**गावात उपलब्ध असलेले पाणी किती? भूजलाची स्थिती काय? पुढील काही महिन्यांत किती पाणी लागेल? शेतीसाठी किती उपलब्ध आहे? आणि उपलब्धतेपेक्षा मागणी अधिक असल्यास कोणत्या वापराला प्राधान्य द्यायचे? या प्रश्नांची उत्तरे कागदावर नव्हे, तर ग्रामसभेच्या पातळीवर निश्चित झाली पाहिजेत.**

महाराष्ट्रातील दुष्काळाची तीव्रता आता आकडेवारीच्या पलीकडे जाऊन रोजच्या जगण्याचा प्रश्न बनली आहे. राज्यातील ३५८ पैकी २६५ तालुक्यांत (आणखी काही तालुक्यांची त्यात भर पडली आहे.) दुष्काळ जाहीर झाल्याच्या पार्श्वभूमीवर पिण्याचे पाणी, शेती, जनावरे आणि ग्रामीण अर्थव्यवस्था यांच्यापुढे गंभीर आव्हान उभे आहे. अशावेळी हवामानशास्त्रातून आलेली आणखी एक सूचना गांभीर्याने घ्यावी लागेल ती म्हणजे अल निनो (El Nino) संदर्भात.

जागतिक हवामान संघटनेच्या (WMO) ३ सप्टेंबर २०२६च्या अद्ययावत अंदाजानुसार अल निनो आता ठामपणे विकसित झाला असून पुढील काही महिन्यांत तो अत्यंत तीव्र स्वरूप धारण करू शकतो. WMOच्या मते, त्याची तीव्रता २०२६च्या अखेरीस शिखरावर पोहोचण्याची शक्यता आहे आणि हा प्रभाव फेब्रुवारी २०२७पर्यंत टिकून राहण्याची शक्यता जवळपास १०० टक्के आहे; मात्र एक महत्त्वाची बाब लक्षात घ्यावी लागेल अल निनो जितका तीव्र तितकाच प्रत्येक प्रदेशात दुष्काळ पडेल, असा सरळ संबंध नाही. स्थानिक हवामान, समुद्रातील इतर बदल आणि भारतीय महासागरातील परिस्थिती यांचाही परिणाम वातावरणावर होतो. म्हणून अल निनोकडे दुष्काळाची भविष्यवाणी म्हणून नव्हे, तर पूर्वसूचना म्हणून पाहणे अधिक योग्य ठरेल.

आज महाराष्ट्रासमोरचा खरा प्रश्न आहे, पुढील काही महिने आपण कसे पार पाडणार आणि पुढील पावसाळ्यापूर्वी येणाऱ्या नैसर्गिक आव्हानांसाठी कसे तयार असणार? त्यासाठी आपणास काय काय बदल करावे लागतील, धोरणात्मक पातळीवर कोणकोणत्या कृती योजना कठोरपणे राबवाव्या लागतील, उपलब्ध असलेल्या जलसंपदेचं व्यवस्थापन किती काटेकोर करावे लागेल? या बाबींचा शासन, प्रशासन आणि स्थानिक लोकसहभागातून विचार मंथन करून एक कृती आराखडा तयार करावा लागेल. इथे आपल्या जलव्यवस्थापनाच्या विचारात एक महत्त्वाचा बदल आवश्यक आहे. दुष्काळ जाहीर झाल्यानंतर उपाययोजना सुरू करण्याऐवजी दुष्काळाची शक्यता दिसताच दुष्काळी भागातील जलव्यवस्थापनाची तयारी सुरू झाली पाहिजे.

याची सुरुवात प्रत्येक गावाच्या Water Budget पासून होऊ शकते. गावात उपलब्ध असलेले पाणी किती? भूजलाची स्थिती काय? पुढील काही महिन्यांत सर्व जीवांना पिण्यासाठी किती पाणी लागेल? शेतीसाठी किती उपलब्ध आहे? आणि उपलब्धतेपेक्षा मागणी अधिक असल्यास कोणत्या वापराला प्राधान्य द्यायचे? या प्रश्नांची उत्तरे कागदावर नव्हे, तर ग्रामसभेच्या पातळीवर निश्चित झाली पाहिजेत.

याच संदर्भात धुळे जिल्ह्यातील बारीपाड्याची कहाणी अधिक लक्षवेधी ठरते. आदिवासीबहुल या गावाच्या परिवर्तनामागे पद्मश्री चैत्राम देवचंद पवार यांचे नेतृत्व आणि ग्रामसमुदायाचा सहभाग महत्त्वाचा ठरला. 'जल, जंगल आणि जमीन' या परस्परसंबंधाकडे एकात्मिकपणे पाहत त्यांनी



वनसंवर्धनासोबतच पाणलोट विकासाला चालना दिली. सैल दगडी बंधारे, कंटूर ट्रेंचेस, वृक्ष लागवड आणि स्थानिक सहभागातून जलसंधारणाची कामे उभी राहिली. भारत सरकारच्या पद्म पुरस्कार नोंदीनुसार या प्रयत्नांतून सुमारे ४४५ हेक्टर क्षेत्रात घनदाट वन विकसित झाले आणि जलसंधारणामुळे सुमारे ५०० एकर क्षेत्राला संरक्षित सिंचनाची सुविधा मिळाली. बारीपाड्याची शिकवण केवळ पाणी साठवण्याची नाही, निसर्गसंपत्तीचे सामुदायिक व्यवस्थापन केले, तर दुष्काळग्रस्त गावही स्वावलंबनाच्या दिशेने वाटचाल करू शकते, ही त्याची खरी ताकद आहे. यासाठी दुष्काळ व्यवस्थापनाची दिशा बदलावी लागेल.

पहिली गोष्ट म्हणजे, पाण्यानुसार शेतीचे नियोजन. उपलब्ध जलसाठ्यापेक्षा अधिक पाणी लागणाऱ्या पिकांची निवड केवळ बाजारभावाच्या आधारावर होऊ नये. दुसरी म्हणजे, भूजलाचा हिशेब. विहिरीत पाणी आहे म्हणून ते अमर्यादित आहे, हा गैरसमज दूर करावा लागेल. भूजल हा वैयक्तिक मालमत्तेपेक्षा सामुदायिक नैसर्गिक संसाधन म्हणून पाहण्याची वेळ आली आहे. तिसरी म्हणजे, दुष्काळपूर्व कृती आराखडा. कोणत्या पातळीवर पिण्याच्या पाण्याला प्राधान्य द्यायचे, टँकरची गरज कधी निर्माण होऊ शकते, जनावरांसाठी कोणती व्यवस्था करायची आणि कोणत्या टप्प्यावर शेतीतील पाण्याचा वापर मर्यादित करायचा, हे निर्णय संकटाच्या वेळी घाईघाईने घेण्याऐवजी आधीच ठरले पाहिजेत.

चौथी आणि कदाचित सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे जलशिस्त. Water Budget तयार करून उपयोग नाही. त्या बजेटनुसार सामूहिक निर्णय घेण्याची सामाजिक तयारीही हवी. कारण, पाण्याचा प्रश्न तंत्रज्ञानाने काही अंशी सोडवता येतो; पण पाण्याच्या वापरातील शिस्त समाजालाच निर्माण करावी लागते. अल निनो आपल्या नियंत्रणात नाही. पाऊस किती आणि केव्हा पडेल, हेही आपल्या हातात नाही; पण उपलब्ध पाण्याचा हिशेब, भूजलाचा वापर, पीक नियोजन आणि संकटपूर्व तयारी हे आपल्या हातात आहे.

फेब्रुवारी २०२७पर्यंत अल निनो टिकण्याची शक्यता आपल्याला एक गोष्ट स्पष्ट सांगते, पुढचा पावसाळा येईपर्यंतचा प्रत्येक महिना महत्त्वाचा आहे. दुष्काळावर मात करण्यासाठी फक्त पावसाची प्रतीक्षा करून चालणार नाही. पाऊस निसर्ग देतो; पण त्या पावसाचे भविष्य आपण ठरवतो आणि कदाचित याच ठिकाणी खरी परीक्षा आहे. निसर्गाने इशारा दिल्यानंतर आपण पुन्हा संकट येईपर्यंत वाट पाहणार की यावेळी संकट येण्यापूर्वीच शहाणे होणार?

**-डॉ. मंगेश कश्यप**

# नवरात्रोत्सवात 'उत्सव नवरात्रीचा प्रचार महाबीजचा' विशेष अभियान

**व्यवस्थापकीय संचालक दिलीप स्वामी यांची संकल्पना**

■ प्रतिनिधी | अकोला ■

प्रत्येक शेतकऱ्यांपर्यंत दर्जेदार बियाण्यांची माहिती पोहचवून महाबीजच्या उत्पादनांचा प्रचार व प्रसार अधिक प्रभावीपणे करण्यासाठी नवरात्रोत्सव काळात महाबीजचे व्यवस्थापकीय संचालक दिलीप स्वामी यांच्या मार्गदर्शनात ११ ते २१ ऑक्टोबर दरम्यान ' उत्सव नवरात्रीचा प्रचार महाबीजचा ' विशेष अभियान राबविण्यात येणार आहे.

अभियानाच्या माध्यमातून महाबीजच्या विविध बियाणे व कृषी उत्पादनांची माहिती व्यापक स्वरूपात शेतकऱ्यांपर्यंत पोहचविण्याचे नियोजन करण्यात आले आहे. गणेशोत्सवाच्या काळात राबविण्यात आलेल्या जनसंवाद उपक्रमाला मिळालेला प्रतिसाद लक्षात घेऊन, नवरात्रोत्सवातील सार्वजनिक उत्सव, धार्मिक कार्यक्रम आणि विविध उपक्रमांच्या माध्यमातून महाबीजच्या उत्पादनांची माहिती जनसामान्यांपर्यंत पोहचविण्यावर भर देण्यात येणार आहे. ग्रामीण भागातील उत्सव बाजारपेठा आणि गर्दीच्या ठिकाणी प्रचार-प्रसाराच्या विविध माध्यमांचा प्रभावी वापर करण्यात येणार आहे.



अभियानांतर्गत महाबीजच्या विविध वाणांची वैशिष्ट्ये, बियाण्यांची उपलब्धता आणि शेतकऱ्यांसाठी उपयुक्त माहिती प्रसारित केली जाणार आहे. यासाठी स्थानिक स्तरावर नवरात्रोत्सव मंडळांशी समन्वय साधणे, फलक व बॅनर लावणे, ध्वनिक्षेपकाद्वारे माहिती देणे, तसेच डिजिटल माध्यमे, समाजमाध्यमे आणि लघुचित्रफितींच्या माध्यमातून प्रचार करण्यावर भर दिला जाणार आहे.

**दिलीप स्वामी**
व्यवस्थापकीय संचालक, महाबीज

महाबीजचे विक्रेते, कृषी विभाग स्थानिक प्रतिनिधी यांच्या समन्वयातून अभियान अधिक प्रभावी करण्याचा प्रयत्न असून जिल्हा व विभागीय स्तरावरील अधिकाऱ्यांनी अभियानाचे सूक्ष्म नियोजन करून उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी करावी, तसेच राबविण्यात आलेल्या कार्यक्रमांचे छायाचित्रण व दस्तऐवजीकरण करावे, अशा सूचना महाबीज प्रशासनाच्या वतीने देण्यात आल्या आहेत. उत्सवाच्या माध्यमातून शेतकऱ्यांशी संवाद अधिक दृढ करणे, महाबीजच्या उत्पादनांविषयी जागरूकता वाढविणे.पारंपरिक उत्सव आणि आधुनिक प्रचारमाध्यमांची सांगड घालून महाबीजचा प्रचार-प्रसार अधिक व्यापक करण्याच्या दृष्टीने हे अभियान महत्त्वपूर्ण ठरणार आहे.उत्सव नवरात्रीचा प्रचार महाबीजचा या अभियानाच्या माध्यमातून महाबीज-१२४ बीजी-२ (कापूस वाण), हरभरा जॅकी-९२१८, महाबीज-१७०८ संकरीत मका, गहूलोक-०१, जीडब्ल्यू-४९६,संकरीत भेंडी-नामी, रब्बी ज्वारी मालदांडी (एम-३५-१),सकंरीत वांगे-अनुरूप व चैतन्य ट्रायकोडर्मा, महाजैवीक, कर्बमापक, महास्पीड/साथी पोर्टल, निमास्त्र व महासत्व यासह विविध हा उत्पादनांचा प्रचार प्रसार करण्यात येणार आहे.

# दुष्काळी परिस्थितीच्या पाहणीसाठी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष आज अकोल्यात

## माना फाटा येथे शेतात जाऊन पिकांची पाहणी ; शेतकऱ्यांशी साधणार संवाद

■ प्रतिनिधी | अकोला ■

जिल्ह्यासह राज्यातील अनेक भागांत यंदा पावसाचे प्रमाण सरासरीपेक्षा कमी राहिल्याने निर्माण झालेल्या दुष्काळी परिस्थितीची पाहणी करण्यासाठी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ मंगळवारी (६ ऑक्टोबर) अकोला जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत.

मूर्तीजापूर तालुक्यातील माना फाटा येथे प्रत्यक्ष शेतात जाऊन ते पिकांची स्थिती आणि शेतकऱ्यांच्या अडचणींचा आढावा घेणार आहेत.राज्य सरकारने २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर केला आहे. या पार्श्वभूमीवर काँग्रेसकडून विविध जिल्ह्यांमध्ये शेतांवर जाऊन दुष्काळी परिस्थितीची पाहणी करण्यात येत आहे.

त्याच अनुषंगाने सपकाळ हे मंगळवारी दुपारी ४ वाजता माना फाटा येथे शेतकऱ्यांशी संवाद साधून पिकांची प्रत्यक्ष पाहणी करतील.

पावसाअभावी पिकांची झालेली स्थिती, उत्पादनातील घट आणि शेतकऱ्यांसमोरील आर्थिक अडचणी याबाबत शेतकऱ्यांचे म्हणणे ते जाणून घेणार आहेत. पाहणीदरम्यान समोर आलेली वास्तविक परिस्थिती शासनाच्या निदर्शनास आणून शेतकऱ्यांना भरीव मदत मिळण्यासाठी पाठपुरावा केला जाणार असल्याचे काँग्रेसकडून सांगण्यात आले.

या दौऱ्याच्या वेळी काँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच शेतकरी बांधवांनी उपस्थित राहावे, असे आवाहन अकोला जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष प्रकाश तायडे, जिल्हा सचिव मेघनाताई कोकणे आणि मूर्तीजापूर तालुका काँग्रेस अध्यक्ष राजूभाऊ जोगदंड यांनी केले आहे.

# दुष्काळ व्यवस्थापनासाठी तालुका पातळीवर तहसीलदारांची 'नोडल अधिकारी' म्हणून नियुक्ती

■ प्रतिनिधी | अकोल ■

अकोला जिल्ह्यातील दुष्काळसदृश परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर, विविध विभागांमार्फत राबविण्यात येत असलेल्या उपाययोजनांमध्ये प्रभावी समन्वय आणि संनियंत्रण राखण्यासाठी जिल्हा प्रशासनाने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी आज अधिकृत आदेश जारी करून जिल्ह्यातील सर्व संबंधित तहसीलदारांची त्यांच्या कार्यक्षेत्रासाठी 'तालुकास्तरीय समन्वयक-सह-नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती केली आहे.

आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ मधील तरतुदींच्या अधीन राहून तालुकास्तरावरील शासकीय यंत्रणा अधिक गतीमान करणे आणि नागरिकांच्या तक्रारींचे वेळेत निराकरण सुनिश्चित करणे, हा या नियुक्तीमागील मुख्य उद्देश आहे.

तहसीलदारांवर सोपविण्यात आलेली मुख्य जबाबदारी व कामकाज. विभागीय समन्वय व आढावा: तालुक्यातील सर्व शासकीय विभाग, स्थानिक स्वराज्य संस्था आणि क्षेत्रीय यंत्रणांमध्ये समन्वय साधून पिण्याचे पाणी, टँकरद्वारे पाणीपुरवठा, पशुधनाचा चारा, पीक परिस्थिती, रोजगार व वीजपुरवठा या बाबींचा नियमित आढावा घेणे.

**Change In Name**

I Have change My Name from
**SK AMAAN SK MAJEED** - TO-
**SHEKH AMAN SHEKH MAJID**
My Residential Address In At Post chohotta Bajar Tq. Akot Dist. Akola Pin 444101

## जाहीर नोटीस

**वि.०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १५८३/२०२६ — प्रोसेस नं.१२५५२/२०२६
चौ.ता. ०४/११/२०२६ — दिनांक : ०१/१०/२०२६

**अर्जदार :** १. गोपी हरिश्चंद्र चेंडुलकर रा. विर नेताजी नगर, आंबेडकर नगर, खदान, अकोला. ता. जि. अकोला.. २. गोकुळ हरिश्चंद्र चेंडुलकर रा. नुराजी मस्जिदच्या बाजुला, शास्त्री नगर, सिंधी कॅम्प, खदान, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : रमाबाई हरिचंद उर्फ हरिश्चंद्र चेंडुलकर
**पत्ता :-** रा.नुराजी मस्जिदच्या बाजुला, शास्त्री नगर, सिंधी कॅम्प, खदान, अकोला, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७ कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत रमाबाई हरिचंद्र उर्फ हरिश्चंद्र चेंडुलकर यांचे दि. ०१/१०/२०२५ रोजी राहते घरी, अकोला. ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०४/११/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दिष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरून सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०१/१०/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — **आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**अकोला येथील वि. ०६वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) यांच्या न्यायालयात**

'वाद प्रश्न नक्की करण्यासाठी समन्स'
(दिवाणी व्यवहार संहिता, नियमक्रम ५, नियम १,५)
अनुसूची एक, परिशिष्ट ब,क्र.२

दावा रु./— — स्मॉल.कॉज.सुट.नं.२७/२०२५
चौ.ता.: २८/१०/२०२६

साई कंन्स्ट्रक्शन ...विरूध्द... लक्ष्मीनारायण व इतर

**बनाम :—** १. लक्ष्मीनारायण के. चांडक २. शेख नाझीर शेख शाकीर दोघेही रा. १७१७, कलाल की चाल, अकोला. ता. जि. अकोला.

ज्याअर्थी वादी यांनी 'Suit For Eviction, Posssession, Arrears of Rent and Inquiry Into Future Mense Profit' यासाठी तुमच्या विरुध्द या न्यायालयात वाद दाखल केला आहे, त्याअर्थी त्या वादासंबंधी तुम्हाला जे काही सांगावयाचे असेल ते सांगण्यासाठी दिनांक २८/१०/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता तुम्ही स्वतः किंवा ज्यास योग्यरित्या सूचना दिलेल्या आहेत व जो वादासंबंधीच्या महत्वाच्या सर्व प्रश्नांचे उत्तर देऊ शकेल अशा वकीलामार्फत किंवा अशा सर्व प्रशंचे उत्तर देउ शकणारा एखादा इसम बरोबर असलेल्या वकीलामार्फत या न्यायालयात उपस्थित होण्यासाठी याद्वारे तुमच्यावर समन्स बजावण्यात येत आहे आणि याद्वारे तुम्हाला असा निर्देश देण्यात येत आहे की, समन्स बजावल्यापासून ३० दिवसाचे आत तुम्ही तुमच्या बचावाचे लेखी निवेदन दाखल करावे व त्याच दिवशी तुमचा बचाव किंवा उलट वाद (सेट ऑफ) किंवा प्रतिवाद (काउंटर क्लेम) ज्या दस्तऐवजावर आधारलेला असेल असे तुमच्या ताब्यात किंवा नियंत्रणाखाली असलेले सर्व दस्तऐवज सादर करावेत आणि जर तुम्ही तुमच्या बचावाच्या किंवा उलट वादाच्या (सेट ऑफ) किंवा प्रतिवाद (काउंटर क्लेम) पूष्ट्यर्थ पुरावा म्हणून तुमच्या ताब्यात किंवा नियंत्रणाखाली असलेल्या किंवा नसलेल्या इतर कोणत्याही दस्तऐवजावर विसंबून असाल तर अशा दस्तऐवजाची एक सूची करुन ती सूची तुमच्या बचावाच्या लेखी निवेदनास जोडावी. तुम्हाला नोटीस देण्यात येत आहे की, वर नमूद केलेल्या दिवशी उपस्थित राहण्यास कसूर केल्यास तुमच्या अनुपस्थितीत वादाची सुनावणी केली जाउन त्याचा निर्णय केला जा. ईल. आणखी अशी नोटीस देण्यात येत आहे की, वर नमून केलेल्या तारखेस किंवा कालावधीत बजावणीक . रिता तुमचा पत्ता दाखल करण्यात तुम्ही कसूर केल्यास तुमचा बचाव रद्द केला जाण्यास पात्र ठरेल. आज दिनांक ०३/१०/२०२६ रोजी अकोला येथे माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले. समन्स मिळाल्यापासुन ३० दिवसाच्या आत लेखी जबाब दाखल करणे आवश्यक आहे.

शिक्का — **आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**वि.०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १५६२/२०२६ — प्रोसेस नं.१२५५०/२०२६
चौ.ता. ३०/१०/२०२६ — दिनांक : ०१/१०/२०२६

**अर्जदार :** १. शालिग्राम व्यंकट शिरसाट २. शशिकला शालिकराम शिरसाट ३. स्वरा धिरज शिरसाट ४. प्रिंस धिरज शिरसाट सर्व रा. भिम नगर, बोरगाव मंजू, ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : धिरज शालिकराम शिरसाट
**पत्ता :-** रा. भिम नगर, बोरगाव मंजू, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत धिरज शालिकराम शिरसाट यांचे दि. २१/१०/२०२५ रोजी पैलपाडा, ता. जि अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ३०/१०/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वत: जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०१/१०/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — **आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक २९४**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :—** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail. com, abhiram.deshpande70@gmail.com

## जाहीर नोटीस

**अकोला येथील वि. ०५वे सह दिवाणी न्यायाधीश (व.स्तर) यांच्या न्यायालयात**

'वाद प्रश्न नक्की करण्यासाठी समन्स'
(दिवाणी व्यवहार संहिता, नियमक्रम ५, नियम १,५)
अनुसूची एक, परिशिष्ट ब,क्र.२

दावा रु./— — आर.सी.एस. नं.४००/२०२५
चौ.ता.: १६/१०/२०२६

साई कंन्स्ट्रक्शन ...विरूध्द... बालाजी + 02

**बनाम :—** १. बालाजी गोविंद काशिकर रा. १७९९, कलाल की चाल, अकोला, ता. जि. अकोला.

ज्याअर्थी वादी यांनी 'SUIT FOR EVICTION, POSSESSION, ARREARS OF RENT AND INQUIRY INTO FUTURE MESNE PROFIT.', तुमच्या विरुध्द या न्यायालयात वाद दाखल केला आहे, त्याअर्थी त्या वादासंबंधी तुम्हाला जे काही सांगावयाचे असेल ते सांगण्यासाठी दिनांक १६/१०/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता तुम्ही स्वतः किंवा ज्यास योग्यरित्या सूचना दिलेल्या आहेत व जो वादासंबंधीच्या महत्वाच्या सर्व प्रश्नांचे उत्तर देऊ शकेल अशा वकीलामार्फत किंवा अशा सर्व प्रशंचे उत्तर देउ शकणारा एखादा इसम बरोबर असलेल्या वकीलामार्फत या न्यायालयात उपस्थित होण्यासाठी याद्वारे तुमच्यावर समन्स बजावण्यात येत आहे आणि याद्वारे तुम्हाला असा निर्देश देण्यात येत आहे की, समन्स बजावल्यापासून ३० दिवसाचे आत तुम्ही तुमच्या बचावाचे लेखी निवेदन दाखल करावे व त्याच दिवशी तुमचा बचाव किंवा उलट वाद (सेट ऑफ) किंवा प्रतिवाद (काउंटर क्लेम) ज्या दस्तऐवजावर आधारलेला असेल असे तुमच्या ताब्यात किंवा नियंत्रणाखाली असलेले सर्व दस्तऐवज सादर करावेत आणि जर तुम्ही तुमच्या बचावाच्या किंवा उलट वादाच्या (सेट ऑफ) किंवा प्रतिवाद (काउंटर क्लेम) पूष्ट्यर्थ पुरावा म्हणून तुमच्या ताब्यात किंवा नियंत्रणाखाली असलेल्या किंवा नसलेल्या इतर कोणत्याही दस्तऐवजावर विसंबून असाल तर अशा दस्तऐवजाची एक सूची करुन ती सूची तुमच्या बचावाच्या लेखी निवेदनास जोडावी.

तुम्हाला नोटीस देण्यात येत आहे की, वर नमूद केलेल्या दिवशी उपस्थित राहण्यास कसूर केल्यास तुमच्या अनुपस्थितीत वादाची सुनावणी केली जाउन त्याचा निर्णय केला जाईल. आणखी अशी नोटीस देण्यात येत आहे की, वर नमून केलेल्या तारखेस किंवा कालावधीत बजावणीकरिता तुमचा पत्ता दाखल करण्यात तुम्ही कसूर केल्यास तुमचा बचाव रद्द केला जाण्यास पात्र ठरेल. आज दिनांक ०१/१०/२०२६ रोजी अकोला येथे माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले. समन्स मिळाल्यापासुन ३० दिवसाच्या आत लेखी जबाब दाखल करणे आवश्यक आहे.

शिक्का — **आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**अकोला येथील वि. ०६वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) यांच्या न्यायालयात**

'वाद प्रश्न नक्की करण्यासाठी समन्स'
(दिवाणी व्यवहार संहिता, नियमक्रम ५, नियम १,५)
अनुसूची एक, परिशिष्ट ब,क्र.२

दावा रु./— — स्मॉल.कॉज.सुट.नं.२८/२०२५
चौ.ता.: २८/१०/२०२६

साई कंन्स्ट्रक्शन ...विरूध्द... मोतीलाल व इतर

**बनाम :—** १. मोतीलाल लक्ष्मीलाल जयस्वाल २. प्रवीण जुगल किशोर जयस्वाल ३. मोहम्मद साजीद अब्दुल शाकुर दोघेही रा. १७७१, कलाल की चाल, अकोला. ता. जि. अकोला.

ज्याअर्थी वादी यांनी 'Suit For Eviction, Posssession, Arrears of Rent and Inquiry Into Future Mense Profit' यासाठी तुमच्या विरुध्द या न्यायालयात वाद दाखल केला आहे, त्याअर्थी त्या वादासंबंधी तुम्हाला जे काही सांगावयाचे असेल ते सांगण्यासाठी दिनांक २८/१०/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता तुम्ही स्वतः किंवा ज्यास योग्यरित्या सूचना दिलेल्या आहेत व जो वादासंबंधीच्या महत्वाच्या सर्व प्रश्नांचे उत्तर देऊ शकेल अशा वकीलामार्फत किंवा अशा सर्व प्रशंचे उत्तर देउ शकणारा एखादा इसम बरोबर असलेल्या वकीलामार्फत या न्यायालयात उपस्थित होण्यासाठी याद्वारे तुमच्यावर समन्स बजावण्यात येत आहे आणि याद्वारे तुम्हाला असा निर्देश देण्यात येत आहे की, समन्स बजावल्यापासून ३० दिवसाचे आत तुम्ही तुमच्या बचावाचे लेखी निवेदन दाखल करावे व त्याच दिवशी तुमचा बचाव किंवा उलट वाद (सेट ऑफ) किंवा प्रतिवाद (काउंटर क्लेम) ज्या दस्तऐवजावर आधारलेला असेल असे तुमच्या ताब्यात किंवा नियंत्रणाखाली असलेले सर्व दस्तऐवज सादर करावेत आणि जर तुम्ही तुमच्या बचावाच्या किंवा उलट वादाच्या (सेट ऑफ) किंवा प्रतिवाद (काउंटर क्लेम) पुष्ट्यर्थ पुरावा म्हणून तुमच्या ताब्यात किंवा नियंत्रणाखाली असलेल्या किंवा नसलेल्या इतर कोणत्याही दस्तऐवजावर विसंबून असाल तर अशा दस्तऐवजाची एक सूची करुन ती सूची तुमच्या बचावाच्या लेखी निवेदनास जोडावी. तुम्हाला नोटीस देण्यात येत आहे की, वर नमूद केलेल्या दिवशी उपस्थित राहण्यास कसूर केल्यास तुमच्या अनुपस्थितीत वादाची सुनावणी केली जाउन त्याचा निर्णय केला जा. ईल. आणखी अशी नोटीस देण्यात येत आहे की, वर नमून केलेल्या तारखेस किंवा कालावधीत बजावणीक रिता तुमचा पत्ता दाखल करण्यात तुम्ही कसूर केल्यास तुमचा बचाव रद्द केला जाण्यास पात्र ठरेल. आज दिनांक ०३/१०/२०२६ रोजी अकोला येथे माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले. समन्स मिळाल्यापासुन ३० दिवसाच्या आत लेखी जबाब दाखल करणे आवश्यक आहे.

शिक्का — **आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**वि.०५ वे सह दिवाणी न्यायाधीश (व. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १४११/२०२६ — प्रोसेस नं.१२४०८/२०२६
चौ.ता. १५/१०/२०२६ — दिनांक : २९/०९/२०२६

**अर्जदार :** १. चारूशिला राजेंद्र देशमुख, वय अं. ५५वर्षे, धंदा- घरकाम, २. वरदा राजेंद्र देशमुख, वय अं. २५वर्षे, धंदा- शिक्षण, ३. चिन्मयी राजेंद्र देशमुख, वय अं. २०वर्षे, धंदा- शिक्षण, ४. विजया शामराव देशमुख, वय अं. ८० वर्षे, धंदा - घरकाम, सर्व रा. जुना पोस्ट ऑफीस जवळ, आमसिंग, ता. जि. वाशिम.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** बांच मॅनेजर, स्टेट बॅक ऑफ इंडिया, मेन ब्रांच, अकोला, जवाहरलाल नेहरू मार्ग, टॉवर चौक जवळ, अकोला, ता. जि. अकोला ४४४००१.
**मयताचा पत्ता :-** मयत : राजेंद्र श्यामराव देशमुख
**पत्ता :-** रा. जुना पोस्ट ऑफीस जवळ, आमसिंग, ता. जि. वाशिम.

ज्याअर्थी उपरोक्त अर्जदार हयांनी भारतीय उत्तराधिकार अधिनियमाचे कलम ३७२ अन्वये उत्तराधिकार प्रमाणपत्र मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज केला आहे. त्यांनी अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत राजेंद्र श्यामराव देशमुख यांचे दि.३०/०७/२०२४ रोजी निधन झाले.

अर्जामध्ये पूढे असेही नमूद केले आहे की, सदरहू मयत राजेंद्र श्यामराव देशमुख हे महाराष्ट्र स्टेट पॉवर जनरेशन कंपनी लि., पारस, जि. अकोला येथे सहायक अभियंता म्हणुन कार्यरत होते व त्यांचे नावे स्टेट बॅक ऑफ इंडिया, मुख्य शाखा, अकोला येथे 'पब्लीक प्रॉव्हीडन्ट फंड' (पीपीएफ) खाते क्र. ३०२०१०४६६९२ मध्ये रक्कम जमा असुन, सदरहु पीपीएफ खात्या मधील जमा रकमेचा लाभ अर्जदार यांना मिळण्याकरीता उपरोक्त अर्जदाराने उत्तराधिकार प्रमाणपत्र मिळणेसाठी उपरलिखित अर्ज केला आहे. अर्जामध्ये पूढे असेही नमूद केले आहे की, वरील अर्जदार यांच्या शिवाय मयतास कोणीही उत्तराधिकारी नाही. सबब, उत्तराधिकार प्रमाणपत्र मिळावे. करीता अर्जदाराने अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १५/१०/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल, हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २९/०९/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — **आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**अकोला येथील वि. ०६वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) यांच्या न्यायालयात**

'वाद प्रश्न नक्की करण्यासाठी समन्स'
(दिवाणी व्यवहार संहिता, नियमक्रम ५, नियम १,५)
अनुसूची एक, परिशिष्ट ब,क्र.२

दावा रु./— — स्मॉल.कॉज.सुट.नं.१८/२०२५
चौ.ता.: २८/१०/२०२६

साई कंन्स्ट्रक्शन ...विरूध्द... अमृतलाल व इतर

**बनाम :—** १. अमृतलाल दयाभाई २. नसिम आरा दोघेही रा. १७२७, कलाल की चाल, अकोला. ता. जि. अकोला.

ज्याअर्थी वादी यांनी 'Suit For Eviction, Posssession, Arrears of Rent and Inquiry Into Future Mense Profit' यासाठी तुमच्या विरुध्द या न्यायालयात वाद दाखल केला आहे, त्याअर्थी त्या वादासंबंधी तुम्हाला जे काही सांगावयाचे असेल ते सांगण्यासाठी दिनांक २८/१०/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता तुम्ही स्वतः किंवा ज्यास योग्यरित्या सूचना दिलेल्या आहेत व जो वादासंबंधीच्या महत्वाच्या सर्व प्रश्नांचे उत्तर देऊ शकेल अशा वकीलांमार्फत किंवा अशा सर्व प्रशंचे उत्तर देउ शकणारा एखादा इसम बरोबर असलेल्या वकीलामार्फत या न्यायालयात उपस्थित होण्यासाठी याद्वारे तुमच्यावर समन्स बजावण्यात येत आहे आणि याद्वारे तुम्हाला असा निर्देश देण्यात येत आहे की, समन्स बजावल्यापासून ३० दिवसाचे आत तुम्ही तुमच्या बचावाचे लेखी निवेदन दाखल करावे व त्याच दिवशी तुमचा बचाव किंवा उलट वाद (सेट ऑफ) किंवा प्रतिवाद (काउंटर क्लेम) ज्या दस्तऐवजावर आधारलेला असेल असे तुमच्या ताब्यात किंवा नियंत्रणाखाली असलेले सर्व दस्तऐवज सादर करावेत आणि जर तुम्ही तुमच्या बचावाच्या किंवा उलट वादाच्या (सेट ऑफ) किंवा प्रतिवाद (काउंटर क्लेम) पूष्ट्यर्थ पुरावा म्हणून तुमच्या ताब्यात किंवा नियंत्रणाखाली असलेल्या किंवा नसलेल्या इतर कोणत्याही दस्तऐवजावर विसंबून असाल तर अशा दस्तऐवजाची एक सूची करुन ती सूची तुमच्या बचावाच्या लेखी निवेदनास जोडावी. तुम्हाला नोटीस देण्यात येत आहे की, वर नमूद केलेल्या दिवशी उपस्थित राहण्यास कसूर केल्यास तुमच्या अनुपस्थितीत वादाची सुनावणी केली जाउन त्याचा निर्णय केला जा. ईल. आणखी अशी नोटीस देण्यात येत आहे की, वर नमून केलेल्या तारखेस किंवा कालावधीत बजावणीक. रिता तुमचा पत्ता दाखल करण्यात तुम्ही कसूर केल्यास तुमचा बचाव रद्द केला जाण्यास पात्र ठरेल. आज दिनांक २८/०९/२०२६ रोजी अकोला येथे माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले. समन्स मिळाल्यापासुन ३० दिवसाच्या आत लेखी जबाब दाखल करणे आवश्यक आहे.

शिक्का — **आदेशानुसार**
सहा. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**वि.०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १५६४/२०२६ — प्रोसेस नं.११८१५/२०२६
चौ.ता. २७/१०/२०२६ — दिनांक : १६/०९/२०२६

**अर्जदार :** १. सिंधुताई सुधाकर तायडे, वय अं. ५५वर्षे, धंदा- घरकाम, २. मंगेश सुधाकर तायडे, वय अं. ३६वर्षे, धंदा- मजुरी, क्र. १व २ रा. कौलखेड जहागीर, ता. जि. अकोला. ३. दिपाली पुरूषोत्तम टोले, वय ३० वर्षे, धंदा - घरकाम, रा. मौजे दापुरा, ता. मुर्तिजापूर, शेलु बाजार, पो. शेलुबाजार, माना, जि. अकोला. ४. रूपाली योगेश नारे, वय २७वर्षे, धंदा- घरकाम, रा. हनुमान नगर, अकोट, ता. अकोट, जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : सुधाकर विनायकराव तायडे
**पत्ता :-** रा. कौलखेड जहागीर, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत सुधाकर विनायकराव तायडे यांचे दि. १९/०४/२०१६ रोजी कौलखेड जहागीर, ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २७/१०/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १६/०९/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — **आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**वि.०२ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १५६६/२०२६ — प्रोसेस नं.११९८४/२०२६
चौ.ता. ०६/११/२०२६ — दिनांक : २१/०९/२०२६

**अर्जदार :** १. प्रशांत मधुकर आढे २. गोकर्णा मधुकर आढे दोन्ही रा. हनुमान मंदिराजवळ, जिल्हा परिषद नगर, खडकी, अकोला. ता. जि. अकोला. ३. जयश्री विनोद खुमकर रा. जळंब, ता. शेगाव, जि. बुलढाणा. मो. क्र. ८८३०४९५७०३

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : मधुकर नारायण आढे
**पत्ता :-** रा. हनुमान मंदिराजवळ, जिल्हा परिषद नगर, खडकी, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत मधुकर नारायण आढे यांचे दि. ०८/०७/२०२६ रोजी राहत्या घरी जिल्हा परिषद नगर, खडकी, अकोला. ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०६/११/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २१/०९/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — **आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**वि.०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १६०७/२०२६ — प्रोसेस नं.१२२३९/२०२६
चौ.ता. ०४/११/२०२६ — दिनांक : २४/०९/२०२६

**अर्जदार :** १. उर्मिला शामराव इंगळे २. भारती शामराव गायकवाड ३. कुणाल शाम इंगळे ४. सचिन शाम इंगळे ५. मंगल शाम इंगळे अर्जदार क्र. १ ते ५ रा. न्यू तापडिया नगर, गुडलक हाउस जवळ, अकोला. ता. जि. अकोला. ६. वैशाली दिलीप चंद्रगिरी रा. रजपूतपुरा, अकोला. ता. जि. अकोला. ७. संगिता संजय गायकवाड रा. माता नगर, रामदास पेठ पोलीस स्टेशन च्या मागे, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : श्याम डिगांबर इंगळे
**पत्ता :-** रा. न्यु तापडिया नगर, गुडलक हाउस जवळ, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत श्याम डिगांबर इंगळे यांचे दि. २५/०३/२०१५ रोजी न्यु तापडिया नगर, अकोला. ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०४/११/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २४/०९/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — **आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**वि.०६ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १५९५/२०२६ — प्रोसेस नं.१२२३५/२०२६
चौ.ता. ३१/१०/२०२६ — दिनांक : २४/०९/२०२६

**अर्जदार :** १. गजानन शामराव पिंपळकर २. विजय शामराव पिंपळकर ३. राजेश शामराव पिंपळकर ४. उमेश शामराव पिंपळकर १ ते ४ रा. छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याजवळ, मोठी उमरी, अकोला. ता. जि. अकोला. ५. सौ. गिता गजानन शेटे रा. सुमनआई अपार्टमेंट, लक्ष्मी नगर, मोठी उमरी, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : १. शामराव अवधुत पिंपळकर २. सुमन शामराव पिंपळकर
**पत्ता :-** रा.छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याजवळ, मोठी उमरी, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत शामराव अवधुत पिंपळकर यांचे दि. १२/०७/२०२५ रोजी व मयत सुमन शामराव पिंपळकर यांचे दि. ०९/०३/२०१८ रोजी राहते घरी मोठी उमरी, अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ३१/१०/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २४/०९/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — **आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**वि.०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १६३७/२०२६ — प्रोसेस नं.१२४०४/२०२६
चौ.ता. १६/११/२०२६ — दिनांक : २९/०९/२०२६

**अर्जदार :** १. पंचफुलाबाई जयराम गोटे रा. मु. वाकी, पोस्ट धोतर्डी, वाकी, धोतर्डी, ता. जि. अकोला. २. कैलास जयराम गोटे रा. वाकी, धोतर्डी, अकोला. ता. जि. अकोला. मो. क्र. ७४९९८६८६७४ ३. मनोहर जयराम गोटे रा. वाकी, धोतर्डी, अकोला. ता. जि. अकोला. ४. सिंदू रामदास नागे, रा. धनगरपुरा, ता. बार्शिटाकळी, सिंदखेड, जि. अकोला. ५. मंदा ज्ञानेश्वर पातोंड रा. बार्शिटाकळी, जि. अकोला. शहापूर, बार्शिटाकळी, जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : जयराम रायभान गोटे
**पत्ता :-** रा. मु. वाकी, पोस्ट धोतर्डी, वाकी, धोतर्डी, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत जयराम रायभान गोटे यांचे दि. ०७/०९/२०१८ रोजी राहते घरी, वाकी, मु. वाकी, पो. धोतर्डी, ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १६/११/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निदीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २९/०९/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — **आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

# बोरखेडीत आठ दिवसांपासून पाणीबाणी

## केबल - मोटर जळूनही दुरुस्तीला मुहूर्त नाही, १० महिन्यांपासून कर्मचाऱ्यांचे वेतन थकीत, नाल्या तुंबल्या अन् गाव अंधारात

**आष्टी (शहीद) / जनमाध्यम**

एकीकडे सणासुदीचे दिवस तोंडावर आले असताना दुसरीकडे बोरखेडी ग्रामस्थांना पिण्याच्या पाण्यासाठी वणवण भटकण्याची वेळ आली आहे. बांबरडा ग्रामपंचायतीच्या हद्दीतील बोरखेडी गावात गेल्या आठ दिवसांपासून नळाला पाणी आलेले नाही. सार्वजनिक पाणीपुरवठा योजनेवरील विद्युत केबल आणि मोटर जळाल्याने ही परिस्थिती निर्माण झाली असली तरी बिघाडाची माहिती देऊनही तातडीने दुरुस्ती अथवा पर्यायी पाणीपुरवठ्याची व्यवस्था करण्यात आली नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. त्यामुळे ग्रामपंचायतीच्या कारभाराबाबत संताप व्यक्त होत आहे.

पाणीपुरवठा करणाऱ्या विहिरीवरील विद्युत केबल जळाल्यानंतर यंत्रणा बंद पडली. त्यानंतर विद्युत मोटरही जळाल्याने गावचा पाणीपुरवठा पूर्णपणे ठप्प झाला. बिघाडाची माहिती ग्रामपंचायत प्रशासनाला देण्यात आली. मात्र, आठ दिवस उलटूनही दुरुस्तीचे काम पूर्ण झाले नसल्याने ग्रामस्थांच्या अडचणीत दिवसेंदिवस भर पडत आहे

पाणीपुरवठा कधी सुरू होणार, याची निश्चित माहिती मिळत नसल्याने ग्रामस्थ 'आज पाणी येईल, उद्या पाणी येईल' या आशेवर दिवस काढत आहेत. घरातील दैनंदिन कामे, वृद्ध व्यक्ती, लहान मुले यांच्यासाठी लागणारे पाणी मिळविण्यासाठी नागरिकांना दूरवर जावे लागत आहे. विशेषतः महिलांवर पाणी आणण्याची अतिरिक्त जबाबदारी पडली असून, डोक्यावर हंडे घेऊन पाण्यासाठी धावपळ करण्याची वेळ आली आहे.

**नवरात्राच्या तोंडावर पाण्यासाठी वणवण**

नवरात्रोत्सव काही दिवसांवर येऊन ठेपला आहे. त्याचवेळी शेतकऱ्यांची सोयाबीन काढणीची लगबग सुरू आहे. शेतीची कामे आणि सणाची तयारी यामुळे ग्रामस्थ आधीच व्यस्त असताना पिण्याच्या पाण्याची समस्या त्यांच्या डोक्यावर आली आहे. गावातील पाणीपुरवठा यंत्रणा तातडीने दुरुस्त करण्याऐवजी विलंब होत



असल्याने ग्रामस्थांमध्ये नाराजी वाढत आहे.

**दहा महिन्यांचे वेतन थकीत; व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह**

ग्रामपंचायतीच्या पाणी पुरवठा कर्मचाऱ्यांचे तब्बल दहा महिन्यांपासून वेतन थकीत असल्याची बाबही समोर आली आहे. कर्मचाऱ्यांचे वेतन वेळेवर मिळत नसल्याने त्यांच्या नाराजीचाही परिणाम पाणीपुरवठा व्यवस्थेवर होत असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. पाणीपुरवठ्याची यंत्रणा सुरळीत ठेवण्याची जबाबदारी असताना आवश्यक दुरुस्तीला विलंब का होत आहे, असा सवाल ग्रामस्थ उपस्थित करीत आहेत.

**पाणी गेलेच; आता गावाची स्वच्छताही धोक्यात**

बोरखेडीतील समस्या केवळ पाणीपुरवठ्यापुरती मर्यादित राहिलेली नाही. सांडपाणी वाहून नेणाऱ्या नाल्यांची नियमित साफसफाई आणि उपसा न झाल्याने अनेक ठिकाणी नाल्या तुंबल्या आहेत. त्यामुळे सांडपाणी रस्त्यावर येण्याची तसेच दुर्गंधी आणि अस्वच्छतेची समस्या निर्माण झाल्याचे ग्रामस्थ सांगतात. सणासुदीच्या काळात गावातील स्वच्छतेची ही अवस्था नागरिकांसाठी चिंतेचा विषय बनली आहे.

**पथदिवे बंद; रात्री गाव अंधारात**

पाणीटंचाईबरोबरच गावातील अनेक पथदिवे बंद असल्याने रात्रीच्या वेळी नागरिकांना अंधाराचा सामना करावा लागत आहे. पाणी नाही, नाल्या तुंबल्या आणि रस्त्यांवरील दिवे बंद अशा तिहेरी समस्यांना ग्रामस्थांना सामोरे जावे लागत आहे. मूलभूत सुविधा पुरविण्याची जबाबदारी असलेल्या ग्रामपंचायतीच्या कारभारावर त्यामुळे प्रश्न उपस्थित होत आहेत.

**न्याय मागायचा तरी कुणाकडे**

गेल्या आठ दिवसांपासून गावात पिण्याच्या पाण्याची समस्या भेडसावत आहे. विहिरीवरील केबल आणि मोटर जळाल्यामुळे पाणीपुरवठा बंद आहे. अद्याप पर्यायी व्यवस्था करण्यात आलेली नाही. गावात घाणपाण्याची समस्या असून पथदिवेही बंद आहेत. फोन करून ग्रामपंचायत प्रशासनाकडे माहिती देऊनही दखल घेतली जात नसेल तर न्याय मागायचा कुणाकडे, असा प्रश्न निर्माण झाला आहे. ग्रामस्थांना सोबत घेऊन पंचायत समितीवर धडक देणार आहे.

ग्रामपंचायत प्रशासनाने बोरखेडीतील पाणीपुरवठ्याचा बिघाड तातडीने दूर करून नियमित पाणीपुरवठा सुरू करावा.

तोपर्यंत पर्यायी टँकर किंवा अन्य माध्यमातून पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी. तुंबलेल्या नाल्यांचा उपसा करून गावाची स्वच्छता करावी आणि बंद पथदिवे सुरू करावेत, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

**ग्रामस्थांचा उद्रेक; पंचायत समितीवर धडक देण्याचा इशारा**

ग्रामपंचायत प्रशासनाकडे वारंवार तक्रार करूनही समस्या या मार्गी लागत नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. आता आश्वासनांवर विश्वास ठेवण्याची वेळ संपली असून प्रत्यक्ष उपाययोजना करण्याची मागणी होत आहे. पाणीपुरवठा तातडीने सुरू न झाल्यास ग्रामस्थांना सोबत घेऊन पंचायत समितीवर धडक देण्याचा इशारा सामाजिक कार्यकर्ते दिवाकर घटी यांनी दिला आहे.

**दिवाकर घटी,**
सामाजिक कार्यकर्ता, बोरखेडी




## विनापरवाना रेती वाहतूक; सात लाखांचा मुद्देमाल जप्त

**देवळी-** शासनाचा कोणताही परवाना न घेता रेतीची चोरटी वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टरवर देवळी पोलिसांनी कारवाई केली. या कारवाईत एक ब्रास काळी ओलसर रेती, ट्रॅक्टर आणि ट्रॉली असा एकूण ७ लाख ७ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. ही कारवाई ४ ऑक्टोबर रोजी पहाटे देवळी ते दिघी बोपापूर मार्गावर करण्यात आली.मंगेश विजयराव तायकडे रा. देवळी असे गुन्हा दाखल झालेल्या आरोपीचे नाव आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, आरोपी कोणताही शासकीय परवाना नसताना स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी ट्रॅक्टर ट्रॉलीमधून रेतीची वाहतूक करीत होता. त्याच्याकडून ३ हजार रुपये किमतीची एक ब्रास रेती, ६ लाख रुपये किमतीचा लाल रंगाचा महिंद्रा ५८५ ट्रॅक्टर आणि एक लाख रुपये किमतीची हिरव्या रंगाची ट्रॅक्टर ट्रॉली असा मुद्देमाल जप्त करण्यात आला. पोलिसांनी आरोपीविरुद्ध संबंधित कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

## मानोरा फाट्यावर दुचाकींची धडक; युवक जखमी

**हिंगणघाट -** समोरून येणाऱ्या दुचाकीने धडक दिल्याने दुचाकीस्वार गंभीर जखमी झाल्याची घटना मानोरा फाटा परिसरात घडली. अपघातानंतर संबंधित दुचाकी चालक घटनास्थळी न थांबता पसार झाल्याची तक्रार पोलिसांत करण्यात आली आहे.श्रीकांत प्रदीपराव धात्रक वय ३५ रा. नागरी ता. वरोरा जि. चंद्रपूर असे जखमीचे नाव आहे. ३ ऑक्टोबर रोजी रात्री सुमारे ९ ते ९.१५ वाजताच्या दरम्यान ते एमएच ३४ सीएस ०६९२ क्रमांकाच्या दुचाकीने नागरी येथे घरी जात होते. मानोरा फाट्याजवळ समोरून आलेल्या एमएच ३४ क्यूआर ३२१२ क्रमांकाच्या दुचाकीने त्यांच्या दुचाकीला समोरासमोर धडक दिली. यात त्यांच्या उजव्या हाताला व पायाला दुखापत झाली. प्रथम उपचारानंतर त्यांना उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या अभिप्रायानंतर पोलिसांनी गुन्हा दाखल केला. हिंगणघाट पोलिस तपास करीत आहेत.

## शेतातील विहिरीतून मोटार आणि केबल लंपास

**आर्वी-** शेतातील विहिरीत बसविलेली पाण्याची मोटार आणि केबल अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना मौजा अहमदनगर येथील शेतशिवारात उघडकीस आली. याप्रकरणी राहुल इंद्रचंद सिंघई वय ४५ रा. आर्वी यांनी पोलिसांत तक्रार दाखल केली.सिंघई यांच्या आईच्या नावावर अहमदनगर शिवारात शेती असून ते स्वतः शेती करतात. विहिरीतील मोटारीच्या साहाय्याने पिकांना पाणी दिले जाते. १ ऑक्टोबर रोजी सकाळी मोटार सुरू केली असता पाणी येत नसल्याने त्यांनी विहिरीजवळ जाऊन पाहणी केली. त्यावेळी मोटारीला बांधलेला दोरखंड आणि केबल कापलेली दिसून आली. तपासणी केली असता विहिरीतील जुनी वापरती टेक्समो कंपनीची मोटार आणि सुमारे २५ फूट केबल गायब असल्याचे आढळले. मोटारीची किंमत सुमारे १४ हजार ५०० रुपये तर केबलची किंमत एक हजार रुपये आहे. शोध घेऊनही मुद्देमाल न मिळाल्याने आर्वी पोलिसांत तक्रार देण्यात आली. अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## चार जनावरे चारचाकीतून लंपास

**वर्धा-** चारा खाण्यासाठी सोडलेल्या दोन बकऱ्या आणि दोन बकरे अज्ञात व्यक्तींनी चारचाकी वाहनातून चोरून नेल्याची घटना रामनगरातील सुखकर्ता नगर न्यू रेल्वे कॉलनी परिसरात घडली. याप्रकरणी संजय शंकरराव ठाकरे वय ५२ रा. तुकाराम वॉर्ड, रामनगर यांनी पोलिसांत तक्रार दिली.३ ऑक्टोबर रोजी दुपारी त्यांची आई बकऱ्यांना चारा खाण्यासाठी परिसरात घेऊन गेली होती. पाणी पिण्यासाठी ती हनुमान मंदिरात गेली असता बकऱ्या तेथेच होत्या. काही वेळाने परत आल्यानंतर दोन बकरे आणि दोन बकऱ्या गायब असल्याचे आढळले. परिसरात शोध घेतला असता त्या मिळून आल्या नाहीत. दुसऱ्या दिवशी स्थानिक नागरिकांनी दुपारी साडेबारा वाजताच्या सुमारास सिल्वर रंगाच्या चारचाकीत दोन व्यक्ती बकरे व बकऱ्या घेऊन जाताना पाहिल्याचे सांगितले. चोरीला गेलेल्या जनावरांची एकूण किंमत ३२ हजार रुपये आहे. रामनगर पोलिसांनी आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# 'पाणी वाचवा' म्हणत रस्त्यावर पाण्याची उधळण

### पालखीच्या मार्गासाठी टँकरने रस्ता भिजवला

### पाणीकपातीच्या काळात नागरिकांचा आक्रोश

**वर्धा/ जनमाध्यम**

यंदा पावसाने पाठ फिरवल्याने पाणीटंचाईची झळ जाणवत आहे. उपलब्ध पाणीसाठा जपून वापरा, पाण्याची नासाडी टाळा, असा संदेश सामाजिक संघटना आणि प्रशासनाकडून दिला जात आहे.

मात्र, दुसरीकडे सोमवारी भरदुपारी शहरातील रस्त्यावर टँकरद्वारे मोठ्या प्रमाणात पाणी टाकले जात असल्याचे चित्र दिसून आले. त्यामुळे पाणी बचतीच्या आवाहनालाच हरताळ फासला जात असल्याची चर्चा नागरिकांत सुरू झाली आहे.

सोमवारी दुपारच्या सुमारास रस्त्यावर टँकरद्वारे पाणी मारण्याचे काम सुरू होते. भर उन्हात रस्ता भिजविण्यासाठी पाण्याचा वापर होत असल्याचे पाहून नागरिकांनी आश्चर्य व्यक्त केले. यंदा पाऊस कमी झाल्याने अनेक भागांमध्ये पाण्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. अशा परिस्थितीत रस्त्यावर पाणी टाकण्याऐवजी त्याचा वापर नागरिकांच्या गरजांसाठी व्हावा, अशी भावना व्यक्त होत आहे.

दरम्यान, आमच्या प्रतिनिधीने याबाबत माहिती घेतली असता धार्मिक पालखी या मार्गाने येणार असल्याने रस्त्यावर धूळ उडू नये आणि पालखी मार्ग स्वच्छ राहावा, यासाठी पाणी टाकण्यात येत असल्याचे सांगण्यात आले.पालखीच्या स्वागतासाठी रस्ता स्वच्छ ठेवण्याचा उद्देश योग्य असला तरी त्यासाठी पाण्याची उधळपट्टी कितपत योग्य, हा प्रश्न मात्र कायम आहे. पाणीटंचाईच्या काळात प्रशासनाने पर्यायी उपायांचा विचार करून पाण्याचा काटकसरीने वापर करण्याची गरज आहे.

# पहिली मशीन 'पांढरा हत्ती'; दुसरीही धूळखात

## लाखो रुपये खर्चून नवी शौचालय सफाई मशीन खरेदी

**सिंदी रेल्वे / जनमाध्यम**

सिंदी रेल्वे शहरातील नागरिकांच्या मूलभूत स्वच्छतेच्या प्रश्नाकडे नगरपरिषद प्रशासनाचे दुर्लक्ष कायम असल्याचा आरोप नागरिकांकडून होत आहे. तब्बल २० ते २५ हजार लोकसंख्या असलेल्या शहरात शौचालयांच्या सेफ्टी टँकचा उपसा करण्यासाठी प्रभावी आणि नियमित सरकारी व्यवस्था नाही. त्यातच यापूर्वी खरेदी केलेली शौचालय सफाई मशीन वापराअभावी निकामी होऊन भंगारात गेल्याचे वास्तव असताना नगरपरिषदेने पुन्हा लाखो रुपये खर्च करून नवीन मशीन खरेदी केली. मात्र नवी मशीन आणून दोन महिने उलटले तरी तिचे लोकार्पणही झालेले नाही आणि प्रत्यक्ष वापरालाही सुरुवात झालेली नाही. त्यामुळे पहिली मशीन 'पांढरा हत्ती' ठरली; आता दुसरी मशीनही त्याच वाटेवर नेण्याचा घाट तर नाही ना असा प्रश्न नागरिक उपस्थित करीत आहेत.

'घर तेथे शौचालय' योजनेमुळे शहरातील बहुतांश घरांमध्ये शौचालयांची सुविधा निर्माण झाली. मात्र शहरात अद्याप सर्वंकष भूमिगत गटार व्यवस्था नसल्याने अनेक ठिकाणी शौचालयांमधील सांडपाणी नाल्यांमध्ये सोडले जाते.



परिणामी काही भागांत दुर्गंधी आणि अस्वच्छतेची समस्या निर्माण होत असल्याच्या तक्रारी आहेत.अशा परिस्थितीत सेफ्टी टँकचा नियमित उपसा करण्याची जबाबदारी नगरपरिषदेने सक्षमपणे पार पाडणे अपेक्षित आहे. मात्र मशीन खरेदी करण्यापूर्वी ती चालविण्यासाठी आवश्यक प्रशिक्षित कर्मचारी, तांत्रिक मनुष्यबळ आणि नियोजन याचा विचार झाला का, असा प्रश्न आता उपस्थित होत आहे.

काही वर्षांपूर्वी स्वच्छ भारत अभियानांतर्गत नगरपरिषदेने शौचालय टँक सफाईसाठी मशीन खरेदी केली होती. सुरुवातीला मोजक्याच टँकची सफाई झाल्यानंतर प्रशिक्षित कर्मचारी आणि नियोजनाअभावी तिचा वापर ठप्प झाल्याचे सांगितले जाते. कालांतराने मशीन धूळ खात पडली आणि अखेर निकामी होऊन भंगारात गेल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.



पहिल्या मशीनचा हा अनुभव समोर असतानाही आता पुन्हा नवीन मशीन खरेदी करण्यात आली. मात्र मशीन खरेदी झाली, पण ती चालविण्यासाठी कर्मचारी कुठे हा प्रश्न अनुत्तरित आहे.नवीन मशीन नगरपरिषदेकडे येऊन दोन महिने झाले. मात्र अद्याप एकाही शौचालयाच्या सेफ्टी टँकची सफाई करण्यात आलेली नसल्याची नागरिकांची तक्रार आहे. जनतेच्या पैशातून खरेदी केलेली यंत्रसामग्री पालिकेच्या आवारात उभी करून ठेवण्यासाठी नसते. तिचा नियमित आणि परिणामकारक वापर होणे अपेक्षित आहे.

**मशीनवर लाखो रुपये खर्च; मग कर्मचारी नियुक्ती आणि प्रशिक्षणाकडे दुर्लक्ष का** असा प्रश्न नागरिक करीत आहेत. मशीन वापरात आली नाही तर तिच्या खरेदीचा उद्देशच काय, असा प्रश्नही उपस्थित होत आहे.

**सफाईतून पालिकेलाही मिळू शकते उत्पन्न**

नगरपरिषदेने ठरावीक शुल्क आकारून नागरिकांना सेफ्टी टँक सफाईची सेवा उपलब्ध करून दिल्यास नागरिकांची गैरसोय दूर होण्याबरोबरच नगरपरिषदेच्या उत्पन्नातही भर पडू शकते. त्यासाठी प्रशिक्षित कर्मचाऱ्यांची नियुक्ती, आवश्यक प्रशिक्षण, मशीनच्या देखभालीची व्यवस्था आणि सफाईचे निश्चित वेळापत्रक तातडीने जाहीर करणे गरजेचे आहे.अन्यथा लाखो रुपये खर्चून आणलेली नवी मशीनही पहिल्या मशीनप्रमाणे वापराअभावी धूळ खात पडली तर जनतेच्या पैशांचा हा अपव्यय कोणाच्या माथी असा प्रश्न नागरिकांकडून केला जात आहे.

आता नगरपरिषद प्रशासन नवीन मशीन प्रत्यक्ष सेवेत कधी उतरवते, याकडे सिंदी रेल्वेकरांचे लक्ष लागले आहे.

# गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी समर्पित काम हाच खरा पुण्याचा मार्ग-भाऊ चासकर

**वर्धा/ जनमाध्यम**

शिक्षकांना शिक्षणेतर कामात गुंतवून ठेवल्याने विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेवर परिणाम होत आहे. शिक्षकांना अध्यापनासाठी पुरेसा वेळ देण्यासोबतच शाळांमध्ये आवश्यक भौतिक सुविधा उपलब्ध करून देण्याची गरज आहे, असे प्रतिपादन शिक्षण अभ्यासक भाऊ चासकर यांनी केले.

महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीच्या नागपूर विभागीय कार्यशाळेतील 'शिक्षण : काल, आज आणि उद्या' या विषयावरील मार्गदर्शनात ते बोलत होते. देशमुख लॉन्स येथे रविवारी झालेल्या कार्यशाळेचे उद्घाटन शिक्षण राज्यमंत्री तथा पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी समितीचे राज्याध्यक्ष विजय कोंबे होते.

चासकर म्हणाले, स्थानिक स्वराज्य संस्था, शासकीय आणि अनुदानित शाळांतील विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेची तपासणी केली जाते. मात्र भरमसाठ शुल्क आकारणाऱ्या इंग्रजी माध्यमाच्या शाळांतील विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेचीही समान निकषांवर तपासणी झाली पाहिजे. शिक्षकांची कमतरता, ऑनलाइन कामे, बीएलओची जबाबदारी आणि संचमान्यतेतील त्रुटींमुळे अध्यापनावर परिणाम होत आहे.डॉ. भोयर यांनी विद्यार्थ्यांसाठी आवश्यक भौतिक सुविधा देण्यास शासन कटिबद्ध असल्याचे सांगितले.

# एनसीसी छात्र सैनिकांचे ६० किमी सायकल अभियान

## देवळी ते सेवाग्राम आणि परत प्रवास; स्वच्छता व व्यसनमुक्तीचा संदेश

**देवळी/ जनमाध्यम**

पर्यावरणपूरक जीवनशैलीचा स्वीकार करण्यासोबतच आरोग्य आणि शारीरिक क्षमता वाढविण्यासाठी सायकल चालविणे उपयुक्त आहे. त्यामुळे एनसीसी छात्र सैनिकांनी राबविलेले सायकल अभियान प्रेरणादायी असल्याचे प्रतिपादन माजी खासदार रामदास तडस यांनी केले.२ ऑक्टोबर रोजी २१ महाराष्ट्र बटालियन एनसीसी अंतर्गत एस.एस.एन.जे. महाविद्यालयातील एनसीसी व राष्ट्रीय सेवा योजना युनिटतर्फे सायकल अभियान राबविण्यात आले. कॅप्टन मोहन गुजरकर यांच्या मार्गदर्शनाखाली ५५ छात्र सैनिकांनी देवळी ते सेवाग्राम आश्रम आणि परत असा सुमारे ६० किलोमीटरचा सायकल प्रवास पूर्ण केला. या प्रवासादरम्यान विविध ठिकाणी 'स्वच्छता ही सेवा' आणि 'नशामुक्त युवा फॉर विकसित भारत' या विषयांवर पथनाट्य सादर करून जनजागृती करण्यात आली.अभियाना साठी एसएमडब्ल्यू इस्पाततर्फे एनसीसी छात्र सैनिकांना दहा रेसिंग सायकली देण्यात आल्या. जानेवारी २०२७ मध्ये सेवाग्राम ते पुणे सायकल अभियानाचे नियोजन असून, त्याची पूर्वतयारी म्हणून ऑक्टोबर ते जानेवारीदरम्यान महिन्यातून दोन दिवस सायकल अभियान राबविण्यात येणार असल्याचे कॅप्टन गुजरकर यांनी सांगितले.यावेळी प्रकाश ढांगे, तपन रावत, प्राचार्य डॉ. सुनीता सोनारे यांच्यासह एनसीसी अधिकारी, प्राध्यापक व छात्र सैनिक उपस्थित होते.

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा, वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.
**संपादक - प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)
**वर्धा आवृत्ती वर्ष** - १४ **अंक** - ३०९
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३
**मुख्य कार्यालय :—** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
**ई-मेल**-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

# पवनार धाम नदीसह नदी नाले कोरडे

**वर्धा/ जनमाध्यम**

यंदा पावसाने पाठ फिरवल्याने वर्धा जिल्ह्यातील जलस्रोतांची अवस्था बिकट झाली आहे. गणेशोत्सवाच्या विसर्जनावेळीच नदी नाल्यांमध्ये पाण्याचा ठणठणाट जाणवला. अनेक ठिकाणी गणेशमूर्तींचे विसर्जन करण्यासाठी पुरेसे पाणी उपलब्ध नसल्याने भाविकांची मोठी गैरसोय झाली. आता काही दिवसांत नवरात्रोत्सवाला सुरुवात होत असून चार पाच आणि सहा फुटांच्या माताराणीच्या मूर्तींचे विसर्जन कुठे आणि कसे करायचे, हा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

पावसाळ्यापूर्वी हवामान खात्याने यंदा पावसाचे प्रमाण कमी राहण्याचा अंदाज व्यक्त केला होता. जिल्ह्यात सरासरीच्या सुमारे ७५ टक्के पाऊस पडण्याची शक्यता वर्तविण्यात आली होती. प्रत्यक्षातही पावसाने अपेक्षित साथ न दिल्याने अनेक जलस्रोत कोरडे पडले आहेत. त्यामुळे गणेशोत्सवातील विसर्जन व्यवस्थेवर त्याचा थेट परिणाम झाला.घरगुती गणेशमूर्ती साधारण दोन ते तीन फुटांच्या असतात. मात्र नवरात्रोत्सवातील माताराणीच्या मूर्ती चार ते सहा फुटांपर्यंत असतात. या मूर्तींचे विधिवत विसर्जन करण्यासाठी नदी किंवा तलावात पुरेशा पाण्याची आवश्यकता असते. मात्र पवनार धाम नदीसह अनेक नदी नाले सध्या कोरडे पडल्याचे चित्र आहे. त्यामुळे नवरात्रोत्सव सुरू होण्यापूर्वीच विसर्जनस्थळांवर पाण्याची व्यवस्था करण्याचे आव्हान प्रशासनासमोर उभे ठाकले आहे.

**श्रद्धा अबाधित, पण विसर्जनाची चिंता**

नवरात्रोत्सव हा केवळ धार्मिक उत्सव नसून हजारो भाविकांच्या श्रद्धेचा आणि सामाजिक एकोप्याचा सोहळा आहे. देवीची स्थापना मोठ्या भक्तिभावाने केली जाते. नऊ दिवस पूजा अर्चा आणि विविध धार्मिक कार्यक्रम झाल्यानंतर विसर्जनाची परंपरा पार पाडली जाते. मात्र यंदा विसर्जनासाठी आवश्यक पाणीच उपलब्ध नसेल तर भाविकांच्या श्रद्धेला धक्का बसण्याची शक्यता आहे.

गणेशोत्सवाच्या अनुभवातून प्रशासनाने धडा घेण्याची गरज आहे. नवरात्रोत्सव सुरू होण्यापूर्वीच प्रमुख विसर्जनस्थळांची पाहणी करून तेथे पाण्याची उपलब्धता करणे, कृत्रिम विसर्जन कुंड उभारणे किंवा पर्यायी व्यवस्था करणे आवश्यक ठरणार आहे. अन्यथा नवरात्रोत्सवाच्या उत्साहावर विसर्जनाच्या पाण्याचे संकट सावट निर्माण करू शकते.

# किरण सरनाईक शिंदे सेनेचे उमेदवार

## मंत्री संजय राठोड यांच्या उपस्थितीत नामांकन दाखल

**-अमरावती शिक्षक मतदार संघ निवडणूक**



अमरावती/प्रतिनिधीः- अमरावती शिक्षक मतदार निवडणुकीत महायुतीमध्ये जागा वाटपावरून पेच निर्माण झाला होता. अशात शिवसेना शिंदे गटाने विद्यमान आमदार किरण सरनाईक यांना अमरावती शिक्षक मतदारसंघातून महायुतीचे अधिकृत उमेदवार म्हणून घोषित केले आहे. इतकेच नाही तर आज सोमवार ५ ऑक्टोंबर रोजी दुपारी राज्यमंत्री संजय राठोड यांच्या उपस्थितीत विभागीय आयुक्त कार्यालयात जाऊन त्यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला.यावेळी शिवसेनेचे सर्व जिल्हाप्रमुख, आणि पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. मंत्री संजय राठोड आणि आमदार किरण सरनाईक यांनी दावा केला की, पुढील २ ते ३ दिवसांत चर्चा करून बंडखोरी शमवली जाईल आणि संपूर्ण चित्र स्पष्ट होईल. तर दुसरीकडे खासदार अनिल बोंडे यांची बहीण संगीता शिंदे या सुद्धा निवडणुकीसाठी मंगळवारी नामांकन अर्ज दाखल करणार आहे. त्यामुळे आता या निवडणुकीतील रंगत आणखीन वाढली आहे.

राज्याचे जलसंपदा मंत्री आणि विदर्भातील शिवसेनेचेनेते संजय राठोड म्हणाले की, पक्षाने महायुतीतील घटक पक्षांसोबत जागावाटप पूर्ण केले आहे. त्यानुसार अमरावतीची जागा शिंदे सेनेच्या वाट्याला आली आहे. पक्षाने विद्यमान आमदार किरण ☞(पान २ वर)

**■ १५ नामांकनाची उचल -**

सोमवारी निवडणुकीसाठी रामदास संपत कटक - बुलढाणा - २ ,संगीता सचिंद्र शिंदे - ३, प्रा. डॉ. अश्विन क्षीरसागर - यवतमाळ - ४, डॉ. अविनाश बोर्डे - अकोला - १,राजेश शालिग्राम कड - अकोला - २,अदिति ऋषिकेश पोहरे - अकोला - २, प्रीति हर्षल रेवणे - अमरावती - २, प्रशांत वानखडे - अमरावती - २,नितिन सुरेश आगे - अमरावती - ३,डॉ. सुमीत सुरेश पवार - अमरावती - १, नाना उर्फ ज्ञानेश्वर आमले - अमरावती - १,संदीप कांबले - अमरावती - २,विनोद कडू - अमरावती - २,चंद्रशेखर भोयर - अमरावती - २,एड. अंबरीश प्रल्हाद देशमुख - अमरावती - १ नामांकन उचलले आहे. अर्ज दाखल करण्याचा मंगळवारी शेवटचा दिवस आहे.

# ऑनलाइन गेमिंगच्या आड तीन कोटींचा सायबर खेळ!

**-अमरावती ग्रामीण पोलिसांची पुण्यात कारवाई**

**-तांत्रिक तपासातून तिघे जेरबंद -प्राथमिक तपासात**

**तीन कोटींची सायबर फसवणूक उघड**



**अमरावती/प्रतिनिधीः-** जिल्ह्यातील नागरिकांच्या बँक खात्यांचा गैरवापर करून ऑनलाइन गेमिंग, बेटिंग आणि इतर आर्थिक व्यवहारांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात आर्थिक उलाढाल करणाऱ्या टोळीचा अमरावती ग्रामीण पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. तांत्रिक तपासातून या आर्थिक जाळ्याचा माग काढत पोलिसांनी पुणे येथून तीन आरोपींना अटक केली. त्यांच्याकडून २४ मोबाईल, चार लॅपटॉप, २९ एटीएम कार्ड, १३ चेकबुक, सात पासबुक आणि १२ सिमकार्ड, असा सुमारे ४ लाख ४० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. प्राथमिक आर्थिक तपासात आतापर्यंत सुमारे तीन कोटी रुपयांची सायबर फसवणूक झाल्याचे निष्पन्न झाले आहे. सायबर गुन्ह्यांची वाढती व्याप्ती लक्षात घेता अमरावती ग्रामीणचे पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांच्या मार्गदर्शनाखाली 'ऑपरेशन ☞(पान २ वर)

# जिल्हा बँकेत प्रशासक नियुक्तीचा मार्ग मोकळा

**-हायकोर्टाने संचालक मंडळाची याचिका फेटाळली**

**-अध्यक्ष बच्चू कडू व उपाध्यक्ष अभिजीत ढेपे यांना धक्का**



**अमरावती/प्रतिनिधीः-** जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या सत्ताधारी संचालक मंडळाला आज सोमवार ५ ऑक्टोंबर रोजी मोठा धक्का बसला आहे. बँकेच्या विद्यमान संचालक मंडळाचा कार्यकाळ समाप्त झाल्यानंतर आगामी निवडणूक होईपर्यंत पदावर कायम ठेवण्याच्या मागणीसाठी दाखल केलेली याचिका नागपूर खंडपीठाने फेटाळून लावली. न्यायालयाच्या निर्णयानंतर आता बँकेतील पुढील प्रशासकीय व्यवस्था कशी असेल याबाबत सहकार विभागाची भूमिका महत्त्वाची ठरली आहे.

संचालक मंडळाचा कार्यकाळ संपल्या नंतर बँकेत प्रशासक नियुक्तीचा मार्ग मोकळा झाला आहे. न्यायालयाच्या या निर्णयामुळे बँकेचे अध्यक्ष व आमदार बच्चू कडू तथा उपाध्यक्ष अभिजीत ढेपे यांच्या सह सत्ताधारी गटाशी संबंधित संचालकांना मोठा धक्का बसला आहे. बँकेच्या विद्यमान संचालक मंडळाचा कार्यकाळ रविवार ४ ऑक्टोबर रोजी संपला आहे. अशा परिस्थितीत सत्ताधारी संचालकांच्या वतीने आगामी निवडणूक होईपर्यंत आणि नवीन संचालक मंडळ गठित होईपर्यंत विद्यमान मंडळाला पदावर कायम राहण्याची परवानगी देण्याची मागणी करण्यात आली होती. याच मागणीसाठी हायकोर्टात धाव घेण्यात आली होती आणि याचिका दाखल करण्यात आली होती. दुसरी कडे, विरोधी संचालकांनी याला विरोध करत सहकार कायद्याच्या तरतुदीनुसार कार्यकाळ संपल्यानंतर पर्यायी प्रशासकीय व्यवस्था करण्याची भूमिका मांडली होती. नागपूर खंडपीठात न्या. अनिल किलोर यांच्या एकल पीठासमोर झालेल्या सुनावणी दरम्यान सत्ताधारी संचालक मंडळाच्या वतीने ॲड. भांगडे आणि ॲड. कप्तान यांनी बाजू मांडली. तर विरोधी संचालकांच्या वतीने ॲड. फिरदौस मिर्झा यांनी युक्तिवाद केला. दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकल्यानंतर न्यायालयाने सत्ताधारी ☞(पान २ वर)

# लक्ष केंद्रित केल्याने मिळाले यश, तिरंगा फडकवण्याचा क्षण गौरवाचा

**एशियन गेम्समध्ये विजयी कुमकुम आणि यशदीपने पत्रकारांशी साधला संवाद**



**अमरावती/प्रतिनिधीः-** इतक्या मोठ्या स्पर्धेत सहभागी झाल्यानंतर आपले लक्ष विचलित होण्यापासून वाचवणे कठीण होते. त्यामुळे सुरुवातीच्या फेरीत काही काळासाठी मी मागे पडले होते, पण शेवटच्या क्षणी मी माझे लक्ष केंद्रित करून हे यश मिळवले आहे. आई-वडिलांच्या स्वप्नाचा विचार करून मी या खेळात यश मिळवले आहे. त्यासाठी प्रतिकूल परिस्थिती असूनही हा महागडा खेळ खेळण्यात माझ्या कुटुंबाने मला पूर्ण पाठिंबा दिला, ज्यामुळे मला हे यश मिळाले आहे. या यशामध्ये माझ्या सर्व गुरुजनांचे आणि स्नेहीजनांचे आशीर्वाद महत्त्वाचे राहिले आहेत, या शब्दांत कुमकुम मोहोडने आपल्या भावना व्यक्त केल्या. एशियन गेम्समध्ये दोन स्वर्ण आणि यशदीपला रौप्य पदक मिळाल्यानंतर त्यांचे आज अमरावतीत आगमन झाले. यानंतर त्यांचे भव्य स्वागत करण्यात आले. शहरातील पत्रकारांशी संवाद साधत त्यांनी आपले अनुभव सांगितले. कुमकुमने आपल्या घराच्या भिंतीवर काही वर्षांपूर्वी ऑलिम्पिकमध्ये गोल्ड जिंकण्याचे लक्ष्य अंकित केले होते आणि आज एशियन गेम्समध्ये तिने दोन सुवर्ण जिंकले आहेत. जपानच्या भूमीवर तिरंगा फडकवण्याचा आनंद अविस्मरणीय असल्याचे कुमकुमने सांगितले.या स्पर्धेत सिल्वर मेडल जिंकणारा यशदीप भोगे देखील अमरावतीचाच रहिवासी आहे. यशदीपच्या मते या वर्षी भारताने ☞(पान २ वर)

# अंजनगाव सुर्जी तालुक्यात दुष्काळाचा पहिला बळी

**कुंभारगाव येथील युवा शेतकऱ्याची आत्महत्या**



**अंजनगाव सुर्जी/प्रतिनिधीः-** अंजनगाव सुर्जी तालुक्यात यावर्षीच्या दुष्काळाने शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले असून, दुष्काळाचा पहिला बळी गेला आहे. तालुक्यातील कुंभारगाव येथील शेतकरी विशाल रामकृष्ण बारब्दे (वय ३३ वर्ष) यांनी कर्जबाजारीपणा आणि नापिकीला कंटाळून आपले जीवन संपविले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, ही घटना सोमवार, दि. ५ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ५ वाजण्याच्या सुमारास घडली. विशाल बारब्दे यांनी राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली.विशाल बारब्दे यांच्याकडे केवळ १ एकर शेती आहे. यावर्षी शेतामध्ये सोयाबीन पिक आहे मात्र पाऊस कमी पडल्यामुळे ☞(पान २ वर)

# एमआयडीसीतील चोरीचा छडा; १.३२ लाखांचा मुद्देमाल जप्त

**राजापेठ पोलिसांची कारवाई; दोघांचा शोध सुरू**



**अमरावती/प्रतिनिधीः-** एमआयडीसी परिसरातील कंपनीच्या आवारातून सुमारे १ लाख ३० हजार रुपयांचे लोखंडी साहित्य चोरीला गेल्याच्या प्रकरणाचा राजापेठ पोलिसांनी छडा लावला. पोलिसांनी एका १८ वर्षीय आरोपीला अटक करून त्याच्याकडून चोरीच्या मुद्देमालासह गुन्ह्यात वापरलेली एक लाख रुपये किमतीची दुचाकी असा एकूण १ लाख ३२ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणातील एक आरोपी फरार असून, आणखी एका संशयिताचा शोध घेण्यात ☞(पान २ वर)

# निवडणूक आयोगाच्या भूमिकेविरोधात इंडिया आघाडीचा ८ ऑक्टोबरला मोर्चा



**अमरावती/प्रतिनिधीः-** निवडणूक आयोगाच्या भूमिकेविरोधात इंडिया आघाडीचा ८ ऑक्टोबर रोजी जिल्हा कचेरिवर मोर्चा धडकणार असून यासंदर्भात सोमवारी इंडिया आघडीच्या बैठकीत नियोजन झाले. यावेळी बबलू देशमुख, सुनील देशमुख, खासदार बळवंतराव वानखडे , बबलू शेखावत ,विलास इंगोले, वीरेंद्र जगताप यांची प्रमुख उपस्थिति होती.

भारताचे मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या भूमिकेसह विशेष पुनरिक्षण (एसआयआर) प्रक्रियेबाबत विविध प्रश्न उपस्थित करीत इंडिया आघाडीच्या वतीने सोमवारी, ५ ऑक्टोबर रोजी काँग्रेस भवन येथे बैठक घेण्यात आली. या बैठकीत निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकता, मतदारांच्या हक्कांचे संरक्षण आणि निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीबाबत चर्चा करण्यात आली. पश्चिम बंगालसह विविध ठिकाणी एसआयआर प्रक्रियेदरम्यान मोठ्या संख्येने मतदारांची नावे वगळली जात असल्याचा आरोप विरोधकांकडून करण्यात ☞(पान २ वर)

# धनादेश अनादर प्रकरणात जितु केशवानीला ४ महिन्यांची कैद

**४ लाख रुपयांची दंडात्मक भरपाई व्याजासह देण्याची शिक्षा**

**अमरावती न्यायालयाचा निर्णय**

**अमरावती/प्रतिनिधीः-** नगदी रक्कमेच्या परतफेडीसाठी दिलेला ४ लाख रुपयांचा धनादेश (चेक) अनादरीत झाल्याप्रकरणी शादानी बिल्डर्स व डेव्हलपर्सचे प्रोप्रायटर जितु उर्फ जितेंद्र सुरेश केशवानी यांना अमरावती येथील न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग (न्यायालय क्र. ४) डॉ. पद्माकर के. धोंडगे यांनी ४ महिन्यांची साधी कैद आणि ४ लाख रुपयांची दंडात्मक भरपाई ९% व्याजासह देण्याची शिक्षा सुनावली आहे. ही रक्कम न दिल्यास आरोपीला आणखी १ महिन्याची अतिरिक्त साधी कैद भोगावी लागणार आहे.

शादानी बिल्डर्स व डेव्हलपर्सचे प्रोप्रायटर जितु उर्फ जितेंद्र सुरेश केशवानी, रा. अमरावती यांचे विरुध्द त्यांनी नगदी जमा रक्कम रु. ४,००,०००/- च्या परतफेडीसाठी दिलेला धनादेश अनादरीत झाल्यावरुन तकारकर्ता अनुप रेवाचंद असराणी यांनी परकाम्य संलेख अधिनियम अंतर्गत जितु उर्फ जितेंद्र सुरेश केशवानी, यांना त्यांचे सर्व पत्त्यावर नोटीस पाठविली होती. परंतु, त्या नंतरही सदर धनादेशाचे त्याचे १५ दिवसांत भूगतान न केल्याने अनुप रेवाचंद असराणी यांनी मुख्य न्यायदंडाधिकारी अमरावती यांचे कार्यक्षेत्रात परकाम्य संलेख अधिनियमचे कलम १३८ अंतर्गत प्रकरण दाखल केले होते.

सदरच्या प्रकरणात ☞(पान २ वर)

# अशोक खटाळे यांना 'समाजरत्न पुरस्कार-२०२६' प्रदान



**अमरावती/प्रतिनिधीः-** संत सावता माळी नागरी सहकारी पतसंस्था मर्या., अमरावती तर्फे देण्यात येणारा मानाचा 'समाजरत्न पुरस्कार-२०२६' ज्येष्ठ शिक्षक व समाजसेवक अशोक माणिकराव खटाळे यांना प्रदान करण्यात आला.

संस्थेचे अध्यक्ष मयुर ह. चरपे, सचिव . प्रभाकर दे. झगडे आणि कोषाध्यक्ष सुरेश तु. बिरे यांच्या हस्ते हा पुरस्कार देण्यात आला. या कार्यक्रमाला संत शिरोमणी सावता महाराज यांचे ११ वे वंशज ह.भ.प. सावता महाराज वसेकर (अरुण) यांची पावन उपस्थिती लाभली. खटाळे यांनी वं. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या गुरुकुंज येथे शिक्षण पूर्ण करून देऊरवाडा (काजळी) येथील व्यंकटेश विद्यालयात सहाय्यक शिक्षक म्हणून ३५ वर्षे १० महिने १२ दिवस अखंड सेवा बजावली आहे. ते आदर्श पुरस्कार प्राप्त शिक्षक असून क्रीडा, कबायत आणि लष्करी शिक्षणातही अग्रेसर राहिले आहेत.

तसेच, जोती-सावित्री माळी विकास प्रतिष्ठानच्या वधू-वर पालक परिचय मेळाव्यासाठी गेल्या १५ वर्षांपासून त्यांचे योगदान अतुलनीय राहिले आहे. पतसंस्थेसाठी २२०० ☞(पान २ वर)

# युवकाच्या पोटात धारदार शस्त्राने वार

**पियुष मेश्राम गंभीर, फॉरेस्ट कॉलनी मार्गावरील घटना**

**अमरावती/प्रतिनिधीः-** दोन दुचाकींवरून आलेल्या हल्लेखोरांनी २३ वर्षीय युवकावर अचानक धारदार शस्त्राने हल्ला करून त्याच्या पोटात गंभीर वार केल्याची थरारक घटना रविवारी रात्री फॉरेस्ट कॉलनी मार्गावरील परिसरात घडली. या हल्ल्यात पियुष मेश्राम (वय २३, रा. भंडारा) हा गंभीर जखमी झाला असून, त्याच्यावर जिल्हा सामान्य रुग्णालयात तातडीने शस्त्रक्रिया करण्यात आली. हल्ल्यानंतर आरोपी दुचाकींवरून पसार झाले.

रविवारी रात्री ११ ते ११.३० वाजताच्या सुमारास पियुष मेश्राम हा संजय गांधी नगर क्रमांक दोन परिसरात असताना दोन दुचाकींवरून काही युवक तेथे आले. काही कळण्याच्या आतच हल्लेखोरांनी पियुषवर धारदार शस्त्राने हल्ला चढविला. त्याच्या पोटावर गंभीर वार झाल्याने तो रक्तबंबाळ होऊन घटनास्थळीच कोसळला. हल्लेखोरांनी त्यानंतर दुचाकींवरून तेथून पलायन केले. घटनेची माहिती मिळताच फ्रेजरपुरा पोलिसांच्या ११२ सीआर मोबाईल पथकाने घटनास्थळी धाव घेतली. गंभीर जखमी अवस्थेतील पियुषला तातडीने ११२ वाहनातून जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले. डॉक्टरांनी तपासणी केल्यानंतर त्याची प्रकृती गंभीर असल्याचे स्पष्ट झाले. पोटात धारदार शस्त्राचा घाव गंभीर असल्याने त्याला तातडीने ऑपरेशन थिएटरमध्ये दाखल करण्यात आले. दरम्यान, घटनेची माहिती मिळताच फ्रेजरपुरा पोलीस ठाण्याचे अधिकारी व कर्मचारी तसेच डीबी पथक घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी घटनास्थळाची पाहणी करून हल्लेखोरांचा ☞(पान २ वर)

नाग विदर्भ चरखा संघ मुल
द्वारा संचालित
**खादी ग्रामोद्योग भांडार**
गांधी चौक, अमरावती मो. ८१४९७५११५१
प. पुज्य म. गांधी जयंती निमित्य
२ ऑक्टोंबर पासून ४५ दिवसपर्यंत २०% प्रमाणे सवलत सुरु राहील
खादी २०%
पॉलीवस्त्र २०%
रेशम २० %
उलन २०%

# नागरिकांच्या प्रश्नांसाठी आमदार केवलराम काळे मैदानात

**वनपट्टा, घरकुल, मजुरी व पाणीटंचाईवर घेतला आढावा**



**अचलपूर/प्रतिनिधीः-** मेळघाट विधानसभा मतदारसंघाचे आमदार केवलराम काळे यांनी सोमवारी चिखलदरा तालुक्याचा दौरा करून विविध विकासकामांचा आढावा घेतला तसेच नागरिकांच्या विविध समस्या जाणून घेतल्या. तालुक्यातील वनपट्टा, अतिक्रमणाची प्रकरणे प्रलंबित असल्याने ती तत्काळ निकाली काढण्यासाठी आमदार काळे यांनी चिखलदरा तहसीलदार जीवन मोरणकर यांच्याशी चर्चा केली.यावेळी वनहक्क पट्ट्यांशी संबंधित प्रलंबित प्रकरणे, नागरिकांच्या अडचणी तसेच पात्र लाभार्थ्यांना त्यांच्या हक्काचा लाभ मिळण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. संबंधित प्रकरणांवर ☞(पान २ वर)

# परतवाडा विदर्भ मील परिसरात टेम्पोची दुभाजकाला धडक

**-मोठी दुर्घटना टळली,२० मजूर सुरक्षित -चारचाकी व दुचाकीचे नुकसान**



**अचलपूर/प्रतिनिधीः-** परतवाडा - अमरावती मार्गावरील विदर्भ मील परिसरातील जीवघेण्या ठरत असलेल्या दुभाजकामुळे लहान मोठे अपघात तर नित्याचेच झाले आहे.रात्री दरम्यान दुभाजक वाहनचालकांना दिसत नाही .यामुळे आज ५ ऑक्टोबर रोजी २० मजुरांची वाहतूक करणारा टेम्पो वाहन क्रमांक एम २७ बीएक्स १६३६ ने मार्गावरून जात असताना विदर्भ मील परिसरातील दुभाजकाला जबर धडक दिली . यात टेम्पो पलटले व यादरम्यान बाजूला उभे असलेल्या चारचाकी आणि दुचाकी वाहनाचे मोठे नुकसान झाले आहे.

या टेम्पोत जवळपास २० मजूर प्रवास करीत होते. घटनेची माहिती मिळताच परिसरातील नागरिक व पोलिस घटनास्थळी दाखल झाले. टेम्पोतील प्रवाश्यांना बाहेर सुखरूप काढण्यात आले.कोणतीही अनुचित घटना घडली नाही.यामुळे वाहतूक व्यवस्था ☞(पान २ वर)